# वाङ्मय विहार

नि. ५०८
११-११-३३

म. ग्रं. मं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ५४७

REFBK-0004813

१२ आणे

ना. सी.

जिची
मातृभाषा इंग्रजी
असूनही मराठीवरची
भक्ति कौतुकास्पद आहे,
व जिनें माझ्या लेखनगुणांचें सदैव
कौतुक करून मला प्रेमळ
प्रोत्साहन दिलें आहे
तिला प्रीतिपूर्वक
अर्पण !

REFBK-0004813

# अनुक्रमणिका


| विषय | | | लेखांक |
|---|---|---|---|
| १. कलेची व्याख्या | ... | ... | १ |
| २. कला अहेतुक असते काय ? | | ... | २ |
| ३. कादंबरी लेखनांतील कांहीं युक्त्या, व त्यांचा अभ्यास | ... | ... | ३ ते ७ |
| ४. नामांकित कादंबरीकारांचें अनुकरण कसें व किती करावें ? | | ... | ८ ते ११ |
| ५. मराठींत रूढ होऊं पहाणारे कांहीं दुष्ट वाङ्मय प्रकार | ... | ... | १२ ते १५ |
| ६. वाङ्मयाचे चार घटक, व त्यांचे परस्परसंबंध | ... | ... | १६ ते २१ |
| ७. मराठी ललित लेखकांवरील कांहीं आक्षेप व त्यांचें निरसन | ... | ... | २२ ते २४ |

# प्रो० फडकेकृत पुस्तकें

चरित्रें—

१. टेरेन्स मॅक्स्विनी
२. डी व्हॅलेरा
३. दादाभाई नौरोजी ( २ री आवृत्ति )

प्रबंध—

१. मानसोपचार ( २ री आवृत्ति )
२. मानसोन्नति
३. सुखाचे संसार
४. संततिनियमन ( २ री आवृत्ति )
५. प्रतिभासाधन
६. आजचे तरुण स्त्रीपुरुष व त्यांजपुढील प्रश्न
७. गुजगोष्टी
८. वाङ्मयविहार

कादंबऱ्या--

१. अल्ला हो अकबर
२. कुलाब्याची दांडी
३. जादूगार ( २ री आवृत्ति )
४. दौलत ( २ री आवृत्ति )
५. अटकेपार
६. निरंजन
७. कलंकशोभा

नाटकें--

१. युगान्तर २. जडावाची देवी

इंग्रजी—

1. Sex Problems in India ( 2nd Edition )
2. Psychology 3. Elements of Ethics
4. Birth Control ( 5th Edition ) 5. Logic

प्रसिद्ध झाली ! प्रसिद्ध झाली ! !

प्रो. ना. सी. फडकेकृत

# दौलत

द्वितीयावृत्ति.

किं. रु. २

श्री. बाबूराव पेंटर यांच्याकडून मुद्दाम काढवून घेतलेल्या मोहक चित्राचें तीन रंगी कव्हर. उत्कृष्ट छपाई.

चीफ एजंट:
इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणें.

प्रकाशक:
हंस प्रकाशन-संस्था
कोल्हापूर.

१९३१ सालचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ
ठरून भोजराज प्राइझला पात्र झालेलें
प्रो. फडकेकृत

# प्रतिभासाधन

संग्रहीं ठेवण्यांत प्रत्येक मराठी वाचकास मोठें भूषण वाटतें.
किं. २ रु.

१. हंस प्रकाशन-संस्था, कोल्हापूर.
२. परचुरे पुराणिक मंडळी, मुंबई.

---

प्रो. फडके यांची

# जा दू गा र

( द्वितीयावृत्ति )

आमचेकडे स्टॉक केली आहे. व्यापाऱ्यांस भरपूर कामिशन
देऊं. फुटकळ किंमत रु. २.

दासराम बुकडेपो, कोल्हापूर

श्री ग्रंथ संग्रहालय
ऑर्ड नं. ६०९१
ठाणे
नि. नं. ५०८
ता. २१-११-३३

# वाङ्मयविहार

[ नं. १ ]

मला एकदां एका गृहस्थांनीं विचारलें,

" ललितवाङ्मय ही कला आहे काय ? "

" निःसंशय. " मीं म्हटलें.

" कलेचीं व्याख्या काय ? " त्यांनीं विचारलें.

मीं म्हटलें, " सांगतों. "

" अगदीं सोपी अशी सांगा अं ! पंडितमन्यांच्या अगडबंब व्याख्यांची मला भीति वाटते. " त्यांनीं अगदीं काकुळतीनें सूचना दिली.

मीं त्यांना आश्वासन दिलें,

" कांहीं हरकत नाहीं. अगदीं सोप्या शब्दांत कलेची व्याख्या करून सांगतों. हें पहा, जी दिसायला सोपी दिसते, पण करायला कठीण असते ती कला. **जी दिसते सोपी, पण असते कठीण ती कला.** "

त्या गृहस्थांना माझी ही व्याख्या पटली. आणि मला वाटतें ती कोणालाही पटेल. कलावंतानें चतुराईनें केलेली करामत पाहिली कीं आपल्याला क्षणभर असें वाटल्यावांचून रहात नाहीं कीं, यांत विशेष अवघड तें काय आहे !—आपण सुद्धां ही गोष्ट सहज करूं शकूं.

एक अगदीं साधें उदाहरण घेऊं. सर्कशीच्या खेळांत सायकलचे प्रयोग करणारा एक खेळाडू असतो. तो सायकलवर बसतो, उभा राहतो, निजतो, पायानीं पायंडे मारतो, हातांनीं मारतो, सायकलचे सारे भाग सुटे करून दाखवितो, जोडूनही दाखवितो, नाना तऱ्हा करतो. तें सारें पाहून जो सायकलवर कधीं बसलेला नाहीं त्याला वाटतें, उंः ! यांत काय आहे ? सायकल घ्यायची अन् तोल साधून बसायचें झालें ! पण तोच माणूस सायकलवर बसायला शिकूं लागतो तेव्हां त्याला कळतें तें कर्म किती कठीण आहे तें !

उत्तम गायकाच्या अगर वादकाच्या मैफलींतही स्वराचा, लयीचा आणि तालाचा श्रुतिमनोहर संवाद कमालीच्या सफाईनें झालेला ऐकला कीं सामान्य माणसाला वाटतें, यांत विशेष अवघड तें काय आहे ? गाणें पाठ करायचें आणि म्हणायचें, किंवा वाद्य घ्यायचें आणि त्यावर गज फिरवायचा ! एक श्रीमंत व्यापारी एका नामांकित तंतकाराची मैफल ऐकून आले, व त्यांनीं मनाशीं निश्चय केला कीं आपणही दिलरुबा वाजवायचा. सहज वाजवितां येतो, आणि मोठा गोड वाजतो. असावा षोकाखातर जवळ. म्हणून दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मिरजेच्या मुसलमान कारखानदाराकडे ऑर्डर दिली, व दिलरुबा आणविला. दिलरुबा आला त्या दिवशीं लगेच मोठ्या अधीरतेनें ते वाजवायला बसले. पण काय ? सबंध गाणें तर राहोच, एक देखील स्वर त्यांच्या हातून त्या वाद्यांतून निघेना ! त्या वेळीं त्यांना उमज पडला कीं, त्या बजवय्याची मैफल ऐकतांना वाटली तशी ही गोष्ट सोपी नाहीं !

चित्रकाराची अगर शिल्पकाराची कृति पाहिली कीं, अनभिज्ञाला प्रथमदर्शनीं असेंच वाटतें कीं, हें काय, हें सहज घडलेलें आहे. शिल्पचित्राचा तो पवित्रा, ती ठेवण, ते अवयव, आणि मुद्रेवरील भाव—अगर रंगचित्रांतील तो प्रसंग, त्या व्यक्ती, पार्श्वभूमि, अथवा निसर्गस्थळ—सारें सहजच बनल्यासारखें सामान्य पाहणाराला वाटतें. तें त्याला जसें सुंदर दिसतें, तसेंच सहजासहजीं तयार झाल्यासारखेंही दिसतें.

किंबहुना तसें तें न दिसेल तर त्या चित्राची थोरवी कमी मानावी लागेल. कारण सहजपणा आणि सफाई हा तर कलावंताच्या कौशल्याच्या परमावधीची खरी खूण होय. कोणताही कलावंत विवक्षित साधनसामुग्रीच्या योगानें कसला तरी आभास निर्माण करीत असतो; आणि आपल्याला मुळींच कष्ट पडत नाहींतसें दाखविणें हा त्या आभासाचा एक फार महत्त्वाचा भाग आहे. कलावंताचा खटाटोप जितका प्रगट होईल तितका त्याच्या कलाकृतीला हिणकसपणा येईल. आणि उलट, तो खटाटोप जितका अदृश्य राहील आणि सहजपणाचा आविर्भाव जितका होईल तितकें कलाकृतीचें सौंदर्य वृद्धिंगत होईल.

ज्या कलांच्या सौंदर्याचा उपभोग मनुष्याला नेत्रांच्या साहाय्यानें घ्यावयाचा असतो, त्यांच्या बाबतींत मी म्हणतों या तत्त्वाचा प्रत्यय ताबडतोब मिळेल. नृत्यकलेपासून आनंदाची प्राप्ति मुख्यत्वेंकरून आपल्या दृष्टीला होत असते

त्यामुळें नाचणारा कथ्थक अगर नृत्य करणारी नृत्यांगना आपले यत्न प्रेक्षकांच्या दृष्टीस पडूं न देतां सहजपणा जितका प्रगट करील तितकें नर्तनास अधिकच सौंदर्य प्राप्त होतें. नृत्यांगनेनें कामुकता, अधीरता, रुष्टता, विव्हलता इत्यादि विविध भाव तर मुद्रेवर दर्शवायचे असतातच. परंतु या सर्व भावांस अधिकच सुभगता देणारा जर कोणता भाव असेल तर तो सहजता !

टेनिस, क्रिकेटसारख्या क्रीडाप्रकारांत देखील सहजपणा हें एक त्या त्या क्रीडेंतील पाटवाचें एक मोठें गमक मानलें जातें. निष्णात खेळणाऱ्याच्या खेळांत शक्ति, युक्ति, चापल्य इत्यादि गुण तर असतातच, पण या गुणाचा जेव्हां परमोत्कर्ष होतो, तेव्हां सहजपणा नांवाचा नवीनच एक गुण त्याच्या खेळांत दिसूं लागतो, व त्या गुणानें त्याच्या कृतीला अवर्णनीय लालित्य प्राप्त होतें. नायडू ओव्हरबाउंडरी मारतात त्या वेळी पाहणाराला खऱ्या गुदगुल्या होतात त्या त्यांचा सहजपणा पाहून. किंवा कोशे अगर लाकोस्टसारख्या जगज्जेत्या टेनिसपटूचा खेळ नितांत रमणीय वाटतो त्याचें मुख्य कारण त्याची सफाई.

अर्थात् काव्य—मग तें पद्यमय असो अगर गद्यमय असो—जर ललितकलांपैकीं एक आहे तर त्यासही हा विचार लागू पडला पाहिजे, आणि उत्कृष्ट कवितेचे, कादंबरींचे, नाटकाचे अगर लघुकथांचे नमुने आपण दृष्टीसमोर आणले तर त्यांस तो लागू पडतो असेंच आपल्यास दिसून येईल. आपल्या पाठांतरांतील सुंदर कविता अगर नाटकांतील पद्यें स्वतःशीं गुणगुणून पहावीं म्हणजे माझ्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. उत्कृष्ट कवितेंत अर्थ, अलंकार, नाद, प्रासानुप्रास इत्यादि गुण तर असतातच, पण त्या सर्व गुणांवर एक विलक्षणच मोहक असा मुलामा ज्या गुणामुळें चढल्यासारखा दिसतो तो गुण म्हणजे सहजपणा. ती कविता म्हणून झाली, कीं आपल्याला क्षणभर वाटतें, बरोबर आहे, या शब्दांपुढें हेच शब्द पडले पाहिजेत, आणि या प्रासानंतर हाच प्रास सहजप्राप्त आहे. मोरोपंतांचीं यमकें कधीं कधीं मोठीं क्लिष्ट असतात हें खरें, व भिंतीवर यमकांचीं कोष्टकें लिहून त्यांनीं काव्यरचनेचा उद्योग कांहीं अंशानें यांत्रिक करून टाकला होता, अशी आख्यायिका रूढ आहे हेंही मला माहीत आहे, परंतु असें असूनही मी इतकें निःशंकपणें म्हणेन, कीं, जेव्हां त्यांचीं यमकें व प्रास म्हणतांना आपल्याला विलक्षण आल्हाद होतो तेव्हां तो होण्याचें मुख्य कारण असें कीं, तें सारें आपल्याला क्रमप्राप्त, ओघानेंच आल्यासारखें, आणि

सहजच असल्यासारखें वाटतें " आपण ही कविता अशीच केली असती, आणि सहजासहजीं केली असती " असा कांहींसा विचार आपल्या मनांत क्षणभर येऊन जातो. काव्याच्या ज्या गुणामुळें वाचकाला असें वाटतें त्यालाच आपण नेहमीं ' प्रसाद ' असें नांव देतों. एखाद्या प्रासादिक कवितेचा फक्त पहिला शब्द आपल्याला कोणी सांगितला तर आपल्याला पुढचे शब्द सुचायचे नाहींत; पण ती पुरी ऐकली म्हणजे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं, कीं हो हो ! असेंच. मीं अशीच केली असती ही कविता !

कवितेलाच नव्हे तर ललितकथेलाही हाच न्याय लागू आहे. एखादें नाटक, गोष्ट, किंवा मोठी कादंबरी पाहायला किंवा वाचायला प्रारंभ केला कीं, पुढें काय होणार आहे, व शेवट कशा तऱ्हेनें होणार आहे तें आपल्याला सांगवत नाहीं; परंतु अखेरपर्यंत नाटक पाहिलें किंवा कादंबरी वाचली कीं, वाटतें, अरे होय कीं ! किती उघड आणि सहजप्राप्त होत्या या साऱ्या घटना ! मी सुद्धां असेंच लिहिलें असतें, आणि सहजासहजीं लिहिलें असतें ! प्रारंभस्थळावर उभें राहून पुढें दृष्टि टाकली कीं वाट बिकट वाटावी, पण मुक्कामावर पोंचून मागें वळून दृष्टि टाकली कीं, तो मुक्कामही क्रमप्राप्त वाटावा, आणि ती वाटही सरळ, सोपी वाटावी ही ललितकथेच्या उत्कृष्टपणाची एक मोठी साक्ष आहे.

" दिसते सोपी पण असते कठिण " असें जें मीं ललितकलेविषयीं प्रथम विधान केलें तें आतां वाटल्यास उलट फिरवूं. " असते कठीण, पण दिसते सोपी " ती ललितकला; व ललितकथा ही जर या कलांपैकींच एक आहे तर ती सुद्धां **"असते कठीण पण दिसावी सोपी"** हें सूत्र ललितवाङ्मय लिहूं पाहणाऱ्या सर्व लेखकांनीं निरंतर ध्यानांत वागवावयास नको काय !

ग्रंथ नं. ६८११
स्थळ प्रत नं. ५०८
29-11-33



" दिसते सोपी, पण असते कठिण " हें कोणत्याही ललितकृतीचें सामान्य लक्षण ललितकथेच्या बाबतींत ध्यानांत वागविलें, म्हणजे बऱ्याच प्रश्नांचा उलगडा सहजासहजीं होण्यासारखा आहे. अभ्यासु लेखकानें नामांकित ललित-लेखकांच्या कथा कोणत्या पद्धतीनें वाचाव्या ? कोणत्या विशिष्ट गोष्टींकडे त्यानें वाचनाच्या वेळीं विशेष अवधान ठेवावें ? ललितकथेंत लालित्य उत्पन्न करणारा सगळ्यांत महत्त्वाचा गुण कोणता ? त्या गुणाचें संवर्धन नामांकित लेखक आपल्या कृतींत कसें करतात ? ही त्यांची खटपट सकृद्दर्शनीं दृग्गोचर होण्यासारखी नसली तरी अमुक एका सूक्ष्मदर्शक पद्धतीनें पाहणारास ती कशी दिसण्यासारखी आहे ? नामांकित लेखक नाटक, कादंबरी, अगर गोष्ट लिहितांना आपल्या कलाकृतीस अखेर सहजरमणीयता प्राप्त व्हावी एतदर्थ वास्तविक हरतऱ्हेची दक्षता ठेवीत असतो, व त्या खटपटीची त्याला थोडी फार जाणीवही असते, हा माझा सिद्धान्त खरा आहे कीं नाहीं ? कीं, All Genius is unconscious–म्हणजे माणसाच्या हातून प्रतिभायुक्त असें जेव्हां कांहीं लिहिलें, बोललें, गायलें, किंवा केलें जातें, तेव्हां त्याच्या हातून तें सारें अगदीं अजाणतां लिहिलें, बोललें अगर केलें जातें, अशी जी सामान्य समजूत आहे ती खरी आहे ? –इत्यादि किती तरी प्रश्न मोठे मनोरंजक आहेत आणि मला असें वाटतें कीं, "दिसते सोपी, पण असते कठीण" हें ललितकथेचें मुख्य लक्षण जर आपण ध्यानांत ठेवलें, तर या व अशा इतर किती तरी प्रश्नांची समाधानकारक उत्तरें आपणांस देतां येतील.

वर उल्लेखिलेल्या प्रश्नांपैकीं शेवटच्या प्रश्नाचाच उदाहरणादाखल प्रथम विचार करूं. All Genius is unconscious हें खरें आहे काय ? लेखना-पुरतीच या वादाला मर्यादा घालून बोलायचें झालें, तर ललितलेखक जेव्हां लालित्यपूर्ण कथा लिहितो, तेव्हां तो unconscious असतो काय ? तो जी कांहीं करामत करतो ती त्याची त्याला नीटशी माहीत नसते, असें म्हणतां येईल काय ? ललितलेखक जेव्हां आपल्या कलेंत रंगून जातो, व त्याच्या हातून अत्यंत रमणीय लेखन निर्माण होतें, तेव्हां तो जें कांहीं करतो त्याची त्याला

धड शुद्धबुद्धही नसते, असें समजतां येईल काय ? ललितकथा निर्माण करण्याच्या घटकेला खरा प्रतिभासंपन्न लेखक हेतुपूर्वक कांहीं करीत नसून त्याच्या लेखणींतून नाना तऱ्हेचे सुंदर सुंदर शब्दाकार व कल्पनाप्रकार त्याला न कळत प्रगट होतात, असें मानणें युक्त होईल काय ?

या साऱ्या प्रश्नांस 'होय' असें उत्तर देणारी पुष्कळ मंडळी निघतील. कलावन्ताच्या हातून ज्या वेळीं कलेचा परमोत्कर्ष होतो, त्यावेळीं तो जाणतेपणानें कांहीं खटाटोप करीत नाहीं, त्याच्या हातून अजाणतां तो उत्कर्ष घडतो, अशी समजूत बरीच रूढ झालेली दिसते.

ही समजूत वास्तविक चुकीची आहे. पण ती रूढ झाली आहे याला दोन कारणें आहेत. एक कारण असें कीं, सामान्य माणसें स्वतः कलेचीं उपासक नसतात. तीं स्वतः कधीं गात नाहींत, चित्रें काढीत नाहींत, किंवा ललितलेखनही करीत नाहींत; परंतु कलावन्त जाणतेपणानें, हेतुपुरःसर अमुक एक सौंदर्यप्रकार निर्माण करतो असें कोणी त्यांस सांगूं लागलें तर तें मात्र त्यांना रुचत नाहीं. असें मानल्यानें कलाकृतीच्या मोहकपणांत न्यून उत्पन्न होतें अशी त्यांची उगीचच कल्पना असते. कोणत्याही ललितकृतीच्या सौंदर्यांत एक प्रकारचा जो सहजपणा असतो तो खरें पाहतां प्रयत्नजन्य असतो असें मानण्यास त्यांची तयारी नसते. तें सौंदर्य सहजासहजीं निर्माण झालें, कलावन्तानें हेतुपूर्वक परिश्रम केले ह्मणून नव्हे, तर त्याला न कळत, कसें कोणास ठाऊक, तें प्रगट झालें, असें समजल्यानेंच त्या सौंदर्याचा अलौकिकपणा राखल्यासारखें होईल असें सामान्य माणसांना वाटत असतें; व म्हणून असें समजण्यास खरोखरच पुरेसा आधार आहे कीं, नाहीं याबद्दल अधिक चिकित्सा न करतां हें मत सिद्ध म्हणूनच तीं समजून चालतात.

या मताला येऊं नये ती बळकटी येण्याचें दुसरें कारण असें कीं, ज्या कलावन्तांना आपल्या मनोव्यापाराचें नीट पृथक्करण करण्याची इच्छा अगर शक्ति नसते, तेही या मताला परिपोषक असे कबुलीजबाब कधीं विचारलें म्हणून, तर कधीं कोणी न विचारतांही, देत सुटतात. माझ्या हातून लालित्य निर्माण होतें खरें, पण तें कसें होतें तें माझें मलाच कळत नाहीं. असें स्वतः कलावन्तच सांगूं लागल्यावर, लोकांनीं तें झटकन ग्राह्य मानावें यांत आश्चर्य कसलें !

असले भ्रामक कबुलीजबाब देण्याचा गुन्हा सर्वांत अधिक प्रमाणांत करणारे कलावन्त कोणी असतील तर ते कवि ! कवींना कोणी विचारलें नाहीं तरी आपल्या काव्यनिर्मितीबद्दल ते अनेक वेळां असा खुलासा करतात कीं, आम्ही जें काव्यसौंदर्य निर्माण करतों त्याला आमचा हेतु अगर प्रयत्न कारण होतो असें कोणी मानूं नये. आमच्या लेखनांतील व काव्यांतील सारें लालित्य आम्हांला नकळत प्रगट होत असतें. तें केव्हां प्रगट होतें, व कसें प्रगट होतें तें आम्हांला कळतही नाहीं. मग तें तुम्ही आम्हांला विचारायचें कसलें व आम्ही तुम्हांला सांगणार कसलें ! लहानमोठ्या श्रुतिमनोहर काव्यकथा आम्ही रचतों. पण त्या आम्ही कां रचतों, व कशा रचतों हें आम्हांला कोणी विचारूं नये, अन् आम्ही कोणाला सांगूं नये ! आमच्या तोंडून अगर लेखणींतून त्या कशा बाहेर पडतात तें आमचें आम्हांलाही कळत नाहीं, मग तें आम्ही तुम्हांला कसें फोडून सांगणार ! कवितेचे आम्ही दास आहोंत. तिचें स्फुरण झालें कीं, आम्हांला ती व्यक्त केलीच पाहिजे. स्फूर्तीची गुलामगिरी आम्ही पत्करली आहे. आम्ही कां गातों म्हणतां !—आमचा इलाज नाहीं, आम्हांला त्या बाबतींत बुद्धिस्वातंत्र्यच नाहीं म्हणून गातों ! आणि साऱ्याच कलावन्तांचें असें आहे. All Genius is unconscious !

कवींनीं आपण होऊन दिलेला हा कबुलीजबाब सामान्य माणसें साहजिकपणेंच खरा मानतात, आणि काव्याप्रमाणेंच सगळ्याच ललितलेखनप्रकारांस तो लागू करण्यांत येतो. हा विचित्र सिद्धान्त मान्य केला कीं, ललितलेखकाची कृति अमुक परिश्रमांचें व खटपटीचें फळ आहे असें म्हणण्यास अवकाशच उरत नाहीं, व अभ्यासू लेखकांनीं अमुक पद्धतीनें अगर दिशेनें नमुनेदार ललितलेखनाचा अभ्यास करावा असें सांगण्याची सोयही रहात नाहीं.

ही आपत्ति मोठी खरीच, पण ती एका भ्रामक समजुतीच्या पोटीं आली असल्यामुळें ती वास्तविक नसून काल्पनिक आहे. ज्या समजुतीमुळें ती उद्भवते तीच किती खोटी आहे तें आपण पाहूं, म्हणजे झालें.

कवि काव्य करतो तें काय सर्वस्वीं अजाणतां !—त्याचा नाइलाज होतो म्हणून ! मला तसें वाटत नाहीं; आणि ज्या कोणा कवींना तसें वाटत असेल तें त्यांच्या समजुतीच्या घोटाळ्यामुळें. खरें पाहतां, **कवि काव्य करतो तें तो आपल्या मनाशीं हेतुपुरःसर काम करण्याचें ठरवितो म्हणून**. अत्यंत रमणीय

सृष्टिसौंदर्य दिसतांच कवि काव्य करतो—अथवा गद्यलेखक लालित्यपूर्ण वर्णन करतो—तें त्या सौंदर्याचा त्याच्या रसिक अंतःकरणावर परिणाम होतो म्हणून, व हृदयांत उचंबळणाऱ्या वृत्ति दुर्दमनीय असतात म्हणून, यांत संशय नाहीं. अशा क्षणीं कवीनें केलेल्या काव्याला सहजोद्गाराचें स्वरूप येतें यांतही संशय नाहीं. परंतु अशा वेळचा तो काव्योद्गार 'सहज' असला तरी त्यांत हेतुपुरःसरता नसते असें कसें मानतां येईल ! काव्याच्या अगर ललितलेखनाच्या परमोत्कर्षाच्या घटकेला कवि, अगर लेखक एक प्रकारच्या बेभान अवस्थेत असतो; परंतु कलावन्ताची बेभान अवस्था मान्य करणें निराळें, आणि कलावन्ताकडून अजाणतां कलाकृतीस जन्म मिळतो असें प्रतिपादणें निराळें. कलोत्कर्षाच्या घटकेला कलावन्त हा केवळ स्फूर्तीचा गुलाम असतो असें स्फूर्तीचा व प्रतिभेचा केवळ गौरव करण्यापुरतेंच म्हणायचें असेल, तर म्हणायला हरकत नाहीं. परंतु या म्हणण्याला सिद्धान्ताची किंमत कोणी देऊं लागेल, तर तें चुकीचेंच ठरेल.

उत्कृष्ट लेखक अगर कवि यांच्या कलाकृति सहजसुंदर दिसतात हें जितकें खरें, तितकेंच **त्या कलाकृतींच्या निर्मितीमागें जाणतेपणा, जागरूकता, हेतुपूर्वक केलेले परिश्रम, इत्यादि साहित्य असतें हेंही खरें.** कवि काव्य करतो तेव्हां त्याचें भान हरपल्याप्रमाणें होतें यांत मुळींच संशय नाहीं. कोणत्याही कलावन्ताची अशी अवस्था होत असते; यांतही शंका नाहीं. पण त्याचें भान नाहींसें होतें याचा अर्थ त्याला कांहींच कळेनासें होतें, आपण काय करीत आहोंत, व तें कसें करीत आहोंत याची यत्किंचित्‌ही जाणीव त्याच्या ठिकाणीं उरलेली नसते, असा नव्हे !

छे, छे ! कलावन्ताला भान उरत नाहीं याचा खरा अर्थ असा, कीं जी कलावस्तू तो निर्माण करीत असतो, त्या वस्तूखेरीज **इतर गोष्टींचें भान त्याला उरत नाहीं.** त्याच्या अंतःकरणाची ज्या कलावस्तूनें पकड घेतलेली असते, व जिचें सौंदर्य तो परोपरीनें शब्द, ध्वनि, रेषा इत्यादींच्या साहाय्यानें स्पष्ट करीत असतो, **त्या कलावस्तूचें त्याला भान असतें, येवढेंच नव्हे तर त्या भानाची त्या घटकेला परमावधि झालेली असते !** कलावस्तू-खेरीज बाकी उरलेल्या जगाची त्याला शुद्ध बुद्ध नसते ! आपल्याला कोण काय म्हणेल, कोणी हंसेल कीं काय, आपलें हें काव्य अगर लेखन कोणी वाचतील कीं तें धूळ खात पडून कृमिकीटकांच्या भक्ष्यस्थानी जाईल,—इत्यादि

शंकांचें अगर विवेकाचें त्याला भान नसतें ! लेखक बेभान असतो तो या अर्थानें ! जगाला वाटतें आपल्या अस्तित्वाची या स्वारीला दादही नाहीं ! म्हणून तो बेभान झाला आहे असें जग म्हणतें. आणि या अर्थी जगानें म्हणावेंही !

पण म्हणून लेखक लिहितो तें अजाणतां, सहजासहजीं, नकळत लिहितो असें कसें म्हणतां येईल ! असें म्हणणें वेडेपणाचें होईल. लेखक लिहितो तेव्हां आपल्या साऱ्या प्रगट व अप्रगट मानसिक शक्ती एकवटून लिहितो. असें त्यानें लिहिलें तरच त्याच्या लेखनांत दिव्यगुण उत्पन्न होतो. कलाविलासाच्या घटकेला कलावन्त अहेतूकपणें, नाइलाजानें, नकळत कृति करतो, हा समज अगदीं निखालस चुकाचा आहे. उलट, आपल्या कृतींत सहजसौंदर्याचा परमोत्कर्ष साधावा अशा हेतूची व निश्चयाची जबरदस्त आच कलावन्ताच्या, कवीच्या, अगर लेखकाच्या अंतर्यामीं उत्पन्न झालेली असते; व त्यामुळें तो आपल्या प्रयत्नांची व योजकतेची शिकस्त करीत असतो.

म्हणूनच म्हणायचें कीं, ललितकथा दिसते सोपी, पण असते कठीण; आणि ती कठीण असली, तरी तिच्या रचनेचें पृथक्करण करावयास शिकल्यास कथालेखकाच्या कौशल्याचा व खटपटीचा उलगडा अभ्यासू लेखकास करून घेतां येण्यासारखा आहे. नामांकित लेखकांच्या कृतींतील सहजसौंदर्यानें दिपून जाणें हा सामान्य वाचकाचा धर्म झाला. जो नुसता वाचकच नव्हे तर अभ्यासू लेखक आहे. त्यानें त्या सौंदर्याचा उपभोग तर घ्यावाच, पण त्या सौंदर्यानें त्यानें दिपून जाऊं नये. उलट, तें कसें व कां निर्माण झालें तें पाहण्याची सूक्ष्मदर्शक दृष्टि ठेवावी !

• •

[ नं. ३ ]

नामांकित ललितलेखकांचें लेखन वाचतांना त्याच्या सहजसौंदर्याचा उपभोग तर घ्यावाच, परंतु तें सौंदर्य उत्पन्न होण्यास लेखकानें कोणती खटपट केली आहे, व कोणतें कसब योजिलें आहे तें निरखून ठरविण्याचें अवधानही अभ्यासू लेखकानें सुटूं देऊं नये. हा उपक्रम सकृद्दर्शनीं अशक्य वाटेल. आपण सामान्यपणें असें समजतों, कीं, सौंदर्यांचा उपभोग घेण्याची रसिक वृत्ति, आणि त्या सौंदर्याची उपपत्ति लावण्याची शास्त्रीय दृष्टि, या दोन्हींचा मिलाफ होणें शक्य नाहीं; सौंदर्याच्या बाबतींत रसग्राही वृत्ति, आणि पृथक्कारी वृत्ति, दोहोंमध्यें परस्परविरोध आहे. परंतु खरें पाहतां रसिकता व चिकित्सा एके ठिकाणीं नांदणें अगदींच अशक्य नाहीं. किंबहुना रसग्रहणाच्या क्षणीं योग्य प्रमाणांत चिकित्सक बुद्धीचा व्यापार चालू असेल तर रसोद्भव आनंदांत भरच पडते,असा अनुभव आहे. गायक कोणत्या स्वरांस कशीं आंदोलनें देत आहे तें चिकित्सापूर्वक आपण पहात असलों म्हणजे त्याच्या श्रुतिरंजक आलापां-पासून आपल्याला अधिकच आल्हाद होतो. तेव्हां नमुनेदार ललितलेखनाचा रसास्वाद घेतां घेतां त्याकडे जागरूक, सूक्ष्म दृष्टीनें पाहून ज्यायोगें त्या लेखनांत रससिद्धि झाली आहे, त्या लेखकाच्या युक्तिप्रयुक्तींची नोंद करायचा उपक्रम अभ्यासू लेखकानें करावा असें मीं म्हटलें, तर मी कांहीं तरी अव्य-वहार्य सल्ला देत आहें, असें कोणास वाटायचें कारण नाहीं.

ज्या साधनांनीं लेखक आपल्या कलाकृतींत वाचकाचें मन रमवूं शकतो तीं विविध आहेत. कथारचना, व व्यक्तिदर्शन ( Characterisation ) हीं दोन साधनें तर उघडच आहेत; व त्यांसंबंधींची चर्चाही आजवर पुष्कळ झालेली आहे. म्हणून त्यांबद्दल मीं येथें कांहींच लिहूं इच्छित नाहीं. परंतु या दोन साधनांखेरीज इतर अनेक साधनांचा उपयोग नामांकित ललितलेखक करतांना दिसतात, व त्यांकडे अभ्यासू लेखकांचें लक्ष आजपर्यंत कोणी विशेष वेधलेलें नाहीं, म्हणून त्यांविषयीं मात्र लिहावेसें वाटतें.

अशा सहायक साधनांपैकीं मी स्वतः ज्याला सर्वांत अधिक महत्त्व देतों त्याला "**निवेदनपद्धति**" असें नांव देतां येईल. कादंबरीच्या बाबतींत हें लक्षांत

५०८

ठेवलें पाहिजे कीं, तिच्या कथानकाची म्हणून कांहीं तरी गंमत असते, आणि व्यक्तिदर्शनानेंही तिला एक विशिष्ट रंगत आलेली असते. परंतु या दोहोंहून भिन्न व स्वतंत्र अशी " निवेदनपद्धति " म्हणून कादंबरींत एक गोष्ट असते; आणि नीट विचार केला असतां या गोष्टीचें महत्त्व फार मानलें पाहिजे असें दिसेल. इंग्रजींत Narration शब्दाला जो अर्थ आहे, त्या अर्थानें मी " निवेदनपद्धति " हा शब्द वापरीत आहें. ललितकथेंतील विविध घटना तर वाचकाचें चित्त गुंगवीत असतातच, आणि व्यक्तिदर्शन रेखीव व जोरदार साधलें असेल तर वाचक लुब्ध होऊन जातोच. परंतु या दोन साधनांहून वेगळेंच असें वाचकाच्या मनाची पकड घेणारें जें एक साधन नामांकित लेखकांनीं परिश्रमपूर्वक वापरलेलें दिसतें तें म्हणजे " **निवेदनकौशल्य** "

निवेदनकौशल्य म्हणजे भाषाशैली असा वाचकांनीं घोंटाळा होऊं देऊं नये. भाषाशैली हा एक आणखी निराळाच, स्वतंत्र गुण आहे; आणि त्याचीहि चर्चा जुनी असल्यामुळें ती मी करणार नाहीं. निवेदनकौशल्य म्हणजे भाषेची ऐट नव्हे, तर **सांगण्याची ऐट.** ही ऐट ज्यांच्या लेखणींत असते ते लेखक कादंबरींतील मोठमोठ्या घटना सांगूं लागले, व व्यक्तींचे ठळक स्वभावगुण वर्णन करूं लागले, म्हणजे तर त्यांच्या जादूनें आपण भारले जातोंच, पण अगदीं लहानसहान गोष्टीही सांगण्यास त्यांनीं प्रारंभ केला, तरी वाटतें, ऐकावें! आगगाडी स्टेशनमध्यें आली येवढेंच ते सांगत असतील, अमुक एक स्त्री जागी झाली ती जरा आळसानेंच शय्येवरून उठली येवढेंच त्यांना सांगावयाचें असेल, एक कुत्रा त्याचा धनी येतांच लडिवाळपणें पुढें झाला इतकाच उल्लेख त्यांना करावयाचा असेल, किंवा अमुक एका पुरुषानें मोठ्या घाईघाईनें पोषाख केला येवढीशीच गोष्ट ते नमूद करीत असतील. परंतु तें सांगतांना ते अशा कांहीं चटकदार रीतीनें सांगतील कीं, हिरकणीचे कण चमकावे त्याप्रमाणें तीं छोटीं छोटीं स्थळें निरंतर चमचमत रहावींत! आणि हें सारें भाषेचा चडिवार न करतां, आणि पाल्हाळ न करतां! किंबहुना या दोन्ही गोष्टी आपल्या निवेदनांत येऊं न देण्याचीच नामांकित कादंबरीकार फार खबरदारी घेतात. अगदीं क्षुल्लक गोष्टी अगदीं थोडक्यांत, आणि अगदीं भाषावडंबर न माजवितां चटकदार तऱ्हेनें सांगण्याचें जें कसब त्याला मी " निवेदनकौशल्य " अशी संज्ञा देतों.

नं. ६८७

दोन उदाहरणें देतों म्हणजे मी काय म्हणतों तें वाचकास स्पष्ट कळेल. माझ्या आवडीच्या कादंबरीकारांच्या लेखनांतून अगदीं उत्तमांतलीं उत्तम स्थळें निवडून तीं येथें देतां आलीं असतीं तर माझें स्वतःचें समाधान अधिक झालें असतें. पण या घटकेला तीं सगळींच पुस्तकें माझ्याजवळ कशीं असणार ? तेव्हां जीं माझीं आवडतीं पुस्तकें माझ्या हाताशीं आहेत त्यांतलेच उतारे देतों.

D. H. Lawrence या लेखकाची " The Lost Girl " म्हणून एक कादंबरी आहे. त्या कादंबरीच्या प्रारंभीं नायिका Alvina (आल्व्हिना) हिचे विविध प्रणयानुभव लॉरेन्स यानें वर्णिले आहेत, ( प्रणय म्हणतांच बिचकणाऱ्या सोवळ्या वाङ्मयभिक्षूंनीं हें माझें बोलणें ऐकूं नये ! ) व त्या अनुभवांची तिच्या स्वभावावर व चरित्रावर कशी कशी प्रतिक्रिया घडली, तें फार सुंदर रीतीनें दाखविलें आहे. कादंबरीच्या पांचव्या प्रकरणांत Albert नांवाच्या एका तरुणाच्या प्रियाराधनाचा कांहीं काळ उपभोग घेऊन अखेर तो आपल्या मनाजोगा नाहीं असें वाटून ती त्याचा कायमचा अव्हेर करते, व एखादी नोकरी पत्करून आपलें दुःखी मन कामांत गुंतवावें असें ती ठरविते; पण हेंही तिला धड साधत नाहीं. त्या वेळीं Lawrence नें कसें लिहिलें आहे पहा --

" प्रणयविनाशाचें दुःख शमवायासाठीं एखादी नोकरी पहावी आणि कामांत, काबाडकष्टांत बुडून जावें असें आल्व्हिनाच्या मनांत येई. पण उलट, त्याबद्दल ती खरोखरच विचार करूं लागली, कीं काबाडकष्टाचें कल्पनाचित्रही तिला भयानक वाटे ! नोकरी ! ताबेदारी ! काम ! छे ! आल्बर्टचा तिला तिटकारा आला होता, तद्वतच त्या काबाडकष्टाच्या कल्पनेचीही तिला शिसारी येई ! आणि ती विचारच करूं लागली, कीं आपल्याला आल्बर्टचा खरोखरच तिटकारा आला होता कीं नाहीं याचाही तिला निश्चय वाटेनासा होई ! तिला वाटे, आल्बर्ट तिरस्करणीय नव्हता ! विचित्र होता येवढेंच ! कांचेच्या हंडींतल्या पाण्यांतल्या मासळीला बाहेरून हंडीला नाक लावून पाहणारा माणूस वाटावा तसा तो तिला विचित्र वाटला होता ! पण तो विचित्र असेना ? त्याच्याशीं आपण लग्न केलें असतें तर काय बिघडलें असतें ? विचित्र माणसाशीं का होईना संसार केल्याचा अनुभव तरी मिळाला असता ! असला संसार म्हणजे गुलामगिरीच ! पण नोकरी म्हणजे तरी दुसरें काय ? महिनाभर रोजंदारी

करावयाचा, अन् पाचपन्नास रुपड्या हातीं द्यायच्या! शीः! मग त्यापेक्षां एखाद्या पुरुषाचं राजरोस गुलाम झालेलं काय वाईट?... असले विचार करीत ती अंथरुणावर पडे, आणि रस्त्यावरच्या दिव्याचा कवडासा तिच्या खोलींत एका भिंतीवर पडलेला असे त्याकडेच खुळ्यासारखी तासन्तास पाहत राही!..."

दुसरें एक उदाहरण देतों. "ग्रँड हॉटेल" नांवाची जगभर गाजलेली ललितकथा लिहिणाऱ्या Vicki Baum या जर्मन स्त्रीची "Results of an Accident" नांवाची एक कादंबरी आहे. सुखविलासाच्या व बौद्धिक आनंदाच्या साऱ्या कल्पनांचा कोंडमारा सहन करीत, काबाडकष्टांत हाडाचीं काडें करीत काळ कंठणाऱ्या एलिझाबेथ नांवाच्या एका विवाहित स्त्रीचें कलासक्त अंतःकरण, डॉक्टरचा धंदा करणाऱ्या व शास्त्रीय संशोधनाच्या छंदांत प्रेम, सुख, संसार, इत्यादि साऱ्या गोष्टी विसरून विक्षिप्त बनलेल्या पतीच्या सहवासांत कसें सुकून गेलें होतें, व कांहीं एका घटनेमुळें तिचें तें हृदयपुष्प अल्पकाल कसें प्रफुल्लित झालें, त्याचें मोठें मार्मिक व मोहक चित्र व्हिकी बॉमनें या कादंबरींत काढलें आहे. या कादंबरीची सुरुवात तिनें कशी केली आहे ती पहाः—

"तें घर इतकें जुनाट होतें कीं, डॉक्टर पर्सन्थाइन् ज्या खोलींत निजे तिची भुई एकीकडे कलंडल्यासारखी झाली होती. डॉक्टरीणबाईच्या मनाला अनेक चिंता होत्या तशी त्या भुईचीही तिला मोठी चिंता वाटे. खोलींतले पलंग उतरते रहात, आणि दमून भागून त्यांत निजलें कीं माणूस झोंपेंत गरंगळून पायगतीं येऊन पडे. डॉक्टरीणबाईला आधींच कधीं मोठी गाढ झोंप लागत नसे, आणि त्यांत या अंथरुणाच्या गैरसोयीची भर पडल्यानें तिच्या झोंपेंत आणखी व्यत्यय येई. कधीं कधीं आपण डोंगरावरून घसरत आहों असें भयंकर स्वप्न तिला पडे. अशा स्वप्नाच्या वेळींच कोणी बाहेरच्या दारावरची घंटा वाजविली व तिला उठावें लागलें, म्हणजे डोंगरावरून घसरत असल्याचा तो भयंकर अनुभव निद्रेंतला कीं अर्धवट जागेपणांतला हें तिला कळेनासें होई. शेजारीं पतिराज आहेत कीं नाहीं तें ती चाचपून पाही. ते तेथें नसत. दार उघडण्यासाठीं जातां जातां नवऱ्याच्या कामाच्या खोलींत ती डोकावून पाही.

आज तिनें तसें पाहिलें तों खोलींत दिवा जळतच होता. एका डॉक्टरी मासिकाच्या अंकावर हात व मस्तक टेंकून डॉक्टर पडले होते. त्यांना झोंप

लागली असावी. त्यांचे तुरळक, रेशमी धाग्यासारखे दिसणारे केंस, व त्यांच्या मस्तकाचें केशहीन कातडें त्या प्रकाशांत किंचित् चमकत होतें. हत्यारें उकळण्याच्या चकचकीत यंत्रांत डॉक्टरचें प्रतिबिंब दिसत होतें. किती लहानसें, पण किती हुबेहुब होतें तें! अतिश्रमानें विगलित झालेले खांदे, पुन्हां पुन्हां हात धुवून धुवून ज्यांचें कातडें खरखरीत झालेलें आणि फुटलेलें आहे असे मोठाले पंजे, आणि खुरट्या नखांचीं हाडकुळीं, लांबट बोटें या सार्‍या गोष्टी त्या प्रतिबिंबांत दिसत होत्या... ''

निवेदनाचा असला चटकदारपणा ललितकथेचा एक अत्यंत महत्त्वाचा गुण होय. कथानक चित्ताकर्षक होणें न होणें हें त्यामुळें उत्पन्न होणार्‍या विस्मय व उत्कंठा या दोन गुणांवर अवलंबून असतें; आणि व्यक्तिदर्शन परिणामकारक होणें न होणें हें सुसंगतीवर व परिपोषावर अवलंबून असतें; परंतु चटकदार निवेदनाची रंजकता मात्र स्वयंसिद्ध व निरपवाद आहे. सुंदर कथानकास व व्यक्तिदर्शनास अधिकच रमणीय करण्याची शक्ति असल्या निवेदनकौशल्यांत असते हें तर झालेंच, पण कादंबरीचा किंवा लघुकथेचा प्रारंभींचा कांहीं भाग तर या कौशल्यावरच बहुतांशीं सजवायचा असतो. कारण, तो प्रारंभींचा भाग वाचतांना वाचकांचें चित्त कथाप्रसंगांनीं वेधलेलेंच असतें, किंवा पात्रांच्या स्वभाववर्णनांत रमलेलेंच असतें असें नाहीं. म्हणून त्या वेळीं वाचकाच्या मनावर पकड ठेवण्याची कामगिरी निवेदनकौशल्याच्या बळावरच पार पाडायची असते.

आधुनिक पाश्चात्य लेखकांच्या लेखनांत हें कौशल्य फार प्रामुख्यानें दिसून येतें. गाय द मोपासाच्या अंगीं हें कसब पुरेपूर आहे. त्याच्या बर्‍याच कादंबर्‍या व गोष्टी इतर दृष्टींनीं मध्यमच ठरतील, पण अगदीं साध्यासुध्या गोष्टी तो सांगूं लागला तरी वाटतें, ऐकावें! निवेदनकौशल्याचें महत्त्व मराठी कादंबरीकारांस व लघुकथालेखकांस अजून पुरेसें पटलेलें दिसत नाहीं. म्हणून उदयोन्मुख लेखकांनीं तरी तें कौशल्य अवश्य संपादावें असें मी त्यांस सुचवितों.

[ नं. ४ ]

अनेकविध लाघवी उपायांची हेतुपूर्वक योजना करून ललितकथालेखक वाचकाचें चित्तहरण करीत असतो. त्याचे हे परिश्रम साध्याभोळ्या वाचकाच्या ध्यानांत येणें शक्य नसतें; कारण कथाश्रवणाच्या आनंदांत तो रमून जातो. परंतु कथेच्या मांडणिकडे, गतीकडे, व अंगोपांगांकडे सूक्ष्म दृष्टीनें पहावयाचें ठरविल्यास लेखकानें वापरलेलीं विविध साधनें अभ्यासू व जिज्ञासू लेखक वाचकाच्या ध्यानांत यावयास फारसा त्रास पडणार नाहीं. नामांकित लेखक ललितकथा लिहितात त्यांत स्फूर्तीचा अंश पुष्कळच असतो, याबद्दल वाद नाहीं; परंतु याचा अर्थ असा नव्हे, कीं अत्युच्च कोटीचें ललितलेखन एकदम आभाळांतून पडल्यासारखें अवतरतें. पाना फुलावांचून फळ यावें तशांतली थोडीच त्या लेखनाची गोष्ट आहे ? त्याच्याही बुडाशीं विशिष्ट साधनांचा उपयोग, आणि हेतुपूर्वक केलेली खटपट, या गोष्टी असतातच आणि या गोष्टींची उघड चर्चा ललितलेखक स्वतः केव्हां तरी करतील अशी वाट पहात राहण्याचेंही अभ्यासू वाचकाला कारण नाहीं; कारण लेखकानें निर्माण केलेल्या ललितकथा प्रसिद्ध होऊन जगापुढें आल्या कीं, खरें पहातां लेखकानें आपली झांकली मूठ उघडल्यासारखेंच होतें. त्याच्या बहुतेक युक्त्याप्रयुक्त्या अनावृत होतात. “ज्यांना डोळे असतील त्यांनीं माझी जादुगिरी पाहून घ्यावी, ज्यांना बघतांच येत नसेल त्यांच्यासाठीं मी काय करूं ?” असेंच जणूं ललितलेखक आपली कृति प्रसिद्ध करतांना म्हणत असतो.

ललितलेखनाची क्रिया आंधळी व अहेतुक नसते हें जसें मीं कटाक्षानें प्रतिपादूं इच्छितों, त्याचप्रमाणें कादंबरीकार, नाटककार अथवा गोष्टी लिहिणारा ज्या ज्या वेळीं कलाकृति निर्माण करतो त्या त्या वेळीं तो आपल्या चतुराईचा आणि खटपटीचा परिस्फोट करीत असतो असेंही मीं निःशंकपणें म्हणतों. हा परिस्फोट अपरिहार्य आहे. लेखकाला तो टाळतांच येणार नाहीं. गायकाचें गाणें चालू असतांना त्याच्या त्या गायनाला कमालीचें रंजकत्व ज्यामुळें प्राप्त झालेलें असावें ते सर्व तंत्रविशेष ज्याप्रमाणें सहजासहजीं प्रगट होतात, तद्वतच ललित-

कथेचें आहे. आपण कोणत्या सुरांना कशीं आंदोलनें देतों, कोणत्या स्वरांचे विवाद-संवाद पाळतों, तऱ्हेतऱ्हेच्या लयींनीं तालाशीं कशी क्रीडा करतों, इत्यादि गोष्टी जाणत्या व सूक्ष्म श्रुतीच्या श्रोत्यापासून गायक कितीशा लपवूं शकेल ! ललितकथेची गोष्ट अशीच आहे. त्या त्या नामांकित कथालेखकाची जादुगिरी कधींच कोणाला साध्य होणें शक्य नाहीं यांत तर संशय नाहींच, पण पृथक्कारी दृष्टीनें, सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्याप्रमाणें, ललितकथेचें वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यापासून त्या जादुगिरीचें सामान्य साहित्य लपवून ठेवणें लेखकास शक्य नाहीं यांतही शंका नाहीं.

ही खात्री असल्यामुळेंच महत्त्वाकांक्षी लेखकांनीं उपलब्ध उत्कृष्ट कादंबऱ्या कोणत्या दृष्टीनें वाचाव्या तें सांगावेंसें मला वाटतें. तें सांगतांना जुन्या विषयांची चर्चा टाळण्याचा कटाक्ष ठेवून, अगदीं नव्या अशा कांहीं गोष्टींकडे उद्योन्मुख लेखकांचें लक्ष वेधतां आलें तर वेधावें अशी माझी इच्छा आहे. म्हणूनच मी मागच्या लेखांत निवेदनकौशल्याबद्दल लिहिलें. आतां या कौशल्यास पोषक असें दुसरें एक, दिसायला लहानसेंच पण परिणामीं फार महत्त्वाचें, चातुर्य नामांकित कादंबरीकारांनीं संपादिलेलें असतें, त्याबद्दल थोडक्यांत लिहितों.

हें चातुर्य म्हणजे **कादंबरींत ठिकठिकाणीं सामान्य सिद्धांत व सुभाषितें विखरून ठेवण्याचें चातुर्य होय.**

अशा सुभाषितांनीं व सिद्धांतांनीं वाचकांच्या अंतःकरणाला एक प्रकारचा सूक्ष्म आल्हाद होतो. कादंबरींतील एखादा सुखकारक अगर कारुण्यपूर्ण प्रसंग वाचण्याच्या ओघांत वहात जाणाऱ्या वाचकास त्या प्रसंगाच्या अखेरीस लेखकानें एखादें सुभाषित अगर सिद्धांत ऐकविला, कीं वर्णित प्रसंगानें उचंबळलेल्या वाचकांच्या वृत्तींना कांहीं एक अनुपमेय समाधान लाभल्यासारखें होतें.

समजा, एखाद्या श्रीमंत, घरंदाज कुळांतल्या तरुणाचें एखाद्या अकुलीन तरुण मुलीवर प्रेम बसलें आहे, व त्याबद्दल त्याचा पिता त्याची निर्भर्त्सना करीत असल्याचा प्रसंग आपल्याला कादंबरींत घालावयाचा आहे. या प्रसंगाचें चित्र रेखाटण्याची नेहमींची एक पद्धति ठरलेली आहे, व तीप्रमाणें आपण लिहिल्यास आपलें वर्णन थोडें फार परिणामकारक होईलच; पण या प्रसंगासाठीं पितापुत्रांमधील निकराच्या संवादाचीच केवळ योजना करण्याऐवजीं, त्या संवा-

द्यांच्या अखेर आपण आपलें म्हणून एखादें मार्मिक सिद्धान्ततुल्य विधान केलें तर आपल्या वर्णनाचा वाचकाच्या मनावर होणारा परिणाम दसपटीनें वाढेल. समजा आपण पुढीलप्रमाणें लिहिलें:--

"श्रीकान्ताच्या वडिलांना या संवादापासून मनस्वी त्रास झाला होता. अखेर संतापातिशयाच्या स्वरानें त्यांनीं विचारलें,

"एकूण माझ्या भावनांची तुला कांहींच किंमत नाहीं तर !"

"असं कसं म्हणतां ? आपला रुकार मिळवायची माझी इच्छा होती, याचा अर्थ असा होतो काय !"

"पण तो रुकार मीं देत नाहीं त्यांचीही तुला फिकीर नाहीं !"

"कारण मी सरस्वतीला लग्नाचें वचन दिलेलं आहे."

"ठीक आहे. वचन दिलं आहेस तर तें पाळ. पण आजपासून तूं माझा कोणी नाहींस, अन् मी तुझा कोणी नाहीं हें नीट लक्षांत ठेव. माझ्या संपत्तींतली एक कपर्दिकही तुला मिळायची नाहीं ! दारिद्र्याची झळ लागली, कीं सरस्वतीचें तुझ्यावरचें प्रेम किती दिवस स्थिर राहील तें पाहूं दे जगाला !—"

असें म्हणून श्रीकान्ताचे वडील आंतल्या खोलींत गेले व त्यांनीं दार धाडदिशीं ओढून घेतलें. त्यांना मनांत वाटलें, आपण शेवटीं श्रीकान्ताला जी दहशत घातली तिनें त्याचे प्रणयांध डोळे खाडदिशीं उघडतील.

किती वेडा हिशोब हा !--पण जगाच्या प्रारंभापासून आईबाप असाच हिशोब करीत आले आहेत ! आणि खऱ्या प्रीतीनें उन्मत्त झालेल्या प्रियजनांनीं हे हिशोब नेहमीं खोटे ठरविले आहेत ! प्रीतीला दारिद्र्याचा धाक घालून काय उपयोग !"

या शेवटच्या सुभाषितामें साऱ्या वर्णनाला एक नवीनच बहार येईल, व वाचकाला विलक्षण आनंद होईल.

सुभाषितांचें व सिद्धान्तांचें महत्त्व युरोपिअन कादंबरीकारांनीं जाणलेलें आहे, व ते आपल्या निवेदनांत त्याची फार मार्मिकपणें योजना करतात. माझ्या हाताशीं असलेल्या कादंबऱ्यांतून कांहीं उदाहरणें देतों:--

(१) "प्रेम कां बसतें तें कधीं कोणाला सांगतां यायचें नाहीं. किंबहुना, ज्या आकर्षणाची मीमांसा करतां येत नाहीं तेंच प्रेम; आणि म्हणूनच असलें

प्रेम ज्या व्यक्तीविषयीं वाटूं लागतें ती नुसती सन्निध असली तरी जिवाला कसें समाधानाच्या पुष्पशय्येवर पडल्यासारखें वाटतें. "

( "Festival" : Struthers Burt )

( २ ) "ज्याला समाधान म्हणतात तें या संसारांत मिळत नाहीं; त्याचीं फक्त स्वप्नेंच आपल्याला पडत असतात." ( "Awakening" : Moupassant)

( ३ ) " तरुणांची अन् आईबापांची जेव्हां चकमक उडते तेव्हां आई-बापांच्या मनाला किती क्लेश होतात त्याची तरुणांना कल्पनाच नसते. त्यांना वाटतें आईबाप छळ करताहेत अन् आपला छळ होतो आहे; जो छळ करतो त्याला दुःख कोठलें ? " ( "Greenbanks": Miss Whipple )

( ४ ) " साऱ्याच मानवजातीची ही स्थिति आहे. प्रत्येकाला वाटत असतें, आपण आपल्या दैवावर सत्ता चालवीत आहोंत; पण खरें म्हणजे दैव न कळत त्याला हांकीत असतें आणि तो चालत असतो !"

( "Helene" : Vicki Baum )

( ५ ) " पापकृत्यांचें असेंच आहे. प्रथम त्याबद्दल शरम वाटते, व अनुताप होतो. पण मोहामुळें पुनःपुन्हा अधःपात होत राहतो, आणि अखेर शरम व अनुताप, दोन्हींही नाहींशीं होतात । " ( "Yama" : Kuprin )

हीं सुभाषितें त्या त्या लेखकांनीं निवेदनाच्या प्रवाहांत कशीं खुबीनें सोडून दिलीं आहेत तें मला विस्तारानें पूर्वापर संबंध व वर्णनें देऊन सांगतां आलें असतें तर वाचकांस माझ्या प्रतिपादनाचा आनंद अधिक घेतां आला असता; पण स्थलाभावास्तव तसें करतां येत नाहीं. माझ्या म्हणण्यांतील मुख्य मर्म वाचकांनीं ध्यानांत घ्यावें म्हणजे झालें. ललित-कथेंत ठिकठिकाणीं मार्मिक सिद्धान्त व सुभाषितें पेरल्यानें निवेदनाला एक अपूर्व परिणामकारित्व आणि आल्हादकारित्व प्राप्त होतें. रात्रीच्या वेळीं एखाद्या सुंदर बगीचांत ठिकठिकाणीं अपारदर्शक, दुधरंगी कांचेचे विद्युद्दीप लावले म्हणजे ते स्वतः रमणीय दिसतात व एकंदर उद्यानाचें रमणीयत्वही वाढवितात. कादंबरींतलीं सुभाषितें या दीपांप्रमाणें होत ! आणि, आणखी एक गोष्ट सांगूं ?—

कादंबरींत बोधानें अगर उपदेशानें वावरायचें असेल तर तें अशा सुभाषितांच्या अगर सिद्धान्तांच्या रूपानेंच वावरावें । कारण, तसें केल्यानेंच वाचकांच्या मनांत किती तरी सत्य तत्त्वांचा एकदम प्रकाश पडतो.

## नं. ५

एखादा सुंदर बगीचा पाहिला म्हणजे त्याची नयनमनोहर मांडणी, आणि त्या त्या वृक्षलतांचें विशेष सौंदर्य हीं त्याचीं महत्त्वाचीं दोन अंगें होत हें सामान्यपणें कोणासही कळतें, व त्यांपासून होणाऱ्या आल्हादांत रममाण होण्याची सामान्यपणें प्रत्येक माणसाची वृत्ति असते; परंतु वास्तविक पाहतां या दोन ठळक गोष्टींहून निराळ्या आणि महत्त्वाच्या अशा किती तरी लहान-सहान गोष्टी असतात, कीं त्यामुळें त्या क्रीडोद्यानाला विशेष शोभा आलेली असते. वाटिकांच्या दुतर्फा लावलेली व सफाईनें कापलेली हिरवळ, मध्येंच नाना आकृतींत बसविलेले शिंपले, लहान लहान लताकुंज, छोट्या कृत्रिम पाणवठ्यांत सोडलेले रंगीबेरंगी मासे, अशा अनेक युक्तिप्रयुक्तींनीं बाग करणारानें तिला नट-विलेली असते. त्या युक्त्याप्रयुक्त्या सामान्य माणसाला चटकन् कळत नाहींत. किंबहुना तो गमतीनें विहार करायला आलेला असतो; विचार नव्हे. त्यामुळें त्याचें लक्ष त्याकडे जातच नाहीं. पण आपणही एखादी छोटी बाग करूं अशा बुद्धीनें तेथें आलेल्या मनुष्यानें मात्र नुसता विहारच नव्हे, तर विचारही केला पाहिजे. तसा विचार त्यानें केला तर जें तो शोधीत असतो तें त्याला दिसणें अवघड नाहीं.

कादंबरीचें असेंच आहे. तिची सजावट केवळ कथारचना आणि व्यक्ति-दर्शन यांच्या योगानेंच साधलेली नसते. हीं त्या सजावटीचीं दोन प्रमुख साधनें आहेत हें तर खरेंच, परंतु त्यांखेरीज इतर किती तरी सूक्ष्म साधनांचा उपयोग कसलेले लेखक नेहमीं करतात. एखादी स्त्री जेव्हां पुरुषास मोहिनी घालते तेव्हां तिची रूपसंपदा आणि तिच्या स्वभावाची माधुरी यांनींच मुख्यतः पुरुष आकर्षिला जातो हें जरी खरें, तरी या दोहोंहून इतर कितीतरी सूक्ष्म लाघवांची योजना चतुर कामिनीकडून होत असते कीं नाहीं, तें तिलाच विचारावें. कादंबरीच्या गोडीची हीच रीत आहे. अनेक लहान लहान साधनें वापरून लेखक आपल्या कृतीवर कलाकुसर करीत असतो. अभिज्ञ आणि चौकस दृष्टि ठेवून या साधनांचा शोध, अभ्यास, व सराव करावा असें माझें सर्व तरुण लेखकांस कळकळीचें सांगणें आहे; व त्या बाबतींत थोडीशी

दिशा दाखविण्यासाठीं लेखकांच्या कांहीं लाघवांची चर्चा मी करीत आहें. **निवेदनकौशल्य** व **सुभाषितयोजना** या दोहोंबद्दल पूर्वीं लिहिलें. तसल्याच आणखी एका सहाय्यक साधनाबद्दल येथें लिहितों.

तें साधन म्हणजे **सुंदर संवाद.**

माझ्या ' प्रतिभासाधन ' ग्रंथांत संवादाविषयीं लिहितांना असें म्हटलें आहे, **कीं,** वाचकांना कथानकांतील घटना सांगण्याची ती एक पद्धति आहे. प्रतिबिंब पद्धति असें नांव मीं त्या ग्रंथांत संवादलेखनास दिलें आहे. परंतु या ठिकाणीं मला जें संवादाबद्दल लिहावयाचें आहे तें जरा निराळ्या दृष्टीनें. दोन अगर अधिक पात्रांतील संभाषणांच्या साहाय्यानें अमुक अमुक गोष्टी घडल्या असें कादंबरीलेखक पुष्कळदां वाचकांस सांगतों हें तर झालेंच; व या दृष्टीनें संवाद हें एक कादंबरीचें महत्त्वाचें उपांग आहे हें तर खरेंच; पण असल्या **'वार्तावाहक'** संवादाविषयीं मला येथें लिहावयाचें नाहीं. नामांकित लेखकांच्या कादंबऱ्या वाचल्या कीं त्यांच्या कादंबरींत असे कांहीं ' वार्तावाहक ' संवाद तर असतातच, पण दुसरे असे पुष्कळसे छोटे छोटे संवाद असतात, कीं ज्यायोगें अमुक घटनेचा आपल्याला बोध होतो असें नाहीं, पण जे इतके मनोवेधक व मार्मिक असतात, कीं ते आपल्याला चटका लावून सोडतात. असल्या संवादांकडे अभ्यासू लेखकांनीं अवश्य लक्ष पुरवावें.

एक तर असें, कीं कादंबरी लिहितांना लेखकानें आपणच सारखें वाचकांशीं बोलत राहूं नये. लेखकाचें कथनचातुर्य कितीही असामान्य असलें तरी त्याचाच आवाज सारखा ऐकत राहण्याची पाळी आली, कीं झोंपेला आलेलीं मुलें नीरस कहाणी ऐकतांना ' हुं ' कार द्यायचा विसरून पेंगूं लागतात तशी वाचकांची अवस्था होण्याचा संभव फार असतो. हें जाणून चतुर लेखक पुन्हां पुन्हां कथानकाचें निवेदन बंद ठेवून गोष्टींतल्या स्त्रीपुरुषांसच वाचकांपुढें उभीं करतो. त्या स्त्रीपुरुषांच्या संवादावरून अमुक एका लहान अगर मोठ्या घटनेचा बोध वाचकांस व्हावा असा लेखकाचा हेतु असतोच असें नाहीं. त्या संवादांत वाचकांना बातमी अशी कोणतीच कळत नाहीं; पण ते असे चातुर्यानें रचिलेले असतात कीं त्यांपासून वाचणाऱ्याला फार आल्हाद होतो, व शिवाय त्याला वाटतें, किती चतुर आणि

४८७५

मधुरभाषी आहेत ही सारी मंडळी ! यांचें पुढें काय झालें तें पाहिलेंच पाहिजे! आणि या विचारानें तो नवप्रज्वलित जिज्ञासेनें पुढें वाचूं लागतो.

कोणत्या प्रकारच्या संवादांची मी शिफारस करीत आहें तें वाचकांनीं नीट ध्यानांत घ्यावें. अमुक घडलें अशी वार्ता वाचकांच्या कानावर घालणारे संवाद निराळे, किंवा अमुक एका प्रश्नाची उलटसुलट बाजूंनीं व थोड्या फार गंभीरपणें चर्चा करणारे संवादही निराळे, आणि ज्या प्रकारच्या संवादांनीं कादंबरीच्या रमणीयत्वांत भर पडते असें मी म्हणतों ते निराळे. हे संवाद **वार्ताहारकही** नसतात, किंवा **चर्चात्मकही** नसतात. त्यांत कथानकाचा अगर प्रतिपादनाचा जड मालमसाला मुळींच नसतो; पण म्हणूनच हलक्या आणि खुसखुशीत पदार्थांप्रमाणें त्यांची रुचि अवीट असते.

एक उदाहरण देतों म्हणजे माझ्या म्हणण्याचा अर्थ वाचकांच्या ध्यानांत बरोबर येईल. नुकेच दिवंगत झालेले मि. जॉन गाल्सवर्दी यांच्या नव्या Flowering Wilderness नांवाच्या कादंबरींत Dinny नांवाच्या तरुणीचें Wilfrid Desert नांवाच्या तरुणावर प्रेम बसतें. विलफ्रिड हा कवि असतो, व आपल्या नव्या कवितासंग्रहाचें हस्तालिखित तो डिनीला वाचावयास देतो. त्या संग्रहांतील " चित्ता " नांवाच्या कवितेंत त्यानें आपल्या स्वतःच्याच आयुष्यांतील एक करुणकहाणी ग्रथित केलेली असते. तो संग्रह वाचल्यानंतर ज्या वेळीं डिनी विलफ्रिडला भेटते तेव्हां त्यांच्यामध्यें संवाद होतो तो असाः—

" वाचल्यास का कविता ? "

" हो... "

" काय, कशा ?... "

" छान आहेत. "

" खरं ? "

" खरंच. त्यांतली एक तर फारच सुंदर झाली आहे. "

" कोणती ? "

डिनी हंसली. जणूं तिनें म्हटलें, " शाबास, तुम्हीं विचारावं ! "

" चित्ता ? " विलफ्रिडनें विचारलें.

" हो. ती वाचीत असतां या इथें मला वेदना झाल्या. "

"मग ती संग्रहांतून वगळून टाकूं कीं तूं जें सांगशील तें मी टाकून देईन."

"मग ती नाहींच वगळतां कामा! तुमच्या सगळ्या कवितांत ती सरस ठरेल."

"इनशाल्ला!"

"तिच्याविषयीं तुम्हांला कां शंका असावी?"

"तिच्यांत लपवाछपव अगदीं नाहीं. ती अगदीं नागवी उघडी आहे म्हणेनास?"

"हो आहे." डिनीनें म्हटलें, "पण सुंदर आहे. कोणतीही गोष्ट उघडा-उघड असली कीं, सुंदर असायचीच."

"असं समजायची रीत नाहीं, वेडे."

"पण मीं तर म्हणतें अंग वेडंवाकडं किंवा घाण असलं म्हणजेच तें झांकावसं वाटतं ना?"

"पण आंत घाण ठेवणं अन् बाहेर ती झांकणं हेंच जगाला आज आवडतं आहे. तिथें लहान, मुग्ध बालकांचं कोण ऐकतो?"

"तुमचं म्हणणं, कवी हे मुलासारखे असतात?"

"नसतात कां?

"हो, लटक्या खेळण्यांत ते रमतात त्या अर्थीं असतात खरे."

बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांतही चटकदार संवादांची लयलूट सांपडते. किंबहुना सामान्यपणें असेंही म्हणतां येईल, कीं लहान लहान चतुर संवादांचें महत्व मराठी लेखकांपेक्षां बंगाली लेखकांनीं किती तरी पटींनीं अधिक जाणलें आहे, व ते त्यांचा उपयोग मुक्त हस्तानें करतात. बंकिमचंद्रांच्या "विषवृक्ष" कादंबरींत कमलमणी व श्रीशचंद्र या पतिपत्नींमधील ठिकठिकाणचे संवाद इतके मोहक साधले आहेत, कीं, ती कादंबरी केव्हांही हातीं आली कीं मी तर तेच पुनःपुन्हां वाचतो. कमलमणीच्या भावानें एका विधवेवर अनुरक्त होऊन आपली पत्नी सूर्यमुखी हिचा छळ मांडला तेव्हां सूर्यमुखीनें नवरा सुखी व्हावा म्हणून आपल्या हातांनीं त्याचा त्या विधवेशीं विवाह लावून देण्याचें ठरविलें, व कमलमणीस तसें कळविलें. तें पत्र जेव्हां कमलमणीच्या हातीं आलें तेव्हां त्याचा अर्थच तिच्या ध्यानीं येईना. म्हणून नवरा घरीं येतांच तिनें पत्र पुढें केलें, व त्यास म्हटलें,

"या पत्राचा नीट अर्थ लावून सांगितला तर ठीक आहे; नाहीं तर या महिन्याचा पगार नाहीं मिळणार !"

श्रीश०—अगोदर पगार हातीं टाका, मग अर्थ लावण्यांत येईल.

कमलनें तोंड जवळ नेलें, श्रीशनें पगार वसूल करून घेतला, व मग पत्र वाचून म्हटलें,

" ही तर निवळ थट्टा आहे."

कमल०--कोणती ? आपलं बोलणं कीं पत्र ?

श्रीश०--पत्रांतला मजकूर.

कमल०--आपणांस मंत्रिपदावरून बडतर्फ करतें. समजली आपली अक्कल ! अशी थट्टेची भाषा बायकांच्या तोंडीं कधींतरी येईल कां ?

असल्या संवादांत एक विशेष गुण असतो तो हा, कीं त्यांत **नाट्य** असतें. कादंबरी ही नाटकाहून निराळी खरीच, कादंबरी म्हणजे लिहिणारानें सांगितलेली कथा आणि नाटक म्हणजे पात्रांच्या संवादांनीं व कृतींनीं उघड होणारी कथा हें तर खरेंच; पण कादंबरींत शक्य तेवढा नाट्यगुण असावा हेंही निरंतर ध्यानांत वागवावें. मी म्हणतों तसल्या संवादांनीं तो उत्पन्न होतो. शिवाय, असें संवाद वाचले, कीं ते ज्या पात्रांच्या तोंडीं असतात त्यांविषयीं आपुलकीची प्रीति वाचकांच्या मनांत इतर कोणत्याही साधनानें होणार नाहीं इतकी उत्पन्न होते. चतुर भाषण कोणाला प्यार नाहीं ? आणि तें करणारीं माणसें कोणाची प्रीति संपादणार नाहींत ? म्हणून निदान कादंबरींतल्या नायकनायिकांच्या तोंडीं तरी असे चित्तवेधक मार्मिक संवाद कादंबरीकारानें अवश्य घालावे.

असल्या संवादांनीं वाचकाच्या चित्तास आल्हाद होतो तो कां तें पाहण्यासारखें आहे. आपण चित्रपट पाहतों तेव्हां पात्रांचे फोटो कधीं खूप अंतरावरून, कधीं साधारण मध्यम अंतरावरून, आणि मधूनच अगदीं जवळून घेतलेले दिसतात. या शेवटच्या प्रकारच्या फोटोग्राफ्सना सिनेमाच्या परिभाषेंत "क्लोज-अप्स" अशी संज्ञा आहे. मी म्हणतों त्या प्रकारचे संवाद म्हणजे कादंबरींतील "क्लोज-अप्स" आहेत म्हणा ना ! ते वाचले कीं वाचणाऱ्याला वाटतें आपण कादंबरींतलीं माणसें अगदीं जवळ जाऊन पाहिलीं, आणि या भावनेनें त्याला मोठा आनंद वाटतो. मग तो मनाशीं म्हणतो, किती गमतीदार मंडळी आहेत ही ! पाहलंच पाहिजे पुढें यांचें काय झालं तें !

## नं. ६

कथारचना आणि व्यक्तिदर्शन हीं ललितकथेचीं प्रधान अंगें असलीं, तरी कथेचें एकंदर सौंदर्य इतर किती तरी उपांगांवर अवलंबून असतें, व तीं उपांगें नामांकित कादंबरीकार मोठ्या दक्षतेनें सजवितात हें मला तरुण लेखकांस मुख्यतः सांगावयाचें आहे. माझें म्हणणें स्पष्ट करण्यासाठीं "निवेदनकौशल्य" "सुभाषितयोजना" आणि "संवाद" याबद्दल मीं थोडीशी चर्चा केली. आतां तसल्याच आणखी उपांगांबद्दल लिहिण्यापेक्षां, तीं उपांगें कोणतीं तें चतुर वाचकांनीं नामांकित लेखकांचें ललितलेखन डोळसपणें वाचल्यास त्यांचें त्यांसच कळेल येवढेंच म्हणून, नामांकित कादंबरीकारांच्या लेखनपद्धतीविषयीं एक सामान्य तत्त्व तेवढें सांगतों.

तें असें कीं, एकंदर कादंबरी लिहिण्याच्या ओघांत कादंबरीकार दोन भिन्न प्रकारच्या वृत्तींचा आळीपाळीनें व कुशलतेनें स्वीकार करीत असतो. कधीं कधीं तो कादंबरींतील पात्रांपासून अलग राहून, दूर उभ्या असलेल्या प्रेक्षकां-प्रमाणें त्या पात्रांच्या कृति अगर त्यांच्या मनोभावना वर्णून सांगतो, तर मध्येंच तो स्वतः जणूं त्या पात्रांशीं एकरूप होतो, आणि आपण स्वतः तिऱ्हाइतपणें कांहींच न सांगतां त्या पात्रांचीच भाषा वाचकांस ऐकवितो. या दोन भिन्न वृत्तींनीं कादंबरीची एकंदर मांडणी लेखकानें करावयाची असते; व या वृत्तींचें मनोहर प्रमाण कसें राखावयाचें, कोणत्या वृत्तीनें केव्हां लिहावयाचें, इत्यादि गोष्टी नवशिक्या लेखकानें उत्कृष्ट कथा सूक्ष्म दृष्टीनें वाचून शिकावयाच्या असतात. वाचकांनीं कोणत्याहि भाषेंतील उत्कृष्ट कादंबरी उघडून पहावी; तिच्यांत मी म्हणतों त्या दोन वृत्तींचा विलास प्रारंभापासून अखेरपर्यंत सारखा आळीपाळीनें चाललेला दिसून येईल.

या दोन वृत्तींस आपण विवक्षित नांवें देऊं. "**तटस्थ वृत्ति**" आणि "**तदात्मवृत्ति**" हीं नांवें बरीं आहेत; व या नांवांवरूनच माझ्या म्हण-ण्याचा बराचसा बोध व्हावयास हरकत नाहीं. कादंबरींतील कित्येक भाग असे असतात कीं, तेथें लिहिणारा स्वतः कथानकाच्या ओघांत न सांपडतां त्या ओघाच्या तीरावर उभा राहून त्याचें वर्णन करीत आहेसें दिसून येतें. असल्या

लिहिण्याच्या वेळीं लेखकाची वृत्ति "तटस्थ" असते. तो खरोखरच नदीच्या कांठावर उभा राहिल्यासारखा असतो. नदीचा प्रवाह शांतपणें वहात असला काय, किंवा पावसाळ्याचें पहिलें पाणी येऊन तो गढूळ आणि क्षुब्ध झाला काय, कांठावर उभा असलेला माणूस ज्याप्रमाणें सारख्याच शांतपणें आणि औत्सुक्यानें त्याचें वर्णन करील, अशीच कादंबरीकाराची गोष्ट असलेली कित्येकदां दिसते. तो आपल्या कथेंतील स्त्री-पुरुषांच्या हकीकती सांगतो तो अशा अविर्भावानें, कीं जणूं त्या सांगूनच्या सांगून आपण नामानिराळेंच रहावयाचें त्यानें ठरविलें आहे. त्या स्त्रीपुरुषांच्या चरित्राचा ओघ संथपणें वहात असो, अगर त्यांत अनपेक्षित दुःखदायक प्रसंग उद्भवून तो प्रक्षुब्ध झालेला असो, आपल्या स्वतःच्या वृत्तींत चलबिचल होऊं न देतां त्या हकीकतीची नोंद तो करतो.

या तटस्थ वृत्तीचे दोन फार मोठे फायदे आहेत. पहिला फायदा असा कीं, ती वृत्ति लेखकानें मधून मधून अंगिकारली म्हणजे कादंबरीची रचना व विविध व्यक्तींचें स्वभावरेखाटन अधिक स्वाभाविक होतें. कादंबरी लिहिणाऱ्या नवशिक्या माणसानें हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं आपली नायकनायिकाच नव्हे तर सर्वच पात्रें वाचकांस पटलीं पाहिजेत, व हीं पटावयाचीं झाल्यास आपण आपल्या मुख्य पात्रांशींच केवळ समरस न होतां इतर सर्व लहानमोठ्या पात्रांचा समाचार घेतला पाहिजे. हें अवधान लेखकाच्या हातून राहिलें नाहीं, कीं त्याच्या कृतींत दोष उत्पन्न झालाच म्हणून समजावें.

समजा, सुशीला नांवाच्या एका स्त्रीविषयीं आपल्याला कादंबरी लिहावयाची आहे. आपण अशी कल्पना करूं कीं ती स्वभावानें फार प्रेमळ, आणि आचरणानें फार सत्वशील आहे. परंतु तिला मूल होत नसल्यामुळें तिच्या पतीचा तिच्यावर रोष झाला आहे, व तो तिला परोपरीनें गांजीत आहे. त्यानें दुसरी बायको केली असून तो सुशीलेला बटकीप्रमाणें वागवीत आहे. अशा परिस्थितींत सुशीलेच्या एका लहानपणच्या मित्राची व तिची अचानक गांठ पडते, त्याचें मन तिच्यावर अनुरक्त होतें, व तिलाहि त्याच्या प्रेमाचा आसरा हवासा वाटतो. परंतु हिंदु स्त्रीला काडी मोडून घेण्याची परवानगी नसल्यामुळें सुशीलेच्या मनाचा कोंडमारा होतो, व अखेर ती आत्महत्या करते.

ही कादंबरी लिहावयाची झाली तर सुशीलेखेरीज इतर पात्रांची आपल्याकडून आबाळ होण्याचा फार संभव आहे. सुशीलेविषयीं अनुकंपा उत्पन्न करण्याच्या भरांत तिच्या माथीं सर्व शक्याशक्य सद्गुण मारण्याचा मोह जर आपण आपल्याला होऊं दिला, तर इतर पात्रांकडे आपलें अवश्य तितकें लक्ष राहणार नाहीं. सुशीलेचा पति, तिची सवत, ही मंडळी वाईट तर खरीच, पण त्यांच्याही वागण्याच्या बुडाशीं कांहीं हेतु असले पाहिजेत, व लेखक या नात्यानें ते हेतु आपण स्वतः तर समजून घेतलेच पाहिजेत, पण शिवाय ते वाचकांस विशद करून दाखविणेंही आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य पार पाडावयास तटस्थ वृत्तीचा आवश्यक तेवढा अंगिकार आपण केला पाहिजे.

तटस्थ वृत्तीचा दुसरा महत्त्वाचा फायदा असा कीं, ती स्वीकारली म्हणजे कादंबरींतील साऱ्या पात्रांहून आपण अधिक शहाणे आहोंत अशा थाटानें आपल्याला लिहितां येतें, व अशा थाटाच्या लिहिण्यानें कादंबरीचें आकर्षकत्व सहजासहजीं वाढतें. निवेदन चटकदार असावें, आणि मधून मधून योग्य स्थळीं सामान्य सिद्धांतांची व सुभाषितांची योजना केलेली असावी, अशा ज्या दोन सूचना मीं मागें केल्या त्यांची आठवण देऊन आतां मी असें सांगतों, कीं या दोन्ही चतुराईच्या गोष्टी लिहिणाराच्या तटस्थ वृत्तीवर अवलंबून असतात.

कसें तें पहा. वर जें एक कादंबरीचें कच्चें कथानक उदाहरणादाखल घेतलें त्याचेंच पुन्हां उदाहरण घेऊं. समजा, एखाद्या प्रकरणांत आपण असें दाखविलें कीं, सुशीलेच्या नवऱ्यानें रागानें बोलतां बोलतां तिला हातांतली काठी मारली, त्या प्रहारानें ती जमिनीवर पडली, व तिला वर्मीं लागलें कीं काय तें पहावयास तो तिच्याजवळ गेला तेव्हां अर्धवट मूर्छेत असलेली सुशीला त्याला म्हणाली, "नाथ! मला वाटतं मी आतां मरणार. या जन्मीं तुम्हांला दुःख दिलं याबद्दल क्षमा करा. मी आतां देवाजवळ गेलें कीं त्याची प्रार्थना करीन कीं तुम्हांला पुढच्या जन्मीं अधिक भाग्याच्या स्त्रीची जोड मिळो।" हे शब्द ऐकतांच सुशीलेच्या नवऱ्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले, व आपल्या सर्व दुर्वर्तनाबद्दलच्या पश्चात्तापाचे शहारे त्याच्या अंगभर झरकन उठून तो मनांत म्हणाला, "अरेरे, किती पापी मी। आतां सुशीला गतप्राण न होतां मला लाभली तर मी तिला पुन्हां कधीं एका शब्दानेंही दुखावणार नाहीं."

ही जागा अशी आहे कीं येथें एक सुभाषित चांगलें शोभेल. उदाहरणार्थ,

" सुशीलेच्या नवऱ्यानें हा निश्चय केला खरा. पण सज्जनांचे पापकृत्याचे बेत आणि दुष्टांचे सुकृताचे बेत क्षणभंगुरच ठरावेत असा सृष्टीचा न्याय आहे त्याला काय करावयाचें ! "

असें आपण लिहिलें तर तें छान होईल.

पण हें लिहिणें सुचावयास आपण आपल्या कादंबरींतल्या साऱ्या मंडळी-हून अधिक शहाणे आहोंत अशी भावना आपल्या मनांत जागृत पाहिजे. आणि ही भावना तटस्थ वृत्तीवांचून उत्पन्न होत नाहीं.

तसेंच, निवेदनाचा चटकदारपणा म्हणून जो मीं पूर्वीं सांगितला तो पुष्कळदां सूक्ष्म विनोदावर अवलंबून असतो, आणि विनोदाची ही सूक्ष्म छटा लेखक तटस्थ वृत्तीनें लिहीत असेल तरच सहज उत्पन्न होते. उदाहरणार्थ पुढील उतारा पहा. तें एका कादंबरीच्या अगदीं प्रारंभींचें वर्णन आहेः—

" त्या दिवशीं नेशियाचा वाढदिवस होता।

तिला पंचवीस वर्षें पुरीं झालीं होतीं।

पण ती कुठें आनंदांत होती ?

आत्तांशा वाढदिवसाची तारीख येऊन ठेपली, कीं ती म्हणे, उलटलं माझ्या डोक्यावरून एक कंटाळवाणं वर्ष, दुसरं काय ?

तिला बावीस वर्षें पुरीं झालीं त्या दिवशीं तिनें खेदानें सुस्कारे टाकले होते; तेवीस झालीं त्या दिवशीं ती हुंदके देऊन रडली होती; चोवीस झालीं तेव्हां तिनें सुस्कारे सोडणें आणि रडणें दोन्हीं केलें होतें—आतां आज पंचवीस झालीं तेव्हां आपल्या या कंटाळवाण्या, रुक्ष, दरिद्री जीविताविषयीं वाटणारा तिटकारा आणि रोष कसा प्रगट करावा हेंच नेशियाला कळेना !

याबद्दल नीट विचार करावा असें ठरवून शेकोटीपुढच्या आरामखुर्चीत ती पडली, आणि जवळ एक कोळशाचें भांडें पडलें होतें त्याला तिनें एक लाथ लगावली.

पण हें नेशियाचें कृत्य खुळेपणाचें नव्हे काय ? कारण एक तर असें, कीं तिनें लाथ मारली तर ती त्या तांब्याच्या भांड्याला लागणार कां आहे ? आणि खेरीज आपल्या पायांत दहा बारा आणे किंमतीच्या तकलुकी सपाता आहेत हें नको कां तिनें समजायला ? "

( Three Nights : Bree Narran ).

या निवेदनांत जो सूक्ष्म विनोद साधला आहे तो कशामुळें ? अर्थात् लेखकानें नेशियाकडे उंचावरून तटस्थ वृत्तीनें पाहिल्यामुळें.

तटस्थ वृत्तीच्या उलट तदात्मवृत्ति. कादंबरींतील मोठमोठाले संवाद, व मीं मागें ज्यांचें वर्णन केलें तसले स्फुट, चतुर संवाद लिहितांना लेखकास ही तदात्मवृत्ति अत्यंत उपयोगी पडते. मोठे अगर छोटे संवाद लिहितांना **पात्रांना आपल्याशीं समरस करण्याचा प्रयत्न करूं नये. आपण त्यांच्याशीं समरस व्हावें.** आपण आपलें व्यक्तित्व विसरावें. नट जसा त्या त्या भूमिकेशीं तेवढ्यापुरता एकरूप होतो तसें आपण व्हावें. याच अर्थी मी पुष्कळदां म्हणतों कीं, **कादंबरीकाराच्या अंगीं नाट्य अवश्य आहे.** तें असेल त्या प्रमाणांत त्याच्या कादंबरींतले संवाद सरस वठतील.

तें कसेंही असो, तटस्थ वृत्ति आणि तदात्मवृत्ति यांचा आलटून पालटून स्वीकार करणें हें कादंबरीलेखनाच्या कलेंतील एक महत्त्वाचें रहस्य आहे येवढें खरें; व नवाशिके लेखक या रहस्याकडे जितकें लक्ष देतील तितकी त्यांची प्रगति झाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## नं. ७

कादंबरीलेखनाचा अभ्यास करणाऱ्या मंडळींनीं नामांकित लेखकांचें लिखाण कोणत्या दृष्टीनें वाचावें हें सुचविण्याच्या हेतूनें ललितकथेच्या सौंदर्यांत भर टाकणाऱ्या कांहीं उपसाधनांचा मीं आतांपर्यंत विचार केला. ज्या गोष्टींकडे अभ्यासू वाचकांचें लक्ष सहजासहजीं जाईलच त्यांची चर्चा येथें मला फारशी करावयाची नाहीं. म्हणून कथारचना, व व्यक्तिदर्शन हीं जीं ललितकथेचीं प्रधान अंगें त्यांची चर्चा मीं गाळली तरी चालेल. शिवाय माझ्या '**प्रतिभा-साधन**' ग्रंथांत त्यांचा विचार मीं पुष्कळ विस्तारानें केला आहे.

परंतु पुन्हां असें मनांत येतें, कीं या बाबतींतही अभ्यासू लेखकांस कांहीं उपयुक्त सूचना करण्यासारख्या आहेत. "**प्रतिभासाधन**" ग्रंथांत त्या अंतर्भूत केलेल्या नाहींत, व इतर कोणीं कोठें केलेल्या माझ्या वाचण्यांत आल्या नाहींत, तेव्हां या ठिकाणीं त्या पुढें मांडणें उचित व इष्ट होईल.

जो केवळ आपल्या आनंदासाठीं नव्हे, तर कादंबरीलेखन शिकण्यासाठीं म्हणून निवडक कादंबऱ्या वाचतो तो साहजिकपणेंच त्यांतील कथानक व त्यांत ठिकठिकाणीं दिसून येणारी व्यक्तिदर्शनाची कुशलता यांजकडे लक्ष ठेवतोच. ज्या कादंबऱ्या वाचून झाल्या त्यांचीं कथानकें तो प्रयत्नपूर्वक आपल्या स्मृतींत ताजींही ठेवतो, व त्याची स्मरणशक्ति विशेष चांगली असल्यास, अमुक लेखकाच्या अमुक कादंबरीचें कथानक असें असें आहे असेंही त्याला पुष्कळ दिवस सांगतां येतें.

कित्येक मंडळीस येवढेंही साधत नाहीं. या दृष्टीनें असल्या प्रयत्नाचें कौतुक करावयास हरकत नाहीं. पण येवढा प्रयत्न केला, कीं कादंबरीच्या कथारचनेचा शक्य तेवढा अभ्यास आपल्या हातून झाला अशी कल्पना करणें चुकीचें ठरेल.

माझ्याकडे बोलावसायला येणाऱ्या तरुण लेखकांस जेव्हां माझें हें मत मी बोलून दाखवितों तेव्हां त्यांना त्याचें जरा नवल वाटतें; व आतां या ठिकाणीं मीं हें मत नमूद केलेलें वाचूनही वाचक कदाचित् आश्चर्य व्यक्त करतील. ते म्हणतील, एखादी कादंबरी वाचतांना तिच्या कथानकाचे निरनिराळे सांधे कसे

जुळविले गेले आहेत तें लक्षपूर्वक पहावयाचें व कथानकाची रचना नीट आठवणींत सांठवून ठेवायची, येवढा अभ्यास पुरेसा नाहीं झाला ? आणखी अभ्यास कसला म्हणतां बुवा तुम्ही ? आम्हांला तर आणखी कसल्या अभ्यासाची जरूरी वाटत नाहीं ! किंबहुना कथारचनेच्या बाबतींत आणखी कसला अभ्यास संभवतो असें आम्हांला वाटतच नाहीं !

तरुण लेखकांची अशी सामान्यपणें समजूत असते. पण ती चुकीची आहे असें मला त्यांस दाखवावयाचें आहे.

नाटकाचें, कादंबरीचें अगर लघुकथेचें संविधानक लक्षांत ठेवलें कीं, कथारचनेपुरता अभ्यास संपला असें मानण्यानें वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांचें फार नुकसान होण्यासारखें आहे. संविधानक लक्षांत ठेवण्याचें काम महत्त्वाचें आहे याबद्दल वाद नाहीं; पण तेवढें केलें कीं करण्यासारखें कांहीं कामच शिल्लक राहिलें नाहीं अशी समजूत कोणीं ठेवूं नये.

कारण, असें पहा, एखादी कादंबरी हातीं घेतली कीं ती एकाग्र चित्तानें एका बैठकींत संपविणें, व तिचें संविधानक चोख लक्षांत ठेवणें हा जसा अभ्यासाचा एक प्रकार झाला, तसाच ती कादंबरी अर्धीच वाचणें, व मग ती बाजूला टाकून तिच्या कथानकाची पूर्तता आपण आपल्या मतानें करणें, आणि अखेर मूळ कादंबरी पुन्हां हातीं घेऊन तिच्याशीं आपली रचना ताडून पाहणें, हा देखील अभ्यासाचा एक प्रकार संभवतो; आणि पहिल्यापेक्षां या दुसऱ्या तऱ्हेच्या अभ्यासापासून फार फायदा आहे. जी ललितकथा आपण वाचतों तिचें संविधानक नुसतें लक्षांत ठेवायचें आपण योजलें, तर फक्त आपल्या **स्मरणशक्तीसच** काय व्यायाम मिळेल तेवढा. उलट, मीं सुचविलेल्या तऱ्हेनें संविधानकाचा अभ्यास केला तर तें तर आपल्या स्मरणांत राहीलच, पण शिवाय आपल्या स्वतःच्या **कल्पकशक्तीस** देखील केवढी तरी चालना मिळेल.

कादंबरीच्या अगर नाटकाच्या मध्यबिंदूपर्यंत आपण पोचलों म्हणजे त्यांतील मुख्य पात्रें, व त्यांचे स्वभावविशेष आपल्याला माहीत होऊन, त्या कथेंत कर्त्यानें कोणकोणत्या पात्रांमध्यें समरप्रसंग योजिलेला आहे याचीहि आपल्याला पुरेशी कल्पना येते. येवढी आली कीं मूळ ललितकथा पुढें वाचीत जाण्याऐवजीं हातावेगळी करावी. बुद्धिबळाच्या पटावर अमुक मोहरीं व अमुक प्यादीं अमक्या अमक्या घरांत आहेत, तर अमुक डावांत प्यादी कशी कराल,

असा कूट प्रश्न नाहीं कां घालीत ! तसा कोणी तरी आपल्याला घातला आहे असें समजावें. मूळ कादंबरीकारानेंच जणूं आपलीं सारीं पात्रें हंसत हंसत आपल्या स्वाधीन करून "आतां यांच्यांतला हा समरप्रसंग तुम्हींच तडीला न्या" असें आपल्याला म्हटलें आहे असें समजावें. आपणही म्हणावें, "ठीक आहे; आणा इकडे तुमच्या साऱ्या मंडळींना, मी मिटवितों साऱ्या भानगडी!" मग आपल्या मतीप्रमाणें तें संविधानक पुरें करावें (म्हणजे पुढचीं सारीं प्रकरणें विस्तारानें लिहावीं असें नव्हे, तर कथानकाचा सांगाडा पुरा करावा). आणि त्यानंतर मूळ नाटक अगर कादंबरी पुन्हां हातीं घेऊन अखेरपर्यंत वाचावी. असें केलें म्हणजे आपल्या हातून काय काय चुका झाल्या, कोठले कोठले दुवे जुळवायचे राहिले, किंवा जुळविले गेले पण बसावे तसे बेमालूम बसले नाहींत, आपण कोठें कोठें अडखळलों, व मूळ लेखक त्या अडचणींच्या जागेंतून कसा सफाईनें निघून गेला आहे--या सर्वांचा उलगडा होतो.

आणि या अशा उलगड्याची जी किंमत आहे, तिच्या शतांशही नुसतें संविधानक लक्षांत ठेवण्याला नाहीं. कोणतीही गोष्ट शिकण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक **घोकंपट्टी** आणि दुसरी **सहकारी खटपट**. संविधानक नुसतें लक्षांत ठेवायचें म्हणजे नुसती **घोकंपट्टी** झाली. मी म्हणतों त्याप्रमाणें केलें तर ती मात्र **सहकारी खटपट** म्हणतां येईल. कारण तसें केल्यानें आपण जणूं मूळ लेखकाच्या मांडीला मांडी लावून लिहावयास बसल्यासारखेंच तें होईल. अमुक गोष्ट अशी करायची असें विद्यार्थ्याला सांगून टाकूं नये, ती त्याला आधीं, चुकत माकत कां होईना, करायला लावावें असें आधुनिक शिक्षणशास्त्रांतलें एक मोठें तत्त्व आहे. त्या तत्त्वानुसारच माझी कल्पना आहे.

मी म्हणतों त्याप्रमाणें अभ्यास करावयास योग्य अशा किती तरी नाटकांचीं व कादंबऱ्यांचीं नांवें देतां येतील. उत्सुक विद्यार्थ्यांची पहिली गरज भागविण्यापुरतीं नांवें पुढें देतों:--

कादंबऱ्या :—(1) The Love Rack: By Cecil Roberts; (2) Ann Veronica: By H. G. Wells; (3) Crashed: By Mrs. Savi; (4) Glorious Flames: By Elinor Glyn.

नाटकें :—(1) His House in Order: By Arthur Pinero; (2) Thunderbolt: By Arthur Pinero; (3) Mrs. Warren's

Profession: By Bernard Shaw; (4) The Young Person in Pink: By Miss. Jenkins.

कथानकाच्या अभ्यासाची जी पद्धति मीं वर सुचविली आहे तिचा उपयोग पाश्चात्य चित्रपट पाहतांना तर अवश्य करावा. असे पुष्कळ चित्रपट येतात, कीं त्यांत कथानकाची मांडणी अतिशय कौशल्यानें केलेली असते. असले चित्रपट अर्धे पहावे, घरीं गेल्यावर त्यांचें संविधानक आपल्या मनाशीं पुरें करावें, व मग पुन्हां सबंद चित्रपट पहावा, आणि आपली कथारचना मुळाशीं कितपत जुळते तें ताडून पहावें. असा अभ्यास करण्यांत फायदा तर आहेच, पण आनंद केवढा आहे! दुसऱ्याच्या मागोमाग एखाद्या अवघड किल्ल्यावर चढणें निराळें, आणि अर्ध्या वाटेंत त्याला सोडून आपण आपल्या बुद्धीनें वाट काढीत काढीत, काटेकुटे तुडवीत कां होईना, वर माथ्यावर जाऊन पोंचणें निराळें! अशा वेळीं आपण जी वाट काढली त्याच वाटेनें आपला वाटाड्याही आपल्याला आणणार होता असें समजलें तर जो आनंद होईल त्याचें सुख काय वर्णावें!

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ८
ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

माणसाच्या अंगीं अनुकरण म्हणून एक मोठी उपजत प्रेरणा आहे; आणि माणूस जें कांहीं शिकतो तें बहुतांशीं या प्रेरणेच्या सामर्थ्यावरच शिकतो. बसणें, उठणें, चालणें, खाणें, पिणें, हे सर्व व्यापार आपण अनुकरणानेंच करूं लागतों, व शिकतों. आपण मातृभाषा शिकतों ती तर सर्वस्वीं अनुकरणानेंच. आणि कित्येक विद्वानांचें असें मत आहे, कीं आपण विशिष्ट धर्मपंथ, विशिष्ट नीतितत्त्वें, विशिष्ट मतें, सदाचार, शिष्टाचार, चालीरीति, आणि रागद्वेषादि स्थिर भाव स्वीकारतों ते देखील आपण मोठ्या चिकित्सेनें तपासून शिकतों असें नव्हे, तर अनुकरणानेंच ते आपण उचलतों, व उराशीं धरून त्यांचा अभिमान वाहतों. हें मत ग्राह्य माना किंवा नका मानूं; पण इतकें खास, कीं ज्याला एखादी विद्या अगर कला शिकायची आहे त्यानें अनुकरणाचें महत्त्व ओळखून त्याचा योग्य तो उपयोग केला पाहिजे.

ललितकलांच्या बाबतींत तर अनुकरणाइतकें फलदायी विद्यासाधन दुसरें नाहींच म्हटलें तरी चालेल. शिकविणारानें सरळ रेषा काढून दाखवायची, आणि ती पाहून शिकणारानें तशी रेषा काढायची हा चित्रकलेंतला पहिला धडा, आणि पुढच्या साऱ्या शिक्षणाचें विद्यार्थ्यानें गुरूपासून ग्रहण करायचें असतें तेंही याच धड्याच्याच नमुन्यावर. तसेंच नृत्यकलेंतला पहिला धडा अनुकरणात्मकच असतो, आणि पुढचे अधिकाधिक करामतीचे धडे शिकणारानें तयार करायचे असतात तेही अहर्निश तंतोतंत अनुकरणाची खटपट करूनच. गायन शिकविणारा वस्ताद 'सा' लावतो, आणि शिष्यानें अनुकरण करून त्याच्या आवाजांत आवाज सुंदर मिळविला कीं तेंच 'सा' ह्या स्वराचें शिक्षण होतें. दुसऱ्या कोटल्याहि तऱ्हेनें स्वरशिक्षा संभवतच नाहीं. 'सा' स्वराची कंपनसंख्या २४० आहे, आणि 'प' स्वर त्याच्या दीडपट कंपनसंख्येचा आहे, हें गणित शिष्याला कितीहि उत्तम समजलेलें असलें, तरी त्या गणिताच्या जोरावर त्याला आपल्या गळ्यानें सात स्वर लावतां येणार नाहींत. त्याला अनुकरण हें एकच एक साधन होय.

म्हणूनच ललितकलांच्या बाबतींत पुस्तकीज्ञानापेक्षां गुरुसहवासाची योग्यता अधिक मानतात. एखाद्या गायकाची योग्यता ठरवायची झाली तर त्याला गुरु-

सहवास किती घडला आहे असें गाण्यांतले दर्दी लोक हटकून विचारतील आणि तो मुळींच घडला नसेल तर त्या गायकानें नुसतें ऐकून ऐकून गाणें पैदा केलें याबद्दल कांहींसें कौतुक जरी त्यांनीं दाखविलें, तरी गुरुसहवास न घडल्यानें त्या गायकाच्या ठिकाणीं एक मोठें वैगुण्य राहिलें असेंच ते मनांत समजतील.

ललितलेखन ही एक कलाच असल्यामुळें तिच्या बाबतींत गुरुसहवासाचें महत्त्व फार आहे हें उघड आहे. लेखनकलेचा कितीही उहापोह अधिकारी लेखकांनीं ग्रंथांच्या द्वारें केला, आणि असला उहापोह शिकणारानें कितीही मनःपूर्वक वाचला तरी त्याची उपयुक्तता कांहीं एका मर्यादेपुरतीच. रागस्वरूपांच्या पुस्तकी चर्चेनें, आणि स्वरलेखनाच्या साहाय्यानें गाणें शिकविणें ज्या अभिप्रायानें आणि ज्या अंशानें शक्य आहे, तितक्याच अंशानें व अर्थानें ललितलेखनाची पुस्तकी चर्चा मार्गदर्शक आणि उपकारक होईल. असली चर्चा मुळींच उपलब्ध नसली कीं, कलेच्या सगळ्याच प्रांतावर अंधःकार पसल्यासारखें होतें, आणि समजूतदारपणें कलेचा विचार करण्याची एखाद्या जिज्ञासूला इच्छा असली तरी त्याला अंधारांत ठेंचकाळण्यावांचून गत्यंतर रहात नाहीं. हें तर खरेंच; व ही शोचनीय स्थिति संपावी म्हणून संगीताच्या प्रांतांत जशी पुस्तकी चर्चेची आवश्यकता आहे, तशीच ललितलेखनाच्या प्रांतांतही आहे. परंतु पुस्तकी चर्चेची उपयुक्तता येथेंच संपली. लेखनाच्या प्रांतांत यापुढें मजल मारायची असेल तर गुरुसहवासासारखें दुसरें साधन नाहीं.

परंतु, या आपल्या आधुनिक काळांत हें विधान प्रथमदर्शनीं निरर्थक वाटेल. कारण तत्त्वतः गुरुसहवास कितीहि आवश्यक आणि फलदायी असला, तरी आज तो व्यवहार्य दिसत नाहीं. आज सामाजिक जीवनाच्या सर्वच व्यवहारांना कारखान्याचें स्वरूप आलें आहे. लोकांना लागणाऱ्या चैनीच्या व रोजच्या उपयोगाच्या वस्तू अजस्र प्रमाणांत कारखान्यांत तयार होत आहेत. वस्त्रप्रावरणें, व भूषणें यंत्रांच्या साहाय्यानें मणांच्या हिशोबानें बनविलीं जात आहेत. औषधें खंडोगणतीनें मोठमोठ्या पेटाऱ्यांत सीलबंद होऊन कारखान्यांतून बाहेर पडत आहेत. खेळण्याच्या आणि करमणुकीच्या वस्तूही टनावारी तयार होत आहेत. इतकेंच नव्हे, तर शिक्षणाच्या पवित्र प्रांतालाही गिरणीकारखान्याचें स्वरूप आलें आहे. चाकू-कात्र्या बनवायचे कारखाने असावेत तसेच विद्यार्थी तयार करायचे कारखाने शहरोशहरीं उघडल्यासारखे दिसत आहेत, आणि या

कारखान्यांच्या एका दाराशीं अल्लवयी, कोंवळ्या विद्यार्थ्यांचे ढीगच्या ढीग कच्चा माल म्हणून पडले असून दुसऱ्या दारानें स्नातकत्वाचा शिक्का बसलेले, भांबावलेले तरुण ढिगावारी बाहेर फेंकले जात आहेत. असल्या कारखानदारांच्या जमान्यांत गुरुसहवासाचा संभव कोठून राहणार ?

पूर्वीच्या काळीं शिष्यानें गुरुसेवा करावी आणि विद्या मिळवावी अशी रीत होती. शिकविणारा आणि शिकणारा यांचे संबंध इतके निकट असत कीं, विद्या देणारा गुरु विद्यार्थ्यास पित्यासमान वाटूं लागे, व गुरुपत्नीस विद्यार्थी खरोखरच प्रेमानें "माते" अशी हांक मारीत. ही परिस्थिति आतां इतकी बदलेली आहे, कीं शिकविणारा आणि शिकणारा यांचा वर्गामध्यें घटकाभर काय संबंध येईल तेवढाच ! आणि तोही अशा स्वरूपाचा, कीं एका शिकविणाऱ्यानें एकदम दीडदोनशें शिकणाऱ्यांच्या मुखांत रतीबानें घातल्यासारखें ज्ञानामृत घालावें, आणि चालतें व्हावें, आणि त्या दीडदोनशें विद्यार्थ्यांपैकीं एकालाही त्या ज्ञानदात्याबद्दल जिव्हाळा वाटूं नये. शिक्षणाच्या सर्वच प्रांतांत गुरुसहवासाचा लोप होत चालला आहे. बी. ए. चें मामुली शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जिव्हाळ्याचा गुरुसहवास घडत नाहीं, इतकेंच नव्हे, तर धंदेशिक्षण घेणाऱ्यालादेखील तो दुर्मिळच होत चालला आहे. पत्रोपत्रीं शिक्षण देण्याची आणि घेण्याची सोय उत्तरोत्तर होत आहे आणि ही सोय शास्त्रकलांच्या सर्वच प्रांतांत झाली म्हणजे एक काळ असा येईल,—नव्हे तो थोडा फार आलेलाच आहे—कीं विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम तर पुरा व्हावा, पण त्यानें व शिक्षकानें एकमेकांचें तोंडही कधीं प्रत्यक्ष पाहिलेलें नसावें.

या परिस्थितीकडे पाहिल्यास विद्यासाधनासाठीं गुरुसहवासाची शिफारस करणें निरर्थकच आहेसें वाटेल. ज्या कादंबरीकाराचें लिहिणें आपल्याला आवडतें, व ज्याची लेखनविद्या आपल्याला अल्पांशानें तरी यावी अशी हांव वाटते, त्याचा निकट सहवास तत्वतः कितीही फलदायी असला, तरी तो व्यवहार्य थोडाच ठरेल ! वाङ्मयाच्या प्रांतांत तर इतर सर्व प्रांतांतल्या पेक्षांही देणारा व घेणारा या दोघांमध्यें फार मोठें अंतर पडलें आहे, आणि यापुढें पडत जाईल. कादंबरी लिहिणारा, आणि ती वाचून तशी लेखनशैली आपल्यालाही यावी अशी इच्छा करणारा, यांत कधींकधीं सातासमुद्रांचेंही अंतर असतें. हा विचार केला म्हणजे पुष्कळदां तर असें वाटूं लागतें, कीं 'वाङ्मय' हा रूढ शब्द आतां बदलावा हें चांगलें. कारण 'वाङ्मय' म्हणजे जें वाचेनें बोललें गेलें तें. ज्या-

काळीं एकाद्या शहाण्या माणसानें तोंडानें बोलावें, आणि दहावीस जिज्ञासूंनीं तें कानांनीं ऐकावें असें वाङ्मयव्यवहाराचें स्वरूप होतें, त्या काळांत ' वाङ्मय ' हा शब्द युक्त होता. आतां 'वाङ्मय' या शब्दाला तो अर्थ उरला नाहीं. आतां जें लिहिलें गेलें, व जें कमी अधिक काळ टिकून राहिलें, त्या ज्ञानभांडारास आपण ' वाङ्मय ' अशी संज्ञा देतों.

अर्थात् एखाद्या नामांकित कादंबरीकाराचें शिष्यत्व पत्करावें असें आपल्याला वाटलें, आणि गुरुसहवासाचें महत्व आपल्याला कितीही पटलेलें असलें तरी त्याचा काय उपयोग ? ज्याला गुरुस्थानीं मानायची आपली इच्छा आहे तो आपल्यापासून सहस्रावधी मैलांच्या अंतरावर दूर देशांत असेल, इतकेंच नव्हे, तर काळाचेंही फार मोठें अंतर त्याच्यांत व आपल्यांत असेल. मग गुरुसहवासाची शक्यता कोठें उरली ?

सकृद्दर्शनीं असें वाटतें खरें. पण माझ्या मतानें तें खरें नाहीं. ललितलेखन शिकूं इच्छिणाऱ्याला गुरुसहवासाचा मार्ग वाटतो तितका बंद नाही. कसें तें पाहूं.

## नं. १

ललितलेखनकला संपादन करण्यांत गुरुसहवासाची मदत फार होण्यासारखी आहे येवढेंच म्हटलें तर तें कोणीहि मान्य करील. परंतु मी तेवढेंच म्हणत नाहीं, तर गुरुसहवास कोणाहि विद्यार्थ्यास प्रयत्नांतीं शक्य आहे असें मी म्हणतों. हें माझें म्हणणें कदाचित् चमत्कारिक वाटेल. म्हणून माझ्या म्हणण्याचा अभिप्राय अधिक विशद करून सांगितला पाहिजे.

आजच्या या विचित्र धालमेलीच्या आणि यांत्रिक जीवनाच्या काळांत नामांकित लेखकांचा प्रत्यक्ष सहवास विद्यार्थ्यास लाभणें अशक्य—निदान अत्यंत दुर्घट व अव्यवहार्य—आहे हें कबूल केलेंच पाहिजे. परंतु प्रत्यक्ष सहवासांत ज्या गोष्टी विद्यार्थ्यानें करायच्या असतात, त्या आजसुद्धां, त्या सहवासावांचूनही विद्यार्जनाची तीव्र इच्छा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यास करणें शक्य आहे, अशी माझी समजूत आहे. गुरुशिष्यांचा निकट सहवास घडला, तर गुरुपासून शिष्य ललितकला कशी संपादन करतो ? अनुकरणानेंच ना ? मग तेंच अनुकरण निकट सहवासावांचूनहि करतां येणें लेखनकलेच्या बाबतींत शक्य आहे कीं नाहीं तें पाहिलें म्हणजे झालें. तें बरेंचसें शक्य आहे असें मला खचित वाटतें; व वाङ्मयाच्या जिज्ञासू विद्यार्थ्यास त्याचा कसा अवलंब करतां येईल तेंच मला सांगावयाचें आहे.

गुरूचा सहवास प्रत्यक्ष घडला कीं, शिष्याला आपल्या साऱ्या शंका त्यास वेळोवेळीं विचारण्याची, आणि हरप्रकारें त्याची सेवा करून व त्यास प्रसन्न राखून त्याची मर्जी व विद्या संपादन करण्याची संधि सहजच मिळते. गुरूपासून विद्या संपादन करण्याचे जे मार्ग नारद मुनींनीं सांगितले आहेत त्यांत "परिप्रश्नेन सेवया" हे शब्द त्यांनीं कटाक्षानें योजले आहेत. आजच्या विचित्र काळांत गुरुशिष्यसंबंध इतके दुरावलेले आहेत कीं, नारदीय सूत्रांतील "सेवया" हा शब्द आतां अजिबात गाळूनच टाकला पाहिजे. या नव्या युगांत शिष्याकडून गुरुची प्रत्यक्ष सेवा घडणें अशक्यच होय. शिष्यानें मनांत आणलें तरी ती सेवा त्याला करतां यायची नाहीं; आणि शिष्यानें आपली सेवा करावी अशी विद्यादान करणारे गुरुही आतां अपेक्षा

ठेवीत नाहीत. आणि प्रत्यक्ष सेवेचा मार्ग या नव्या काळांत लोपला ही गोष्ट सकृद्दर्शनीं वाटते तितकी खेदाचीहि नाहीं. कारण असें कीं प्रत्यक्ष सेवेवर विद्यार्जन अवलंबून असलें, कीं त्यांत शिष्याचा फायदा असतो तसाच तोटाही असतो. सेवेमुळें गुरु प्रसन्न व्हायचा जसा संभव असतो तसाच गुरूची मर्जी बिघडायचाही संभव असतो. तें कसेंही असलें तरी ज्याच्या जवळून विद्या अगर कला शिकायची त्याची सेवा करण्याचा मार्ग आज फारसा शक्य व व्यवहार्य राहिला नाहीं येवढें खरें.

'सेवा' शक्य नसली तरी 'परिप्रश्न' मात्र आजच्या काळांतही शक्य आहेत असें मला वाटतें. विद्या देणारा गुरु सन्निध असला म्हणजे विद्यार्जन करतांना मनांत उद्भवणाऱ्या कोणत्याही शंका गुरूस 'परिप्रश्न' करून—म्हणजे पुनः पुन्हां प्रश्न करून—शिष्य फेडून घेत असतो. 'परिप्रश्न' याचा येवढाच अर्थ असेल तर आज काळ कितीही बदलला असला तरी 'परिप्रश्न' मार्गाचा अवलंब शिष्यास आजही अवलंबितां येईल यांत शंका नाहीं.

कारण, आपण ही गोष्ट विसरतां कामा नये, कीं ज्या ललितलेखकाला गुरुस्थानीं मानण्याची आपली इच्छा असेल तो देहानें जरी आपल्या सन्निध नसला तरी निराळ्या अर्थानें आणि स्वरूपानें त्याच्या सान्निध्याचा उपभोग मन मानेल त्यानें घ्यावा अशी स्थिति असते. तो लेखक स्वतः स्थलकालाच्या दृष्टीनें आपल्यापासुन कितीहि दूर असला, तरी त्यानें निर्माण केलेल्या साऱ्या लेखनकृति कोणालाही सहज मिळण्यासारख्या असतात. खरें पहातां लेखनकला ज्याला शिकावयाची आहे त्याच्या दृष्टीनें स्वतः शरीरी गुरुतुल्य लेखक, आणि त्या लेखकाच्या अशरीरिणी लेखनकृति यांत फारसा भेदच नाहीं. मीं पूर्वीं एकदां म्हटलें तेंच पुनः म्हणतों, कीं नामांकित ललितलेखकाच्या ठिकाणीं नमुनेदार असे जे कांहीं कौशल्यप्रकार असतात ते त्याच्य लेखनकृतींत उघड होतातच. ते लपवून ठेवण्याची त्यानें धडपड केली तरी ती व्यर्थ होय. अर्थात् शिकणाऱ्याच्या दृष्टीनें त्याला आदर्शासारखा वाटणारा गुरुतुल्य लेखक व त्या लेखकाच्या उपलब्ध कृति यांत अंतर मानण्याचें कारणच नाहीं. भास कवि दिवंगत झाल्यास कित्येक शतकें होऊन गेलीं. परंतु त्याला गुरुस्थानीं मानून नाटकांतील चटकदार संवादाची कला हस्तगत करण्याची माझी इच्छा असेल तर त्याचीं नाटकें आजही उपलब्ध आहेत; आणि माझ्या

कलासंपादनापुरता भास कवि त्या नाटकांच्या रूपानें आजही जिवंत आहे, इतकेंच नव्हे, तर माझ्या अगदीं सन्निध आहे असें मानायला हरकत कोणती? याच दृष्टीनें मी म्हणतों, कीं जिज्ञासू विद्यार्थ्याला आजच्या बदललेल्या कालांतही गुरू-सहवास घडणें शक्य आहे.

आणि शरीररूपानें गुरु जवळ असला तर तो शिष्याच्या 'परिप्रश्नां'चीं जशीं उत्तरें देईल तशींच उत्तरें त्याच्या लेखनकृतीकडूनहि चतुर शिष्याला मिळण्यासारखीं असतात. मात्र हीं उत्तरें त्या कृतीकडून काढून घेण्याचें चातुर्य सर्वस्वी शिष्याचें आहे. हें चातुर्य द्विविध आहे. एक तर शोधक शिष्यानें त्या कृतींचा डोळसपणानें सतत अभ्यास केला पाहिजे; आणि दुसरें त्या कृतींतील जे गुण संपादण्याची शिष्याची इच्छा असेल त्या गुणांचें त्यानें सारखें अनुकरण केलें पाहिजे. या दोन अंगांपैकीं डोळस **अभ्यासाची** आतांपर्यंत मीं थोडी फार चर्चा केली. आतां **अनुकरणा**बद्दल थोडेसें लिहितों.

तरुण महत्त्वाकांक्षी लेखकांना या बाबतींत मला पहिली सूचना द्यावीशी वाटते ती ही, कीं एखाद्या नामांकित लेखकाचा एखादा विवक्षित लेखनगुण त्यांना अतिशय आवडत असेल तर त्या गुणाचा कित्ता प्रत्यक्ष हातांनीं गिरविण्याची मेहनत त्यांनीं कांहीं काल अवश्य करावी. ललितलेखन हें केवळ शास्त्र नसून मुख्यतः कला आहे हें कधींही विसरतां कामा नये. ती नुसती **समजण्याची** गोष्ट नव्हे, तर **प्रत्यक्ष हातानें करून दाखविण्याची** गोष्ट आहे. ज्याला गाणें शिकायचें आहे त्याला एखाद्या नामदार वस्तादाच्या गाण्यांतली गोडी नुसती **बुद्धीनें जाणतां आली** तर तेवढ्यानें भागत नाहीं. ती गोडी स्वतःच्या **कंठानें वठवितां आली** तरच कांहीं उपयोग. ललितलेखनाचें असेंच आहे. ज्याचें लिहिणें आपल्याला आदर्शभूत वाटत असेल त्याच्या लेखनगुणांचा तात्विक अभ्यास तर आवश्यकच आहे; पण त्याच्या लेखनाचा कित्ता हातांनीं गिरवून गिरवून त्याचें वळण आपल्या हातीं आणणें शतपटीनें अधिक आवश्यक व फलदायी आहे. माझ्या म्हणण्याचा मतितार्थ असा, कीं ज्यांना खरोखरच सुंदर लिहावयास शिकावयाचें आहे त्यांनीं योग्य कित्ते निवडून काढून ते हातांनीं घटविण्यांत पुष्कळसा काळ घालविला पाहिजे. अक्षर सुंदर व्हावें यासाठीं आपण मूळ

कित्त्याचीं हात घटेपर्यंत जशी पुन्हां पुन्हां 'नक्कल' ( Copy ) काढीत रहातों, तशीच ज्या लेखकाचा एखादा लेखनगुण आपल्याला साध्य करावयाचा असेल त्याच्या लेखनांतील त्या त्या उताऱ्यांची सारखी 'नक्कल' करीत रहाणें शिकाऊ लेखकास फार फायद्याचें होईल.

समजा कीं, हरीभाऊ आपट्यांचीं ऐतिहासिक कादंबऱ्यांतील कांहीं वर्णनें आपणांस अत्यंत रमणीय वाटतात, व तशीं वर्णनें आपल्याला करतां यावींत अशी मोठी हांव वाटते. असें असेल तर त्या वर्णनांची फोड करून तीं वर्णनें मोहक कां वाटतात याची तात्विक चर्चा करणें हा विद्यार्थ्यानें अवश्य पत्करण्यासारखा एक मार्ग झाला. परंतु येवढ्यानें भागत नाहीं. या चिकित्सक अभ्यासाला प्रत्यक्ष अनुकरणाची जोड देणें शिक्षणाच्या पहिल्या अवस्थेंत तर अत्यावश्यक समजलें पाहिजे. हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील जीं रोमांचकारी प्रासंगिक वर्णनें नमुनेदार वाटत असतील त्यांतील ललितांगांची नुसती समजूत पटवून घेऊनच विद्यार्थ्यानें स्वस्थ बसतां कामा नये; तर एखादा कित्ता गिरवावा त्याप्रमाणें तीं वर्णनें महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यानें हातानें अवश्य पुन्हां पुन्हां गिरवावींत. हो, अगदीं कित्त्यासारखीं गिरवावींत! तीं घेऊन कागदावर पुन्हां पुन्हां उतरून काढावींत, तशीं तीं उतरून काढतांना कित्त्यांतील अक्षरांच्या लपेटीकडे जसें आपण लक्ष ठेवतों तसें त्यांच्या अंगोपांगाकडे लक्ष ठेवावें, आणि शेवटीं तीं वर्णनें दूर ठेवून आपण स्वतंत्रपणें तशीं वर्णनें लिहून काढावींत आणि वर्णनाची जी ऐट आपल्याला साधावयाची आहे ती आपल्याला कितपत साधली तें ताडून पहावें.

नुसत्या वर्णनापुरतीच अनुकरणाची किंवा नक्कलेची ही युक्ति वापरतां येईल असें नव्हे तर ललितकथेच्या ज्या ज्या प्रधान व गौण अंगोपांगांचा उल्लेख मीं पूर्वीं केला आहे त्या सर्वांच्या बाबतींत ही युक्ति शिकाऊ विद्यार्थ्यास वापरतां येईल. या दृष्टीनेंच नमुनेदार इंग्रजी कादंबऱ्यांतील निवडक स्थळांचें, अगर सबंधच्या सबंध लघुकथांचें सुंदर **भाषांतर** करावयाचा प्राथमिक विद्यार्थ्यास मी अवश्य सल्ला देईन. पूर्वी ज्या कित्येक इंग्रज, फ्रेंच, जर्मन, अगर रशियन लेखकांचा मीं उल्लेख केला आहे त्यांच्या लेखनाचे नमुने मिळवून त्यांचीं भाषांतरें ( प्रसिद्धीसाठीं नव्हे तर आपल्या खासगी अभ्यासासाठीं ) करण्याचा परिपाठ होशी विद्यार्थ्यांनीं अवश्य ठेवावा. ललित-

लेखनाच्या शिक्षणक्रमांतील पहिला क्रमिक धडा या दृष्टीनें भाषांतराचें महत्व फार आहे. असें भाषांतर करण्यांत कमीपणा मानण्याचें यत्किंचितही कारण नाहीं. आज कीर्तिशिखरावर चढलेल्या मराठी लेखकांपैकीं बहुतेकांनीं लेखनास भाषांतररूपानें प्रारंभ केला होता हें नेहमीं लक्षांत ठेवावें. आजच्या काळांत प्रत्यक्ष गुरुसहवास शक्य नसला तरी गुरुसहवासापासून घडणारा मुख्य लाभ-म्हणजे प्रत्यक्ष अनुकरण-लेखनकलेच्य बाबतींत शक्य आहे असें जें मीं म्हटलें त्यांतील मर्म आतां वाचकांच्या लक्षांत आलें असेल. आपल्या आवडत्या लेखकांच्या लेखनांतील अनेक सुंदर उताऱ्यांचें **पुनः पुन्हां भाषांतर करून पहाणें** हा त्यांचे ललितगुण आत्मसात् करून घेण्याचा शीघ्रफलदायी असा मार्ग आहे. या मार्गानें डोळसपणें परिश्रम करीत राहिल्यास शिकाऊ विद्यार्थ्यांच्या आयुष्यांत लवकरच असा काल येईल, कीं त्याला मूळ कित्त्यांची जरूर रहाणार नाहीं; व तो जें लिहील तें सहजच सुंदर असें वठेल. इतकेंच काय, त्याचें लिहिणेंच पुढल्या पिढीला कित्ता म्हणून गिरवावेसेंही वाटेल !

---

## नं. १०

ज्याला ललितलेखनाची कला शिकायची आहे त्यानें अनुकरणाच्या पद्धतीनें ती कशी शिकावी, व गुरुसहवासापासून सामान्यतः होणारे फायदे आपल्या पदरांत कसे पडून घ्यावे, याविषयींच्या माझ्या विवेचनाचा भलता अर्थ कोणी करून घेऊं नये. कारण ललितलेखनाच्या शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेंत नामांकित लेखकांच्या लिखाणाचे किते हातानें घटविणें अत्यंत हितकारक आहे हें जसें खरें, तसेंच पुस्त्या काढीत राहण्याच्या या शिक्षणास मर्यादा मानिली पाहिजे हेंही खरें. अक्षर सुंदर व्हावें यासाठीं कित्त्यावरून हात वळविणें अगत्याचें आहे, व त्याचा कंटाळा येऊं न देतां मांडी मोडून मानेवर खडा ठेवून बसणाराचा मोठा फायदा होईल यांत संशय नाहीं.परंतु केव्हां तरी आतां आपलें अक्षर सुंदर झालें असा विश्वास माणसानें धरलाच पाहिजे, व कित्ता दूर सारलाच पाहिजे यांतही संशय नाहीं! नेहमींच अक्षर काढायला बसायचें म्हटलें, कीं मांडी मोडून मानेवर खडा ठेवण्याची तयारी केली पाहिजे असें जो विद्यार्थी समजेल तो हास्यास्पदच ठरेल, नाहीं कां? एका जांवयाची गोष्ट सांगतात, कीं पत्रावर लहान श्री काढल्यावर त्याचें त्यालाच अशा विचारानें रडूं कोसळलें, कीं माझी पुस्तींतली भली मोठी श्री किती रोडावली! त्या जांवयासारखी अवस्था वाङ्मयाच्या अभ्यासकानें करून घेऊं नये. भाषांतर काय, किंवा मीं सुचविलें त्या पद्धतीचें अनुकरण काय–हे सारे प्राथमिक शिक्षणकालांतील क्रमिक धडे होत. त्या धड्यांपलीकडे मजल गेली, कीं त्यांचा त्यागच केला पाहिजे. दांडपट्टा शिकतांना प्रथम सोयीसाठीं व सुरक्षिततेसाठीं हातांत साधी काठी घ्यावी; पण युद्धाच्या प्रत्यक्ष गर्दींत शिरतांनाही ती काठी पाहिजे म्हणणारा कसला पराक्रम करणार? त्याला लोक मग शेंदाड शिपाईच म्हणतील!

शिवाय, ज्या अनुकरणाच्या तत्त्वानुसार वागून होशी विद्यार्थ्याला थोडी फार लेखनकला शिकतां येईल असें मीं म्हटलें, त्या अनुकरणाच्या बाबतींत एक फार महत्त्वाचा इशाराहि मला द्यावयाचा आहे.

तो इशारा असा, कीं नामांकित लेखकाची कला अनुकरणानें उचलतांना तिचीं **बाह्यांगें** तेवढीं उचलावीं; त्या लेखकांच्या **अंतरंगाचें अनुकरण** करण्याची

खटपट कधींही करूं नये. कारण **असलें अनुकरण शक्यही नाहीं व इष्टही नाहीं.** एखाद्या थोर लेखकाचें कथानककौशल्याचें, व्यक्तिदर्शनाचें, निवेदनाचें, अगर संवादरचनेचें तंत्र आपल्याला नमुनेदार वाटलें तर त्याचा कित्ता अवश्य गिरवावा. परंतु या बाह्यांगापलीकडे जाऊन त्या लेखकाच्या अंतरंगाचीही नक्कल उठविण्याची बुद्धि केव्हांही धरूं नये. असली नक्कल केल्यास ती सुपरिणामी तर ठरत नाहींच, पण ती करायची म्हटलें तरी तत्त्वतः सुसाध्यही नसते. किंबहुना ती सुसाध्य नसते म्हणूनच हितावहही ठरत नाहीं.

समजा, मोपासांच्या लघुकथांची निवेदनशैली आपल्याला अत्यंत लालित्य-पूर्ण वाटते. तशी ती वाटत असेल तर ती शैली कित्त्याप्रमाणें अवश्य गिरवावी, व अनुकरणानें आत्मसात् करावी. परंतु यापुढें जाऊन मोपासांच्या अंतरंगाचेंही अनुकरण आपण करूं लागलों, तर तें आपल्याला साधणेंच मुळीं अशक्य आहे. दुसऱ्याच्या अंतरंगासारखेंच आपलेंही अंतरंग आहे असें दाखविण्याचा आपण कितीही आव आणला तरी त्याचा काय उपयोग ? मोपासांच्या शैली-सारखी शैली अनुकरणानें कमावणें शक्य आहे, व तशा शैलीनें आपण लिहूं लागलों तर वाचकांच्या मनावर आपल्यालाही मोहिनी टाकतां येईल. पण संसारांतील विविध प्रसंगीं मोपासांच्या अंतःकरणांत ज्या अनावर भावना उद्-भवल्या, व ज्या त्यांनीं आपल्या लघुकथांच्या द्वारें निर्भीडपणें बोलून दाख-विल्या, त्याच आपल्या भिन्न प्रकृतीच्या संसारांत आपल्याही अनुभवास आल्या असें सोंग आणण्यांत फायदा कोणता ? आणि तसें सोंग आणलें तरी तें यशस्वी होणार कसें ?

प्रत्येक व्यक्तीचे अंतरंगांतले अनुभव भिन्न भिन्न असतात. ते ललित-कथांच्या द्वारें व्यक्त करतांना जें तंत्र वापरलें जायचें तें सामान्य असूं शकेल; परंतु ते अनुभव कधींही सामान्य असूं शकणार नाहींत. तंत्र म्हणजे कोंदण म्हणा ना ! त्याचा ठराविक सांचा कल्पितां येईल, आणि एखाद्या नामांकित लेखकानें रूढ केलेला सांचा आपल्याला मनोहर वाटला तर त्याची हुबेहूब नक्कल करणें शक्य व इष्टही आहे. परंतु अशा कोंदणांत जे खडे बसवायाचे ते त्या त्या लेखकाच्या स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या खाणींतीलच असावयास पाहि-जेत. आणि ही खाण अशी असते, कीं ती कोणी कोणाला देऊं शकत नाहीं, कोणी कोणापासून घेऊं शकत नाहीं, किंवा त्या खाणीची नक्कलही होऊं शकत

नाहीं. उलट, अशी नक्कल कोणीं केली तर ती तावडतोब उघडकीस येते. आणि लोक चटकन ओळखतात, कीं अरे याच्या जवळचे खडे खरे नसून खोटे आहेत! ज्या अनुभवाचें यानें सोंग आणलें आहे ते या बेट्याचे स्वतःचे नव्हेत!

म्हणून युरोपिअन ललितलेखकांचें हृदयंगम ललितलेखनतंत्र आपण अवश्य शिकलें पाहिजे, पण त्यांच्या अनुभवांची नक्कल आपण कधींही करतां कामा नये. उदाहरणार्थ, असें पहा, कीं हल्लीं रशियन वाङ्मयाकडे अनेक कारणांनीं आपलें लक्ष वेधलें असल्यामुळें आपल्यांपैकीं पुष्कळजणांस ललितलेखनांत त्यांची नक्कल उठविण्याचा मोह झालेला दिसतो. परंतु हा मोह वेडेपणाचा होय. एक तर असें, कीं रशियन ललितलेखकांविषयीं सामान्यपणें बोलावयाचें झाल्यास त्यांचें तंत्र विशेष कलायुक्त ठरणार नाहीं. तें तसें नाहीं याचीं अनेक कारणें सांगतां येतील. परंतु तीं सांगतां आलीं म्हणून कांहीं त्यांतील कलावैगुण्य नाहींसें होत नाहीं. तेव्हां तंत्राच्या दृष्टीनें रशियन वाङ्मयाची नक्कल सुपरिणामी नाहीं; आणि रशियन लेखकांच्या अनुभवाची नक्कल तर सुपरिणामीहि नाहीं, आणि तत्त्वतः पाहिल्यास शक्यही नाहीं. केवळ रशियन वाङ्मयांत शोकप्रधान कथा फार आहेत म्हणून आपणही शोकप्रधान गोष्टी, नाटकें अगर काद‌ंबऱ्या लिहूं लागलों तर आपल्या लिखाणांत जिवंतपणा येणेंच शक्य नसतें, व मग जिवंतपणाच्या अभावीं आपल्या लेखनास लालित्यही यावें तसें येणें दुर्घट होतें. टॉलस्टॉयपासून तों लिओनॉव्ह किंवा रोमॅनॉव्हपर्यंतच्या रशियन लेखकांस जगाचे जे विलक्षण अनुभव आले ते त्यांचे त्यांनींच ललितकथारूपानें वाचकांपुढें धरले तर ते मूल्यवान जवाहिराप्रमाणें चकाकतात, व मनें वेधून धरतात. परंतु म्हणून त्यांच्या अनुभवांची नक्कल उठवून आपणही भयाण, उदासवाणें, शोकप्रधान लिहूं लागलों तर मर्मज्ञ वाचक आपल्या लिखाणाची किंमत खोट्या खड्याइतकीच ठरवितील.

म्हणजे असें, कीं नामांकित लेखकाच्या लिखाणाचें वाचन करतांना विद्यार्थ्यानें त्याचे दोन भागच मनाशीं कल्पावेत. एक भाग असा, कीं त्याचा कित्ता गिरवून हस्तगत करायचा; आणि दुसरा असा कीं त्याचा नुसता मनसोक्त आस्वाद घ्यावयाचा. त्या नमुनेदार लिखाणांत जें लेखनतंत्र दिसून येत असेल तें आपल्याला अनुकरणानें शिकावयाचें आहे अशी बुद्धि ठेवावी. पण त्यांत त्या श्रेष्ठ लेखकांचे जे अनुभव ग्रथित झाले असतील त्यांचा फक्त उपभोग आपल्यास घ्यावयाचा आहे येवढें तारतम्य बाळगावें. सारांश, **दुसऱ्याच्या लेखनाची कलाकुसर अवश्य शिकावी, पण दुसऱ्याच्या लेखनाचा विषय अनुकरणानें कधींही उचलूं नये.**

---

## नं. ११

ज्या विषयाचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्या विषयाबद्दल लिहिण्याचा मोह फार वाईट. शिकाऊ लेखकानें तो मोह कटाक्षानें टाळावा. केवळ अमक्या एका नामांकित लेखकानें अमुक एका विषयाबद्दल लिहिलें आहे, व त्याची वाङ्मयकृति फार लोकप्रिय झाली आहे, येवढ्यासाठीं, अनुभवाच्या अभावीं, त्या विषयावर लिहूं पाहणें वेडेपणाचें होईल. असला वेडेपणा जो करतो त्याच्या हातून जें लिहून होतें त्याला तर असत्यतेचा उग्र वास येतच असतो, पण शिवाय त्याच्या स्वतः-च्या अनुभवांत ललितलेखनाचा विषय होण्यास योग्य असा जो थोडा भाग असतो तोहि वापरण्यांत न आल्यामुळें लवकरच गंजून कुचकामाचा होतो.

कॉलेजांतले—व शाळेंतलेही—पुष्कळ विद्यार्थी कांहीं लिहिलेलें दाखविण्यासाठीं माझ्याकडे येतात. त्या लिखाणांत प्रशंसनीय व कौतुकास्पद भाग पुष्कळच असतो. किंबहुना तें वाचून माझ्या मनांत असा आनंददायक विचार अनेक वेळां येतो, कीं पांच दहा वर्षांनीं जी नव्या लेखकांची पिढी उदित होईल ती आमच्या सध्यांच्या पिढीहून किती तरी कर्तृत्ववान् ठरेल! गाजलेल्या नांवाच्या लेखकांपेक्षांही अधिक सरस शैलीनें लिहिणारे दहा पांच विद्यार्थी तर माझ्या चांगल्या परिचयांतील आहेत. अशा तरुण अज्ञात लेखकांच्या कादंबऱ्या प्रकाशित होण्यास आज कांहीं मार्ग नसावा ही आपल्या वाङ्मयाची मोठी हानि करणारी गोष्ट होय असेंही मला नेहमीं वाटतें. त्या बाबतींत एक योजनाही मीं मनाशीं ठरविली आहे, व ती लवकरच मी जाहीरही करीन. सांगण्याचा मुद्दा असा, कीं तरुण विद्यार्थ्यांचें जें लिखाण माझ्या वाचण्यांत येतें त्यांत प्रतिभेची व तंत्रकौशल्याचीहि चमक मला वारंवार दिसते. परंतु त्याबरोबरच असेंहि वाटतें, कीं आमच्या उद्योन्मुख लेखकांस अजून पुष्कळच गोष्टी शिकावयाच्या आहेत, व पुष्कळच चुका सुधारावयाच्या आहेत. नव्या लेखकांनीं अमुक गोष्टी नमुनेदार म्हणून उचलाव्या हें जसें मीं आतांपर्यंत सांगितलें, तद्वत अमुक गोष्टी अनिष्ट म्हणून त्यांनीं टाळाव्या असेंही मला यापुढें सांगावयाचें आहे. त्या सांगतांना तरुण होशी विद्यार्थ्यांच्या हातून कोणत्या चुका घडतात असा माझा अनुभव आहे, व त्या त्यांनीं कशा सुधाराव्या असें मला वाटतें—इत्यादि गोष्टीहो

उघड होतील. तें सांगण्यास आरंभ करण्याच्या हेतूनें असें म्हणावेंसें वाटतें, कीं नामांकित लेखकांच्या विषयाची नक्कल करूं नये, व स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवास जो विषय आला नाहीं त्याबद्दल लिहूं नये, असा जो इशारा गेल्या लेखांकांत मीं दिला त्याची जाणीव फारच थोड्या तरुण लेखकांना असते.

वयोवृद्ध, नामांकित लेखक ज्या विषयांवर नाटकें, कादंबऱ्या, व गोष्टी लिहितात त्याच विषयांवर शाळा कॉलेजांतले होतकरू लेखकही लिहितात. मिश्रविवाह,घटस्फोट,इत्यादि विषयांवर वाङ्मयक्षेत्रांतील धुरंधर लेखकांची लेखणी चाललेली पाहून अल्पवयी लेखकही लेखणी उचलतात, व त्याच विषयांवर खुशाल चालवितात. मोठ्या लेखकांच्या विषयांचें व अंतरंगाचें केलेलें हें अंधानुकरण, प्रत्यक्ष अनुभवाचें बूडच त्यास नसल्यामुळें, परिणामीं हास्यास्पद ठरतें.

कित्येक शाळांतल्या विद्यार्थ्यांनीं हौसेनें चालविलेलीं हस्तलिखित मासिकें मला पाहुला मिळतात; व त्यांतही ह्या विषयांच्या बाबतींतला अंधानुकरणाचा प्रमाद स्पष्ट नजरेस येतो. त्यांतहि कामिनीनें झिडकारल्यानें हताश व निराश झालेले कवीच गझलगीतें गातांना ऐकूं येतात, लघुकथांत एक दोन मुडदे उगीचच्या उगीच पाडलेले दिसतात, चालूं कादंबरीचें सदर असलें तर त्यांत सुप्रसिद्ध कादंबऱ्यांच्या विषयांची पुनरुक्ति असते, आणि एखादा निबंध असला तर तोहि "फांशीची शिक्षा रद्द करावी कीं नाहीं?" असल्याच विषयावर असतो. अर्थात येथून तेथून विषयाची नक्कल झाल्यामुळें हें सारें लेखन तेजोहीन व सत्त्वहीन वाटल्यावांचून रहात नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें कांहींसें हास्यास्पदही ठरण्यासारखें असतें. मुनसफाच्या आठ दहा वर्षांच्या लहान मुलानें बापाचा चष्मा व रुमाल चढवून कचेरींत जावें, आणि त्याच्या खुर्चीत बसून न्यायनिवाडे द्यावेत त्यापैकींच हा प्रकार ठरतो! नाहीं कां?

आणि खरें पाहतां असा प्रकार कां व्हावा? तरुण शिकाऊ विद्यार्थ्यांनीं वयस्क लेखकांच्या अनुभवाची, व विषयांची नक्कल काय म्हणून करावी? ज्या सुखदुःखभावना वयस्क लेखकांस लिहिण्यास प्रवृत्त करतात त्यांचें सोंग त्यांनीं कां आणावें? लेखन निर्माण करण्याइतक्या प्रबळ अशा काय त्या तेवढ्याच भावना, तेवढेच अनुभव, आणि तेवढेच विषय होत, अशी वेडी समजून त्यांनीं कां बाळगावी?

**लेखनाची निर्मिति विषयावर अवलंबून नसून लेखकाच्या अंतःकरणांत उडणाऱ्या भावनांच्या खळबळीवर अवलंबून असते.** ही खळबळ विविध व्यक्तींच्या अंतःकरणांत भिन्न भिन्न विषयांनीं व अनुभवांनीं उडत असते; व म्हणून एकानें दुसऱ्याच्या विषयांची नक्कल करण्यांत कोणताही फायदा नसून, ज्यानें त्यानें आपापल्या प्रत्यक्ष अनुभवक्षेत्रांतल्या विषयावर लिहावें हेंच हितावह आहे.

शाळा कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांनीं आपल्या भोंवतालच्या जगाचें मार्मिक अवलोकन केलें तर ललितलेखनास योग्य असे विषय त्यांस कितीतरी सांपडतील ! मारकट, पोरकट, शिवराळ, संतापी, उदार, प्रेमळ, भोळसर अशा हजार तऱ्हांच्या मास्तर मास्तरणींचीं चित्रें; विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शेंकडों नमुने, गड्यांचे, शिपायांचे व कारकुनांचे आंबट, खारट, तुरट चेहरे, अभ्यासांतले नानातऱ्हेचे विनोदप्रसंग, कोंवळ्या, तरुण मित्रमैत्रिणींतील साध्या-सुध्या, मुग्ध Comedies व Tragedies–एक ना दोन, खरोखरच असंख्य मनोहर विषयांनीं आमच्या होतकरू विद्यार्थि–लेखकांचें जग नित्य भरलेलें आहे. त्यांचें ते चतुराईनें अवलोकन करतील, व आपल्या हृदयाला ज्या गोष्टी खरोखरच बोंचल्या, उद्वेगकारक वाटल्या, अगर परमसुखाच्या झाल्या, त्यांबद्दल लिहिण्याचा ते कटाक्ष ठेवतील, तर त्यांच्या लेखनांतील ओजस्विता लवकर मान्य होईल.

ललित वाङ्मयाच्या इतिहासांत मधून मधून असे कालखंड येतात, कीं त्या वेळीं कांहीं विशिष्ट विषयांचें स्तोम माजतें, व जो उठतो तो त्या विषयावरच लिहावयास लागतो. "अविवाहित कुमारिकेस संतति झाली तर समाजानें तिला औदार्यानेंच वागवावें" अशा प्रतिपादनाची लाट सध्यां युरोपियन कादंबऱ्यांवर आलेली दिसत आहे. Sinclair Lewis च्या Ann Vickers या नव्या कादंबरींत हा विषय पुढें मांडला आहे, व Vicki Baum या जर्मन लेखिकेची Helene ही ताजी कादंबरी याच विषयावर आहे. आपल्या मराठींतही वेश्येच्या मुलीशीं लग्न करणाऱ्या नायकांची मधें बरीच गर्दी होऊं पहात होती, व आतां मजुरांची संघटना करणारे स्त्रीपुरुष दाटी करणारसे दिसतें. हे विषय वावगे आहेत असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. लग्नाच्या बाचनींत वधुवरांच्या परस्परप्रीतीखेरीज कसलेंही बंधन नसावें असें मानणाऱ्यां-

पैकीं मी आहे हें नव्यानें सांगायला नको. हे विषय वावगे नाहींत. वावगें होतें तें हें, कीं जीं माणसें वेश्येकडे कधींच निर्भयपणें गेलीं नाहींत, ज्यांनीं वेश्यांचे आचार विचार, त्यांच्या समजुती, त्यांचें श्रद्धेचे प्रकार, इत्यादींचा कधीं अभ्यास तर राहोच पण परिचयही करून घेतला नाहीं, तीं माणसें त्यांबद्दल गोष्टी अगर कादंबऱ्या लिहितात! तद्वतच ज्यांनीं मजुरांशीं समरस होऊन चार दिवसही कधीं घालविले नाहींत त्यांनीं त्यांच्या संसारावर व चळवळींवर कादंबऱ्या व नाटकें लिहावीं हेंही वावगेंच नव्हे काय?

पण असल्या बहुरूपीपणाची लाट वाङ्मयाच्या इतिहासांत मधून मधून उसळते हेंच खरें. शिकाऊ विद्यार्थ्यांना माझें येवढेंच सांगणें, कीं बड्या बड्या लेखकांना असल्या लाटेच्या कडेवर बसून घटकाभर उंच मिरवायचें असेल तर खुशाल मिरवूं द्या! तुम्ही या प्रकारापासून अगदीं अलिप्त रहावें हेंच उत्तम. जें ललितवाङ्मय केवळ विषयाचें व अनुभवाचें उसनें अवसान आणून लिहिलें जातें तें **दुष्ट वाङ्मयप्रकार** या सदरांतच मोडेल!

" दुष्ट वाङ्मयप्रकार " ही संज्ञा मी अशा अभिप्रायानें योजितों, कीं जे प्रकार सदोष व अनुकरणास सर्वथा अयोग्य ते. मीं पूर्वीं म्हटलेंच आहे, कीं अमुक केल्यानें ललितलेखनाची कला विद्यार्थ्यास थोडी फार साध्य होईल असे ज्याप्रमाणें मला वाटतें, त्याप्रमाणें अमुक करण्याची बुद्धि विद्यार्थ्याला झाल्यास, त्याचें योग्य मार्गापासून स्खलन होईल असेंही मला वाटतें; व पहिल्या बाबतींतले माझे विचार जसे मीं पुढें मांडले, तसेच दुसऱ्याही बाबतींतलीं माझीं मतें सांगणें हें मी माझें कर्तव्यच मानतों. कारण वाङ्मयाच्या क्षेत्रांत वृथा निंदा अथवा नालस्ती कधींही घडूं देऊं नये हें जितकें खरें, तितकेंच जे अनिष्ट वाङ्मयप्रकार रूढ होऊं पहात असतील, त्यांस अनिष्ट म्हणण्यास संकोच केल्यानें हितापेक्षां अहितच अधिक होईल हेंही खरें. अशा प्रकारांची कनिष्ठता, व कलाहीनता कोणीं उघडपणें सांगितली नाहीं तर त्यांची रूढि वाढत जाते, त्या वाढत्या रूढीमुळें ते वाङ्मयप्रकार मोठे प्रशंसनीय व अनुकरणीय होत, अशी होतकरू लेखकांची गैरसमजूत होते, व नव्या लेखकांची अशी दिशाभूल होऊं दिल्यास वाङ्मयाचें अंतीं फार मोठें नुकसान झाल्यावांचून रहात नाहीं. तें टळावें अशी इच्छा असल्यास आपल्या मराठी वाङ्मयांत सध्यां कोणते दुष्ट प्रकार रूढ होऊं पहात आहेत, त्याविषयींचा तरुण विद्यार्थ्यांस अवश्य तो इशारा देणें अगत्याचें आहे असें मला वाटतें.

या सर्व दुष्ट वाङ्मयप्रकारांचें सामान्य स्वरूप सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल, कीं ते सारे " **झटपट रंगारी** " जातीचे आहेत. चार सहा ओळी लिहिल्या कीं कवित्व ठरावें, दहाबारा ओळी लिहिल्या कीं छटाकार म्हणून नांव सांगतां यावें, एक अंक लिहिला कीं नाटिकाकाराची जातकुळी प्राप्त व्हावी,—सारांश, ललित वाङ्मयांतील कोणत्याही शाखेंत पदस्थित व्हावयास थोडकीशी कामगिरी पुरेशी ठरावी, अशा धोरणानें सध्यां मराठी वाङ्मयांत बऱ्याच सुधारणा (!) घुसडल्या जात आहेत. तीन वर्षांत इंग्रजी धुळाक्षरांपासून तों थेट मॅट्रिकपर्यंत झटपट शिक्षण मिळण्याची जशी हल्लीं

शहरोशहरीं व्यवस्था झाली आहे, तशीच लेखक ही पदवी प्राप्त करून घ्यायचे झटपट मार्ग हल्लीं खुले झाले आहेत !

ललित वाङ्मयांत त्रुटित लिखितांचे प्रकार संभवत नाहींत असें माझें म्हणणें नाहीं, किंवा त्रुटित लेखनांत कलाविलास संभवत नाहीं असेंही मी ध्वनित करूं इच्छित नाहीं. उलट, पाल्हाळ लालित्यास विघातक आहे हेंच तत्त्व मराठी लेखकांत अजून उमजावयास हवें तितकें उमजलेलें नाहीं अशीच माझी तक्रार आहे. परंतु कलासौंदर्याची हानि न व्हावी एतदर्थ पत्करलेला आटोपशीरपणा अगर प्रमाणबद्धता वेगळी, आणि मुळांत अंतःकरणांतील भांडवलच अत्यल्प म्हणून कृतीला आलेली त्रोटकता निराळी ! या दुसऱ्या प्रकारच्या त्रोटकतेनें पहिल्या प्रकाराचें कातडें कितीही पांघरलें तरी तिचें मूळचें हीन स्वरूप झांकलें जाणें शक्य नाहीं !

महाकाव्यांचा पुरातन काळ आतां उरलेला नाहीं याबद्दल वादच नाहीं. काळाच्या बदलत्या स्वरूपाबरोबर वाङ्मयाचें बाह्य स्वरूपही बदलणें अपरिहार्यच नव्हे, तर इष्टही असतें. आज महाकाव्यें वाचण्याची फुरसत वाचकांस नाहीं. रात्रंदिवस पारायण करून एकच महाभारत अगर रामायण वाचण्यासारखी वाचकांची परिस्थिति आज नाहीं. आजच्या धांदलीच्या आणि धांवपळीच्या काळांत महाकाव्यांचे अजस्र ग्रंथ हातीं वागविण्याची सोयच उरलेली नाहीं. वाचकाच्या हृदयास कलेचा अनुभव आणि तज्जन्य आनंद प्राप्त करून देणें, हेंच ललितवाङ्मयाचें कार्य पुराणकालींही होतें, तसेंच आजही असलें, तरी तो आनंद उद्भवण्यास दीर्घकाल लागून आज चालणार नाहीं. जीवनकलहांत आपलें डोकें वर ठेवण्यासाठीं दिवसभर खपून घटकाभर मनाला विरंगुळा मिळावा, म्हणून ललितवाङ्मयाकडे आशेनें वळणाऱ्या स्त्रीपुरुषांची आनंदलालसा साहजिकपणेंच अधीर प्रकृतीची झालेली आहे. पुरातन काळचा धिमेपणा तिच्यांत नाहीं. पांच मिनिटांत जेवण उरकल्यावांचून जसें लोकांना आज गत्यंतर नाहीं, तसेंच पाल्हाळ न करतां आल्हाद आणि कलास्वाद देणारें ललितवाङ्मय लोकांना आज हवें आहे. चार घटका आवाज लागण्यांत गेल्यावर जमणारा गवई जसा आज मुदतीबाहेर गेलेला ठरेल, तद्वतच चारशें पृष्ठांचें वाळवंट ओलांडून गेल्यावर ज्यांत एखादें कलाविलासाचें सरोवर लागतें असें पद्य अगर गद्य वाङ्मय आज लोकांच्या उपयोगाचें नाहीं. सारांश, ललित

8.6.5

वाङ्मयाचें "महाकाव्य" स्वरूप नाहींसें होऊन त्यास आटपशीर, सुटसुटीत स्वरूप आज प्राप्त व्हावें हें सर्वस्वी साहजिकच होय!

आणि इतकें असूनही असें म्हणणें भाग आहे, कीं त्रुटित लेखनाचे जे प्रकार मराठी वाङ्मयांत रूढ होऊं पहात आहेत, ते कौतुकास्पद नाहींत, इतकेंच नव्हे तर ते अनिष्ट आहेत. आणि नव्या लेखकांनीं ते त्याज्य मानावेत यांतच त्यांचें व मराठी भाषेचें हित आहे. कारण, ललितलेखनाला पोरखेळाची अवकळा आणण्यापलीकडे या प्रकारांनीं दुसरी कोठलीही गोष्ट साध्य होत नाहीं असें स्पष्ट दिसत आहे. हे प्रकार लालित्यपूर्ण आणि मोठ्या कौशल्याचे आहेत म्हणून ते लोकप्रिय होत आहेत असें नसून, ते कोणीहि सहजासहजीं खरडावेत इतके सुलभ आणि चातुर्यविहीन आहेत, म्हणून ते उत्तरोत्तर अधिकाधिक रूढ होत चालले आहेत. तंतुवाद्यावर सुरेलपणें चार चिजा वाजविण्यास जे श्रम व जें अध्ययन लागतें, त्याच्या शतांशही पेटीवर चार पदें वाजविण्यास लागत नाहीं म्हणूनच बाजाच्या पेटीचा झपाट्यानें प्रसार झाला, व घरोघर पोरेंसोरेंही "किति मजेदार हार" वाजवीत सुटलीं. मी म्हणतों त्या त्रुटित लेखनप्रकारांची गोष्ट यापैकींच आहे.

उदाहरणार्थ, नाट्यछटेचा विचार करण्यासारखा आहे. कै. दिवाकर यांनीं आपल्या लेखनकौशल्यानें हा प्रकार रूढ व लोकप्रिय केला. त्यांच्या कांहीं नाट्यछटा खरोखरच हृदयस्पर्शी झाल्या आहेत. परंतु त्या लेखनप्रकारास आज काय रया आली आहे पहा. इंग्रजी दुसरी तिसरींतल्या मुलांनींदेखील नाट्यछटा लिहिलेल्या माझ्या अवलोकनांत आल्या आहेत. त्यांत मर्मज्ञता, रसिकता, सूक्ष्मावलोकन इत्यादि गुणांचा सर्वस्वी अभाव असतो हें उघडच आहे. पण तसें असूनही त्या 'नाट्यछटा' नाहींत असें म्हणायची सोय नाहीं! कारण त्या लेखनप्रकाराचें खास तंत्र म्हणून जें कांहीं समजलें जातें तें त्यांत भरपूर असतें.

परस्पर विसंगत दहा वीस वाक्यें लिहिलीं कीं बनली 'नाट्यछटा' अशी समजूत प्रचलित झाली आहे. ज्या गृहस्थानें जन्मांत कधीं स्नानसंध्या केली नाहीं त्यानें आपल्या मुलानें संध्या सोडली हें पाहून अलीकडची पिढी धर्मलंड झाल्याची बडबड केलेली दाखविली, अथवा जो दिवसांतून पंचवीस कप चहा पितो त्यानें गल्लोगल्लीं चहाचीं हॉटेलें निघाल्याबद्दल व्याख्यान झोडलेलें

दाखविलें, कीं झाली तयार नाट्यछटा! हल्लीं नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या नाट्यछटा वाचून पाहिल्या तर त्या असल्या समजुतीनेंच लिहिलेल्या असतात. आणि ही समजूत सोयीची असल्यामुळें जो तो लेखक तीच उराशीं धरतो व खरडीत सुटतो. वाचकांच्या हृदयांत विचारप्रक्षोभ उठविण्यासारखी वीसपंचवीस ओळींची सुंदर 'नाट्यछटा' लिहिणें खरें पाहतां फार दुष्कर, व मोठ्या कलाचातुरीचें काम आहे! पण त्यांतला मर्मज्ञतेचा, सहृदयतेचा आणि भावनाविलासाचा भाग लक्षांत न घेतां, वीस पंचवीस ओळींच्या सांच्याचेंच स्तोम माजविलें, कीं, "नाट्यछटा" कोणीही उठून लिहावी ही अनवस्था क्रमप्राप्तच होय, व तीच आज झालेली दिसत आहे. अल्पावकाशांत लालित्य निर्माण करणारा सहृदय लेखक वाचकांस केव्हांही मान डोलवायलाच लावील. पण त्याच्या कृतीची अल्पता तेवढी उचलून तिची नक्कल करणारे शेकड्यांनीं मोजण्याइतके निर्माण झाले तरी वाङ्मयाला तें भूषणास्पद नव्हे, तर दूषणास्पदच होईल!

## नं. १३

जी गोष्ट 'नाट्यछटे'ची तीच गोष्ट आज मराठींत रूढ होऊं पहाणाऱ्या इतर त्रुटित लेखनप्रकारांची. सध्यां मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या लघुकथांची गणति केली तर चार पांचशें लघुकथा महाराष्ट्र सरस्वतीच्या गळ्यांत दर महिन्याला पडत आहेत असें दिसून येईल. चार पानी, तीन पानी, दोन पानी इतकेंच काय एक पानी सुद्धां लघुकथा निघाल्या आहेत! आणि त्यांत लघुकथेचें अवश्य तें तंत्र अगर सौंदर्य यत्किंचितही दिसत नाहीं हें जाणूनच कीं काय, असल्या लिखाणास लघुकथा या नांवाऐवजीं नवीं नवीं नांवेंही लिहिणारे शोधून काढीत आहेत! लघुकथा लिहिण्याचें कौशल्य फार लोकांना अवगत झालें म्हणून नव्हे, तर पानभर लिहिलें तरी पुरतें अशी लिहिणारांनीं सोयीस्कर समजूत करून घेतली आहे म्हणून लघुकथांच्या गिरण्या जोरानें चालू आहेत, व त्यांच्या धुराड्यांतून निघणाऱ्या धुरानें वाङ्मयाचा इतिहास काळा होत आहे!

थोडकेंसें कांहींही खरडलें कीं ललितवाङ्मय म्हणून तें खुशाल बाजारपेठेंत वटवावें या समजुतीनें कवितेच्या क्षेत्रांत तर विलक्षण धुडगूस घातलेला सध्यां दिसतो. महाकाव्यांचा काळ गेला तो कायमचाच आणि सर्वस्वी गेला, आणि बोटभर काव्याचा नवा संप्रदाय उदयास आला. त्याचा आतां इतका अतिरेक झाला आहे, कीं कवितेची लांबी बोटभरसुद्धां उरली नाहीं! नखभर काव्येंच जिकडे तिकडे बोकाळलीं आहेत. जुनें मराठी काव्य आणि नवें मराठी काव्य यांच्या सरसनीरसतेबद्दलचा वाद मध्यंतरीं पुष्कळ माजला होता. त्या वादाच्या वेळीं आधुनिक मराठी कवितेचे जे ठळक दोष आविष्कृत केले गेले ते कसोशीनें सुधारण्याचा पराक्रम तर नव्यानें उदयास येणाऱ्या कवींच्या हातून घडलेला दिसत नाहींच, पण उलट एक नवाच दोष मात्र आधुनिक मराठी कवितेला झपाट्यानें जडलेला दिसतो. तो दोष म्हणजे त्रुटितपणाचा!

सुनीतांचें बंड वेगानें जिकडे तिकडे पसरलें याचें कारण त्या काव्यप्रकारांतही लालित्य उत्पन्न करण्याइतकी प्रतिभा एकाएकीं सांथ पसरावी त्याप्रमाणें शेंकडों लोकांच्या ठायीं एकदम विसाव्या शतकांत स्फुरण पावली म्हणून, असें तर खचितच नव्हे! सुनीतें भराभर आणि भाराभर तयार व्हावयास लागलीं

याचें खरें कारण असें, कीं चवदा ओळी जुळविल्या कीं त्याला काव्य म्हणतां येतें असा नवा परवाना सरस्वतिमंदिराच्या भिंतीवर चिकटलेला लोकांना दिसला, व चवदा ओळी जुळविणें सहजसाध्य आहे हेंही लोकांना दिसून आलें. मग ज्यानें उठावें त्यानें भट्टी पेटवून घण मारावेत, आणि चवदा चरण तयार झाले कीं तेवढ्या साहित्यावर साहित्यक्षेत्रांत घुसावें असें साहजिकपणेंच झालें.

त्रुटित काव्यांचा हा संप्रदाय आतांशा तर इतका विकोपास गेला आहे कीं, कांहीं कवी चार चार ओळींचे अभंग देखील धडाक्यानें प्रसिद्ध करीत आहेत. जणूं तुकाराम महाराजांचेच हे अवतार! तुकाराम महाराजांच्या अंगची विरक्ति, स्फूर्ति, व आत्मोद्धाराची तळमळ यांच्या ठिकाणीं काडीमात्रही नसतांना हे कवी अभंग प्रसिद्ध करतात याचें खरें कारण येवढेंच कीं, दहा बारा शब्दांचा आणि साडे तीन ओळींचा सांचा जुळला कीं, त्याला 'अभंग' हें नांव देऊन तो लोकांस ऐकविण्याचें अजब धाष्टर्य यांच्या ठिकाणीं वास करीत आहे! चवदा ओळींचीं सुनीतेंदेखील रचण्याची ताकद ज्यांच्यांत नाहीं त्यांच्यासाठीं चवदा अर्थहीन शब्दांच्या नखभर अभंगांची नवी टूम निघालेली दिसते. आणि एखाद्या मोठ्या दुकानावर "घटाडो भाव" पाटी लागली कीं, तेथें प्रतिष्ठित गिऱ्हाईक म्हणून जायची संधि जन्मदरिद्र्यांनाही मिळते तद्वत् अलबते गलबते काव्यक्षेत्रांत प्रतिष्ठितपणानें गर्दी करणार अशीं दुश्चिन्हें दिसत आहेत.

मराठी कवितेचा गेल्या पंचवीस वर्षांतील इतिहास पहिला तर स्पष्ट दिसतें कीं, ज्या ज्या प्रकारांनीं काव्यरचनेचा मार्ग अधिकाधिक कौशल्यशून्य व सुलभ होईल त्या प्रकारांचेंच तेवढें नेमकें स्वागत भराभर होत गेलें. शब्दसौष्ठवाची देणगी ज्यांना नाहीं त्यांनीं वास्तविक काव्यरचनेच्या वाटेस जाऊं नये हें उत्तम! पण असल्या लोकांना कवी म्हणून मिरविल्याशिवाय तर चैन पडेना. तेव्हां त्यांनीं युक्ति काढली, कीं, काव्याला प्रसादाची अगर सौष्ठवाची गरजच नाहीं अशी ओरड करावी! ही हूल उठतांच रस्त्यावर चार माणसें जमलीं कीं, चाळीस गोळा व्हावयाला वेळ लागत नाहीं, त्याप्रमाणें त्या आरडाओरडींत कविपदासाठीं हपापलेले सारेच लोक सामील झाले, आणि ठरलें कीं, कवितेला सौष्ठवाची आवश्यकता आहे असें म्हणणाऱ्यांना काव्याचें मर्मच कळलेलें नाहीं!

या सिद्धान्ताच्या समर्थनासाठीं मोठमोठ्या मुद्यांची जुळवाजुळव करायचा या नवमतवाद्यांनीं झटून प्रयत्न केला. ते आवेशानें म्हणाले, "अहो, काव्य शब्दांसाठीं आहे, कीं शब्द काव्यासाठीं आहेत? अर्थात शब्दासाठीं काव्य नसून काव्यासाठीं शब्द आहेत! काव्य म्हणजे कविहृदयांतून उसळणारा भावनांचा दुर्दम्य स्रोत आहे! ती एक उसळी आहे. स्फूर्ति आहे. ती बाहेर पडलीच पाहिजे. तिला कसलीही आडकाठी असतां कामा नये. चांगल्या गोड गोड लालित्यपूर्ण शब्दांतच ती व्यक्त झाली पाहिजे हा कायदा उपयोगी नाहीं. वांकड्या तिकड्या अष्टावक्र, खडबडीत शब्दांत ती प्रगट झाली तरी तिचा साऱ्यांनीं आदरच केला पाहिजे."

ही ललकारी ऐकतांच इतके दिवस सरस्वतिमंदिराच्या दाराशीं ताटकळत बसलेल्या कविब्रुवांच्या हृदयांत एकदम मोठी आशा उत्पन्न झाली व आनंदानें उभे राहून ते ओरडले, "सौष्ठवाचा जमाना संपला! खडबडीत शब्दांचा जमाना सुरू झाला! खडबडीत शब्द कीं जय! जय बलभीम!" आणि प्रासादिक वाणीची ब्याद अशाप्रकारें एकदांची नाहींशी झाल्यावर मग काय विचारतां? वळवाची वृष्टि होऊन नदीनाल्यांतून घाणेरड्या, गढूळ पाण्याचा प्रचण्ड लोंढा एकदम सुटावा तद्वत् मराठी काव्याची नदी दुथडी भरून वहात असलेली दिसूं लागली।

जी गोष्ट शब्दसौष्ठवाची तीच गोष्ट यमकाची. निर्यमक काव्याचा जो विलक्षण कैवार आमच्या कवींनीं घेतला त्याचें खरें कारण हें, कीं यमकांची ती भानगड त्यांना जुळेना. आणि कवितेशीं सलगी केल्याशिवाय तर त्यांना धीर निघेना! वास्तविक कोणाही मार्मिक व सहृदय मनुष्याला हें पटलें पाहिजे, कीं ज्याच्या अंगीं खरोखरच प्रतिभा व काव्यशैली आहे, त्याच्या हातून सौष्ठवपूर्ण रचना सहजासहजींच घडत असते, आणि यमकांची जुळणीही त्याला प्रयासावांचून साधते. काव्यप्रसाद असला म्हणजे यमकेंच नव्हेत तर प्रासानुप्रास देखील जाईच्या वेलीवर सहज फुलणाऱ्या कोमल पुष्पांप्रमाणें कवितेंत बहरतात! मोरोपंतांच्या सारखीं दहा दहा बारबारा अक्षरांचीं यमकें जुळविण्याचा हव्यास धरला कीं काव्यांतील स्फूर्त भाग नष्ट होऊन त्याला यांत्रिकपणा येतो हें कोणीही मान्य करील. परंतु उलट, दोन चरणांत फक्त अंत्याक्षराचा प्रास साधणें प्रतिभासंपन्न कवीस त्रासदायक वाटण्याचें मुळींच कारण नाहीं—येवढेंच

नव्हे तर त्यायोगें काव्यनिर्मितीच्या वेळच्या त्याच्या स्वतःच्या आल्हादांत त्यामुळें मोठी भरच पडली पाहिजे, हेंही कोणीही मान्य करील !

परंतु निर्यमक काव्याची लाट आली तेव्हां खऱ्या प्रतिभासंपन्न कवींचा प्रश्नच नव्हता. ज्यांच्या ठिकाणीं प्रतिभा नव्हती व ज्यांना कवितेच्या अंगणांत शिरून पिंगा तर घालायचा होता त्यांची सोय करण्याचा खरा प्रश्न होता. त्यामुळें " एकेक पैसा ! कोईची चीज उठाव ! एकेक पैसा ! " अशी आरोळी मारणारा जसा गोरगरीब वाटसरूंच्या प्रीतीस चटकन् पात्र होतो, त्याप्रमाणें " चला उठा ! कविता करणें हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे ! " असें पहिल्यानें ओरडणाऱ्या धूर्तांच्या निशाणाखालीं ताबडतोब प्रचण्ड गर्दी लोटली !

## नं. १४

झटपट रंगारी छापाच्या कवींनीं आपली सोय करून घेण्यासाठीं शब्दसौष्ठव आणि प्रास यांचें महत्त्व जसें नष्ट करून टाकलें, तसेंच कवितेला काव्ययोग्य विषय असावा या कल्पनेचा आपल्याला जाच होतोसें पाहून तिचा बीमोड करावयासही त्यांनीं विलंब केला नाहीं. ते म्हणूं लागले, विषयांत योग्य आणि अयोग्य असा भेद कां असावा ? अमुक विषय काव्याला साजेसा आहे व अमुक नाहीं असें कां मानावें ? काव्य म्हणजे कवीच्या अंतःकरणांत भावेनाशा झालेल्या भावनांचा आविष्कार. या भावना अमुक पदार्थ पाहूनच उठतील, व अमुक पदार्थ पाहून उसळणार नाहींत असें थोडेंच आहे ? काव्य जगांतल्या एकूण एक पदार्थमात्रांत भरलेलें आहे. तें चंद्रकलेंत व कमलिनींत आहे, तसें अंगावर चढून चावणाऱ्या ढेंकणांत आणि रस्त्यावर पडलेल्या शेणगोळ्यांतही आहे ! तें कांहीं नाहीं. आम्ही वाटेल त्या विषयावर काव्य करणार, आणि तें वाचतांच तुम्ही आम्हांला महत्कविपदावर बसवलें पाहिजे. न बसवाल तर आम्हीच बसूं. आमच्या धटिंगणपणापुढें तुमचा काय पाड लागणार ?

विडंबन काव्य म्हणून जो पदार्थ हल्लीं फार खपत आहे त्यांत या धटिंगणपणापलीकडे कसलाच अर्थ नाहीं. श्रीयुत अत्रे यांनीं हा प्रकार मराठींत प्रथम रूढ केला, व त्याची नक्कल आतां जो उठतो तो करीत आहे. किंबहुना हल्लीं इतर प्रकारचें काव्य रचलें जात आहे कीं नाहीं अशीही शंका मराठी साप्ताहिकें वाचणाऱ्याच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं. सगळ्या मराठी साप्ताहिकांत मिळून पांचपन्नास विडंबन काव्यें दर महिन्याला प्रकाशित होत आहेत. त्या साप्ताहिकांकडे असलीं काव्यें येत असतील किती त्याला तर गणतीच नसेल ! निदान पांचशें कवी तरी विडंबनकाव्यांच्या उतरंडी रचण्यांत आज गुंतलेले आहेत असा तर्क करायला हरकत नाहीं !

या लोकांना येवढें समजत नाहीं—किंवा समजत असूनही उमजत नसेल—कीं विडंबन—काव्य म्हटलें तरी तें ‘काव्य’ असलें पाहिजे. त्यांत काव्यगुण भरपूर असला पाहिजे. श्री. अत्रे यांच्या विडंबन—काव्यानें अल्पकालांत लोकांच्या मनावर छाप बसविली याचें श्रेय जितकें त्यांच्या कृतींतल्या विनो-

त्वाला तितकेंच त्यांतील अस्सल काव्यगुणालाही दिलें पाहिजे. एका प्रसिद्ध कवींनीं म्हटल्याचें स्मरतें, कीं सुंदर चेहऱ्याच्या माणसानें आरसा पुढें धरून गमतीनें वांकडीं तिकडीं तोंडें केलीं तरी तीं प्रेक्षणीय वाटतात तसें श्री. अत्रे यांच्या विडंबनकाव्यांचें आहे. श्री. अत्रे त्यांच्या ठिकाणीं जिवंत प्रतिभा आहे, व त्यांच्या रचनेंत भरपूर प्रसाद आणि कल्पनेची भरारी आहे. त्यांच्या विडंबन-काव्यांचा खरा मोठेपणा त्यांच्या या गुणांत आहे. या काव्यगुणाच्या विलासा-साठीं ते झेंडूच्या झुडपाशीं खेळतात त्यामुळें, त्यांच्या काव्यांत चमत्कृतीची भर पडते येवढेंच काय तें !

पण आतां मुळीं जो उठला तो झेंडूच्या ताटव्यांत घुसून फुलें, पाकळ्या, जें कांहीं हातीं लागेल तें खुडून उधळूं लागला आहे. आणि याचें खरें कारण येवढेंच कीं, प्रासादिक शब्दरचनेच्या व यमकाच्या अडचणी दूर झाल्यावांचून जसें सामान्यांचें फावण्यासारखें नव्हतें, तद्वत् विडंबनकाव्याचें स्वागत कर-ण्यांत सामान्यांचा मोठा फायदा आहे. कारण कवीच्या अंगीं मृदु भावना असावयास पाहिजेत अशी आतांपर्यंत जी समजून होती तीहि या विडंबन-काव्याच्या लाटेंत धुवून नष्ट व्हावयास हरकत नाहीं. पांचटपणा, टवाळी, इत-केंच नव्हे तर प्रसंगीं सर्वथा असभ्य आणि निर्दय चेष्टा येवढाच माल अंतः-करणांत असला म्हणजे आतां पुरे ! कवितेच्या बाह्यांगाच्या सौंदर्यास तिलांजलि पूर्वीच मिळाली होती ! आतां कवीच्या अंतरंगाचें सौंदर्यही अनवश्यक ठरत आहे ! येवढें एकदां साधल्यावर मराठी काव्याची सुधारणा शिखराला पोचली म्हणा-यला हरकत नाहीं !

मराठी काव्याच्या सध्यांच्या लक्षणांविषयीं मीं इतक्या विस्तारानें लिहिलें तें येवढ्याच हेतूनें, कीं नव्या उद्योन्मुख लेखकांनीं **क्षुद्र त्रुटित वाङ्मय-प्रकारांचा** मोह स्वतःस यत्किंचितही पडूं देऊं नये असें मी कां म्हणतों तें स्पष्ट व्हावें. महाकाव्याचा काल आतां उरला नाहीं हें कोणीहि कबूल करील; आणि त्रुटित काव्यांची प्रथा पडली तर त्यांत तत्त्वतः कांहींच वावगें नाहीं यांतही संदेह नाहीं. परंतु त्रुटित असलें तरी तें ' काव्य ' असलें पाहिजे ना ? हल्लीं ज्या त्रुटित काव्यांस बहर आला आहे तीं त्रुटित आहेत, पण ' काव्यें ' नाहींत. आणि शब्दसौष्ठव, रचनासौंदर्य आणि विषयाची मार्मिकता या काव्य-गुणांची पायमल्ली करून चार सहा ओळी खरडून, त्यांवर ' काव्य ' असा

शिक्का मारून, प्रसिद्ध करण्याचा बेगुमानपणा अग्रेसर कवी जोंपर्यंत चालूं ठेवतील तोंपर्यंत काव्यहीन त्रुटितांची निपज अशीच प्रचण्ड प्रमाणांत वाढत राहील.

सुनीतें माजलीं, गझलांना ऊत आला, आणि आतां अभंग व विडंबन गीतें शेंकड्यावारीं गाइलीं जात आहेत, या सगळ्यांचें मूळ कारण प्रतिभेची व कलाविलासाची आवश्यकता नाहींशी होऊन काव्य म्हटलें कीं, तें कोणीही करावें आणि कसेंही करावें असें ठरलें हें होय. विडंबन म्हणजे वास्तविक सहृदय चेष्टा. ही चेष्टा अस्सल कवीनें अस्सल कवींची केलेली असेल तर त्यांत कलाचातुरीचा व तज्जन्य आल्हादाचा भाग पुष्कळसा असतो. परवां एकदां नामदार शास्त्र्यांनीं विनोदानें महात्मा गांधींच्या इंग्रजी लेखनांतील चुका दाखविल्या, त्यावेळीं त्यांच्या पत्रानें गांधींना स्वतःलाही मनःपूर्वक हंसूं आलें, व सामान्य वाचकांनाही तो पत्रव्यवहार वाचून मोठी गंमत वाटली. कारण गांधी व शास्त्री, दोघेही मोठे. मोठ्या अधिकारी माणसांनीं एकमेकांचें विडंबन केलें तर त्यांत सोज्वळ आनंद उत्पन्न होतो; पण तें पाहून जो उठला तो विडंबन करूं लागला तर त्याचें कौतुक करण्याची सोय राहणार नाहीं. श्री. अत्रे यांनीं समकालीन कवींचें विडंबन करण्यास प्रारंभ केला; परंतु आज असें झालें आहे कीं कवि म्हणवून घेणारा जो तो इसम विडंबनकाव्यच करतो. त्यामुळें सारेंच काव्य विडंबनस्वरूपी झालें आहे, व तें कोणत्या काव्याचें विडंबन आहे तें सांगतां येणें अशक्य झालें आहे. सगळेच कवी वेडावायला लागले आहेत. ते कोणाला वेडावीत आहेत तें समजत नाहीं! सर्कशिच्या खेळांत चांगल्या चांगल्या खेळाडूंचें विडंबन विदूषक करीत असतो; व खेळाडूनें मारलेल्या सुंदर कोल्हाटउडीचें विदूषकानें केलेलें विडंबन पाहून प्रेक्षकांचें मोठें मनोरंजन होत असतें. पण एखाद्या सर्कशींत अस्सल खेळाडू एकही नसून सगळेच विदूषक असतील तर! मग लोकांना त्यांच्या विदूषकी चाळ्यांचें कौतुक वाटण्याऐवजीं त्यांची किळसच येईल कीं नाहीं! विडंबन-गीतांच्या सुळसुळाटानें मराठी कवितेची अशीच अवस्था केली आहे.

काव्याच्या त्रुटित प्रकारांचा झपाट्यानें प्रसार झाला याचें कारण येवढेंच कीं काव्य सोपें झालें. कवीच्या अंतरंगाची रसिकता, आणि कवितेच्या बाह्यांगाची सजावट या दोन्ही अडचणी नाहींशा झाल्या. अर्थशून्य आणि प्रसादशून्य

कविता करणारांनाच आचार्यांच्या सिंहासनावर बसविलें कीं तसली कविता करायचा 'लायसन' आपल्यालाही मिळेल असा धूर्त विचार करून लोकांनीं त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक, प्रणेते, अध्वर्यू, बादशहा—तोंडाला आल्या त्या पदव्या बहाल केल्या. त्यांच्या नांवाच्या कृपाछत्राखालीं कवडीमोल कवितांचा हैदोस घालायला सगळ्यांना रान मोकळें झालें!

जी गोष्ट मराठी पद्याची तीच मराठी गद्याची. त्रुटित गद्यलेखन प्रकारांनींही मराठी भाषेचें हिताऐवजीं अनहितच केलें आहे.

## नं. १५

त्रुटितगद्यपद्य प्रकारांविषयींच्या माझ्या प्रतिपादनाचा विपरीत अर्थ कोणी करूं नये. त्रुटित लेखनप्रकारांत सौंदर्य आणि सहृदयता असेल तर त्यापासून विलक्षण आल्हाद निर्माण होतो याविषयीं वादच नाहीं. परंतु असा आल्हाद निर्माण करण्यास लेखकाच्या ठिकाणीं अत्यंत तेजस्वी प्रतिभा आणि कमालीचें तंत्रकौशल्य लागतें. किंबहुना विस्तृत मर्यादेच्या लेखनापेक्षांही त्रुटित लेखनांत पुरेसा कलाविलास प्रगट करावयास लेखकाचा अधिकार अधिक मोठा असावा लागतो. दोन तीन फूट लांबी रुंदीच्या फलकापेक्षां इंचभर लांबी रुंदीच्या कागदावर मनोहर चित्र रेखाटणें अधिक कसबाचें आहे हें कोणीहि अनुभवी चित्रकार सांगेल. टीचभर हस्तिदंतावर हुबेहूब सुंदर प्रतिमा कोरायला किती कौशल्य व प्रयास लागतात तें शिल्पकाराला विचारावें. निरुंद जागेंत नृत्याची शोभा वर्तविण्यास अंगीं केवढा अधिकार हवा त्याची कल्पना जाणत्या रसिकास खचित असेल. प्रत्यक्ष ताजमहालाचें मनोहारित्व जसें अपूर्व, तसेंच एका इंचाच्या अवकाशांत त्याच्या मनोहर दृश्याची सुभग प्रतिमा काढणार ५ कसबहि अपूर्वच मानलें पाहिजे. सारांश, अल्पावकाशांत सामावणारी कलाकृति तत्वतः उपेक्षणीय तर नव्हेच नव्हे, उलट अत्यंत आदरणीयच म्हटली पाहिजे. परंतु ती प्रथम कलाकृति असली पाहिजे. ती शरीरानें धिप्पाड आहे कीं ठेंगणी ठुसकी आहे हा प्रश्न नंतरचा.

माणूस सुंदर असलें, कीं उंचनिंचपणाप्रमाणेंच ठेंगणेठुसकेपणाहि कमनीयच ठरतो. पण सौंदर्याची बाब दृष्टीआड करून फक्त ठेंगणेपणाचेंच स्तोम कोणी माजविलें तर तें शहाणपणाचें कोण मानील ? आज मराठींत फोंफावलेले त्रुटित गद्यपद्य प्रकार ठेंगणे आहेत येवढेंच.पण त्यांचें सौंदर्य चिनी जपानी आंखूड पावलांच्या आणि चपट्या नाकांच्या बायकांच्या सौंदर्याच्या जातीचेंच आहे ! कागदाच्या चिठोऱ्यावर नखानें काढलेलें चित्र सुंदर असेल तर त्यानें चित्त प्रसन्न झालेंच पाहिजे. परंतु असलें सौंदर्य निर्माण करावयास फार मोठें कौशल्य अंगीं पाहिजे हें लक्षांत न घेतां, केवळ तें चिठोऱ्यावर काढलें

आहे, व नखानें काढलें आहे येवढेंच पाहून जो तो कागदाचीं चिठोरीं करूं लागला आणि बोटांचीं नखें वाढवून बसला, तर त्याला काय म्हणावयाचें ?

मराठी वाङ्मयांत अशीं नखें वाढविणाऱ्यांची संख्या हल्लीं वाढत आहे. नव्या उद्योन्मुख लेखकांनीं या संख्येंत भर घालूं नये अशी माझी कळकळीची इच्छा आहे. माझ्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांस त्रुटित वाङ्मयप्रकार लिहिण्यास मी कधींही उत्तेजन देत नाहीं. याचीं मुख्यतः दोन कारणें आहेत. एक तर असें कीं, लालित्यपूर्ण त्रुटित वाङ्मय लिहिणें वाटतें तसें सोपें नसून फार मुष्किलीचें आहे. आणि शिवाय एक नाट्यछटा अगर सुनीत लिहून तें कोठेंतरी छापलें गेलेलें विद्यार्थ्याच्या नजरेस पडलें, कीं त्याची नजर फिरायचा फार संभव असतो. त्याला वाटतें, झालें, आपण लेखक बनलों ! आणि ही भावना एकदां त्याला झाली, कीं त्याची प्रगति मग कोठली होणार ? आधीं विद्यार्थ्यांनीं लिहिण्यापेक्षां वाचावें आणि अवलोकन करावें अधिक असें माझें त्यांस नेहमीं सांगणें असतें. इतकेंच काय, मोठ्या पदवीस चढलेल्या लेखकांनींही लेखणीपेक्षां वाचनाचा व्यासंग आणि अनुभवाचा खटाटोप अधिक करावा असें माझें प्रामाणिक मत आहे. अर्थात् विद्यार्थ्यांची दिशाभूल करणारे, आणि त्यांची महत्त्वाकांक्षा खुरटविणारे जे दुष्ट त्रुटित लेखनप्रकार मला दिसतात त्यांपासून त्यांना परावृत्त करणें हें मी आपलें कर्तव्यच मानतों.

कांहीं विद्यार्थी आपल्या कविता दाखविण्यासाठीं माझ्याकडे येतात तेव्हां त्यांवर मत देण्याचा अप्रिय प्रसंग टाळण्याच्या हेतूनें मी त्यांस म्हणतों, "मला कवितेंतलं कांहीं कळत नाहीं !" खरोखरच सध्यां ज्या काव्यप्रकारांस भर आला आहे त्याचा एक तर स्पष्टपणें निषेध करून अप्रियता संपादावी, किंवा आपल्याला त्यांतलें कांहीं कळत नाहीं अशी कबुली देऊन मोकळें व्हावें, यांखेरीज तिसरा मार्गच उरला नाहीं ! जेथें मोठमोठे नामदार कवी आपल्या नीरस, प्रसादहीन काव्यांनीं नियतकालिकांचीं पृष्ठें व्यापीत आहेत, इतकेंच नव्हे तर आपल्या घोगऱ्या, बेसुऱ्या आवाजांत तीं (बे) रागदारींत गाऊन (!) दाखवून मैफली मारीत आहेत, तेथें त्यांचा तो और मजा ज्यांना लुटतां येत नसेल त्यांनीं आपलें दुर्भाग्य कबूल करावें, आणि अज्ञपणा पदरीं घेऊन गुपचिप बसावें यांतच शहाणपणा नाहीं काय ? म्हणून कविता दाखवून

कोणी अभिप्राय विचारला, कीं, मी त्यांस सांगतों, " मला यांतलं कांहीं कळत नाहीं। कोणा नामांकित कवीकडे गेलांत तर त्याचा अधिक उपयोग होईल!"

हें ऐकून जे उदयेच्छू कवी माझा निरोप घेऊन जातात ते पुढें नामांकित कवींकडे जातात कीं नाहीं, व त्यांजकडून त्यांना काय सल्ला मिळतो तें मला कधीं कळलेलें नाहीं. परंतु जे माझ्यावर काव्यज्ञतेचा आरोप कायम ठेवून आपल्या काव्याविषयीं माझें मत माहित करून घेण्याचा हट्टच धरून बसतात, त्यांना मग मनांतले खरे विचार सांगणें भागच पडतें. माझ्या परिचयाच्या झालेल्या विद्यार्थ्यांत दोन चार असे आहेत, कीं त्यांच्या ठिकाणीं कविताशक्तीचा स्फुलिंग मला स्पष्ट दिसतो. त्यांना काव्यरचनेच्या बाबतींत मीं मनःपूर्वक उत्तेजन दिलेलें आहे. परंतु बाकीच्यांना मीं कळकळीनें सांगतों, कीं स्वतःची प्रगति व्हावी अशी इच्छा असेल तर स्फुट आणि त्रुटित काव्याचें हें व्यसन अजीबात सोडून द्या.

आणि जसें खरी काव्यशक्ति अंगीं नसतांना केवळ नव्या जमान्यानें भ्रांतचित्त होऊन कवितेच्या नादाला लागणाऱ्या नव्या लेखकांना सावध केलें पाहिजे, तसेंच नाट्यछटा, शब्दचित्रें, लघूत्तमकथा, इत्यादि त्रुटित गद्यप्रकारांच्या मोहाला बळी पडणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांसही त्यांपासून परावृत्त केलें पाहिजे. हे त्रुटित प्रकार वास्तविक पाहतां लेखनाचुण्याच्या प्रारंभीं लिहावयाचे नसून लेखणींत लालित्य मुरल्यानंतर लिहिण्यासारखे आहेत. हे प्रकार प्रमाणानें छोटे दिसले तरी ते लिहिण्यास लेखकाच्या अंतरंगाची आणि शैलीची तयारी फार मोठी व्हावयास हवी. गाणाऱ्या गवयाची तयारी खूप वाढली आणि गळा खूप हलका झाला म्हणजे त्यानें काढलेल्या बारीक हरकती आणि मुरक्या अतिशय रंजक होतात. त्यांच्या रंजकतेचें कारण त्या लहान लहान असतात हें नव्हे, तर त्यांच्यामागें अनेक वर्षांची तपश्चर्या आणि गळ्याची कमावलेली रसवांति असते हें होय. ही गोष्ट विसरून केवळ त्या त्रुटित आहेत, म्हणून नवख्या गाणारानें त्यांचा सपाटा लावला तर जाणते श्रोते आनंदानें मान डोलविण्याऐवजीं नाक मात्र मुरडतात. गाण्याची समज नसलेल्या सामान्यांकडून असल्या गायन प्रकाराची वाहवा होते, व त्यामुळें या गायनप्रकाराला ऊत आलेलाहि आढळतो. परंतु कांहीं तरी उच्च महत्त्वाकांक्षा ठेवून गायन शिकणाऱ्या विद्यार्थ्याला गुरूकडून कळ-

कळीचा सल्ला असाच मिळेल, कीं "बाबा, गायनाच्या या तऱ्हांना तूं विद्यार्थि-दशेंत हात घालूं नकोस. या दशेंत तूं खुल्या आवाजानें सुरांगानें गावेंस यांतच तुझें कल्याण आहे. हरकती आणि मुरक्या घेण्यासाठीं तूं चोरट्या गळ्यानें गाऊं लागलास, कीं त्यांची जी खास रंजकता ती तर पैदा व्हायची नाहींच, उलट तुझ्या आवाजांत मात्र कायमचा अचय उत्पन्न होऊन बसेल."

गायनाच्या कलेंत हरकती व मुरक्या यांचें जें स्वरूप तेंच बरोबर स्वरूप ललितलेखनाच्या प्रांतांतील त्रुटित प्रकारांचें आहे; व हरकती, मुरक्या इत्यादि प्रकारांविषयीं जो इषारा समंजस शिक्षकांकडून विद्यार्थ्यास मिळेल तोच ललित-लेखनाच्या विद्यार्थ्यांनींहि ध्यानांत वागविला पाहिजे. ललितलेखनाचे गद्य पद्य त्रुटित प्रकार तत्त्वतः अश्लाघ्य मुळींच नाहींत. परंतु या प्रकारांतल्या आवश्यक लालित्याचें भान सोडून त्यांच्या त्रुटितपणाचेच देव्हारे माजले तर त्यांत भाषेचें वैभव वाढण्याऐवजीं नष्ट होण्याचीच खात्री अधिक! ललितवाङ्मयाच्या वैभव-नाशाचें पातक होतकरू विद्यार्थ्यांनीं तरी जाणूनबुजून करूं नये येवढीच माझी तीव्र इच्छा आहे!

---

## नं. १६

वाङ्मयाचे दुष्ट प्रकार रूढ होऊं न देण्याचा इषारा उद्योन्मुख लेखकांस दिला तर त्याचा अर्थ कोणी असा समजूं नये, कीं वाङ्मयांतील इष्टानिष्ट प्रकारांबद्दल एकटे लेखकच जबाबदार असतात. वाङ्मयाची वाढ अगर पीछेहाट, वाङ्मयांत रूढ अगर अस्तंगत होणारे लेखनप्रकार, वाङ्मयाच्या बुडाशीं असणाऱ्या मनोभूमिकेंत घडणारे फेरबदल,—सारांश, वाङ्मयक्षेत्रांतील सर्व प्रकारच्या घडामोडी एकट्या लेखकांच्या विचारसरणीवर अगर कृतीवर अवलंबून नसून, वेगवेगळ्या चार वर्गांच्या एकमेकांवर घडणाऱ्या क्रियाप्रतिक्रियेवर अवलंबून असतात. हे चार वर्ग म्हणजे लेखक, वाचक, प्रकाशक व टीकाकार.


या चारी वर्गांतील मंडळींनीं आपापलें कर्तव्य आणि जबाबदारी ओळखली. आणि अभिजात ललित वाङ्मयाविषयीं खरी प्रीति व आस्था या सर्वांच्या ठिकाणीं असली म्हणजे वितंडवाद माजत नाहींत, आणि सर्व गोष्टी सुरळीत चालतात. लेखकांस कीर्ति मिळते, वाचकांस आनंद मिळतो, प्रकाशकांस संपत्ति मिळते, आणि टीकाकारांस वाचकांचेच नव्हे तर टीकाविषयभूत लेखकांचे देखील धन्यवाद मिळतात. मग वाङ्मयाची वाढ झपाट्यानें होते.

याच्या उलट अर्थातच असें ह्मणतां येईल, कीं वाङ्मयाची वाढ झपाट्यानें होत नसेल तर, लेखक, वाचक, प्रकाशक व टीकाकार यांच्या परस्पर क्रिया-प्रतिक्रिया घडाव्या तशा घडत नसल्या पाहिजेत. त्यांना आपापल्या कर्तव्याची ओळख असावी तशी नसली पाहिजे. वाङ्मयसंवर्धनाच्या बाबतींत आपली खरी भूमिका कोणती याचा त्यांनीं जितका विचार करावयास हवा तितका केला नसला पाहिजे. आपल्या मराठी वाङ्मयाच्या प्रगतीस अडथळा करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. आपली राजकीय व धार्मिक परिस्थिति, आपले सामाजिक आचार, आपल्या हटवादी चालीरीति, इत्यादि अनेक गोष्टींच्या दडपणाखालून वर मान काढतां काढतां आपल्या वाङ्मयास थकवा येत आहे, व त्याची वाढ व्हावी तशी त्वरेनें होत नाहीं. परंतु ही त्वरा खुंटविणारें सर्वांत मूलभूत असें कांहीं कारण असेल तर तें हें, कीं लेखक, वाचक, प्रकाशक व टीकाकार या चार

वर्गांचे परस्परसंबंध तत्त्वतः कोणत्या स्वरूपाचे असले पाहिजेत याचा विशेष विचार कोणी करीत नाहीं.

प्रत्येक वाङ्मयभक्तानें हा विचार केव्हां तरी नीटपणें करणें अवश्य आहे. म्हणून त्याबद्दल मला जें वाटतें तें सांगतों.

वाङ्मयाच्या क्षेत्रांत लेखक, वाचक, प्रकाशक व टीकाकार हे चार मुख्य घटक तर खरेच, व या चार घटकांच्या वृत्तीवर आणि कृतीवर वाङ्मयाची प्रगति अगर अधोगति अवलंबून असते हेंही निःसंशयच; परंतु या चार घटकांपैकीं त्यांतल्या त्यांत अधिक जिव्हाळ्याचे व महत्त्वाचे संबंध कोणत्या दोन घटकांचे संभवतात असें विचारलें, तर लेखक व वाचक या दोन घटकांचाच निर्देश करणें उचित होईल. लेखक, वाचक, प्रकाशक व टीकाकार या चौघांमधील निकट अगर दूर अंतर दर्शविणारी आकृति काढावयाची झाल्यास पुढीलप्रमाणें काढतां येईलः—




या आकृतिवरून हें उघड होईल कीं, लेखकाचा व प्रकाशकाचा संबंध जरा दूरचाच आहे; व लेखकाचा आणि टीकाकाराचा संबंध तर त्याहूनही दूरचा आहे. खरा जिव्हाळ्याचा आणि निकट संबंध लेखक व वाचक या दोघांचाच. वाङ्मय म्हणजे तत्त्वतः एक प्रकारची देवघेव आहे. लेखक आपले विचार व आपल्या भावना देत असतो, व वाचक त्या घेत असतो. लेखकाच्या ठिकाणीं विचारांची तेजस्विता आणि भावनांची कळकळ असली पाहिजे, व वाचकाच्या ठिकाणीं त्या तेजस्वितेचें व कळकळीचें ग्रहण करण्याची शक्ति व उत्सुकता पाहिजे. वाचक सतत लेखकाच्या समोर उभा आहे. त्यावांचून लेखकाची प्रतिभा स्फुरणारच नाहीं. विचारांचा विनिमय घडवून आणणें हें मुळीं भाषेचें आद्य कार्य आहे, व वाङ्मयाचा प्रधान हेतूही अर्थात् तोच आहे. एका

अंतःकरणांत उठलेल्या खळबळीची संवेदना दुसऱ्या एका अंतःकरणास प्रतीत करण्यासाठींच वाङ्मयाचा जन्म होतो. सांगणारा आणि ऐकणारा अशा जोडीवांचून वाङ्मय संभवत नाहीं. वाङ्मय जसजसें वाढतें, त्याविषयींची आवड आणि उत्सुकता जसजशी शेकडों अगर हजारों लोकांच्या ठिकाणीं उत्पन्न होते, तसतशी "प्रकाशक" व "टीकाकार" अशा दोन वर्गांची गरज भासूं लागते व ते वर्ग हळूं हळूं अस्तित्वांत येतात. याबद्दलचा सविस्तर विचार आपण पुढें यथावकाश करूं. येथें येवढेंच लक्षांत घ्यावयाचें, कीं, प्रकाशक व टीकाकार यांचे वाङ्मयाशीं जरा दूरचेच संबंध असून खरे जिव्हाळ्याचे संबंध लेखक आणि वाचक या दोघांचेच व या दोघांमधीलच होत !

वाङ्मय ज्या वेळीं फारसें वाढलेलें नसतें तेव्हां वाचकांचा वर्ग एकजिनसी असतो, व वाचकांची वृत्ति व रुचि लेखकास सहज व स्पष्टपणें जाणतां येते. वाङ्मय हें त्या काळीं सामान्यांसाठीं नसून बहुतांशीं सिंहासनाधिष्ठित अशा निवडक व्यक्तींसाठीं असतें. कवि राजाश्रयानें राहतो, व राजाचें मनरंजन करणें व त्यास शक्य तर कर्तव्योन्मुख राखणें येवढेंच कवीचें काम असतें. संस्कृत वाङ्मयांतील कांहीं वाङ्मय अशा परिस्थितींतच निर्माण झालेलें दिसतें. इतकेंच नव्हे, तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासांतही ही परिस्थिति येऊन गेलेली आहे. राजेरजवाड्यांच्या आज्ञेवरून व त्यांच्या आश्रयानें ग्रंथ लिहिले जावेत, व त्यांसच ते अर्पणही केले जावेत असाच मराठीच्या इतिहासाच्या प्रथम कालखंडांत क्रम होता. सामान्यांना वाङ्मयाची रुचि नव्हती, वाङ्मयास त्यांचा आश्रयही नव्हता, आणि त्यामुळें लेखकास त्या वर्गाची जाणीवही नव्हती.

परंतु ही परिस्थिति कोठल्याही देशाच्या वाङ्मयांत दीर्घकाल टिकत नाहीं. मग मराठीच्या बाबतींतही ती कालानुसार बदलली असल्यास नवल नाहीं. जसजसा शिक्षणप्रसार झाला, आणि वाचनाची गोडी समाजाच्या भिन्नभिन्न वर्गांत पसरली, तसतशी मराठी वाङ्मयाची **व्यक्तिनिष्ठता** नाहींशी होऊन **समष्टि**-रंजनाचें कार्य करणें लेखकांस अपरिहार्य झालें. केवळ राजघराण्यांतल्या चार व्यक्तींचें समाधान साधण्याचा हेतू नाहींसा होत गेला. सबंद समाज ललित वाङ्मयावर हक्क सांगूं लागला. समाजांतील सर्व वर्गांतील व्यक्ती 'वाचक' या सदरांत येऊन बसल्या. "वाचक" वर्गास प्रथम जो एकजिनसीपणा होता तो लुप्त होऊन त्यास बहुजिनसी स्वरूप प्राप्त झालें.

या गोष्टीचे जसे कांहीं सुपरिणाम झाले तसेच कांहीं दुष्परिणामही झाले. किंबहुना कोणतीही कला निवडक व्यक्तींच्या ऐवजीं सामान्यांच्या तैनातीस लागली, कीं, त्याचे कांहीं दुष्परिणाम अपरिहार्यच असतात. चित्रकला, गायन, इत्यादि कलांवर जोंपर्यंत रसिक तज्ज्ञांचें नियंत्रण असतें तोंपर्यंत शुद्ध कलाविलासास पूर्ण अवसर मिळतो, आणि इतर कोणत्याही आगंतुक विचारानें मन व्यग्र होऊं न देतां कलेची सेवा करण्यास कलावंत मोकळा असतो. पण कलेची आवड समाजाच्या उच्चनीच सर्वच वर्गांत पसरली, आणि सर्वांचें समाधान करण्याची चमत्कारिक जबाबदारी कलावंतावर आली, कीं, कलेचें स्वरूपही थोडें फार हीन झाल्यावांचून रहात नाहीं.

सुखोपभोग आणि ललितकलांचा आनंद राजचिन्हांकितांनींच अगर नवकोट नारायणांनींच लुटावा असा काळ आतां राहिला नाहीं; तो काळ कायमचा गेला. लोकशाहीच्या या नव्या जमान्यांत सारे सुखविलास सर्वांनाच खुले झाले आहेत—निदान खुले असावेत असा सर्वांचा आग्रह आहे. पूर्वी मलमलीचीं वस्त्रें फक्त लक्ष्मीपुत्रांच्या स्त्रियाच नेसत असत. आतां टांगेवाल्याला देखील वाटतें, कीं, आपल्या प्रीतिपात्राला सुंदर छबेल्या मलमलीचें पातळ नेसायला द्यावें. पूर्वी एके काळीं अत्तरांचा खुशबू आणि पक्वानांचा स्वाद बड्या श्रीमंतांनींच घ्यावा असा समज होता; आतां सलूनमध्यें दाढी बनविण्यांत दिवस घालविणारालाही संध्याकाळच्या वेळीं सहल करण्यास बाहेर पडतांना दस्तरुमालावर " शेंट " चे दोन थेंब लागतात; आणि कोथरुडच्या बागेंतून आंब्याचा हारा वाहून आणणाऱ्या हेलकऱ्यांचेंहि पुण्याच्या मंडईहून परततांना छटाक जिलेबी खाल्ल्यावांचून चालत नाहीं ! नाट्यगायनादि कला देखील आतां केवळ चार निवडक श्रोत्यासाठीं राहिल्या नसून त्यांस आतां समाजांतील सर्व वर्गांच्या व्यक्तींस रिझवावें लागत आहे.

०

अभिरुचीचा हा सार्वत्रिक प्रसार ललितवाङ्मयाच्या प्रांतांतही दिसून येत आहे, व असल्या प्रसाराचे जे दुष्परिणाम इतर क्षेत्रांत झाले आहेत ते ललितवाङ्मयांतही घडून आले असून, त्यामुळें लेखक व वाचक यांजमधील परस्परसंबंधांचें मूळ शुद्ध स्वरूप कांहींसें विकृत झालें आहे. कसें तें पहा.

## नं. १७

कोणतीहि कलाकृति सामान्यांच्या उपभोगासाठीं तयार व्हावयास लागली कीं तिच्यांतील खरें सौंदर्य अंशतः तरी नष्ट झाल्यावांचून रहात नाहीं. समाजांतल्या सर्व व्यक्तींच्या ठिकाणीं कलेची आवड उत्पन्न व्हावी यांत एका दृष्टीनें कलेचा उत्कर्ष आहे खरा; पण या उत्कर्षासाठीं जी किंमत पडते ती फार भारी असते. कारण सर्वांना कलासौंदर्य हवेसें वाटूं लागलें, आणि ती त्यांची लालसा संतुष्ट करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, कीं कलेचें अस्सल सौंदर्य नाहींसें व्हावें हा जणूं निसर्गनियमच आहे. एके ठिकाणीं गुडघाभर सांचलेलें पाणी बांध फोडून सगळीकडे पसरूं दिलें तर पाणी जिकडे तिकडे होईल, पण त्याची मूळची खोली व शोभा नाहींशी होणारच, नाहीं का ? कलांच्या बाबतींत हुबेहूब हाच न्याय लागू आहे. कलांचा सार्वत्रिक प्रसार झाला म्हणजे कलाकृतींत उथळपणा येतो. म्हैसूरच्या राजवाड्यांतच तेवढीं रविवर्म्यांचीं चित्रें दिसावींत अशी जोंपर्यंत समजूत होती तोंपर्यंत तेथें जाऊन तीं पाहणारास तीं मूळच्या मनोहर स्वरूपांत दिसत असत. पण आतां पानपट्टीवाल्याच्या दुकानांत आणि 'चहा भजी गरम' चें अखंड संतर्पण चालविणाऱ्या हॉटेलांतसुद्धां रविवर्म्यांचीं चार चित्रें हटकून दिसूं लागलीं तशी त्या चित्रांची खरी रमणीयता नाहींशी होऊन भडक रंगांत घिसाडघाईनें ओरबडून काढलेल्या त्यांच्या प्रतीच जिकडे तिकडे दृष्टीस पडूं लागल्या आहेत. गायनकला निवडक तज्ज्ञासाठीं होती तोंपर्यंत तिचें अभिजातत्व कायम होतें. आतां हॉटेलाहॉटेलांतून "पोनो" ओरडायला लागले. त्यामुळें बेसुरांत सोडलेल्या भरमसाट तानांच्या भेंडोळ्यांची रया गाण्याला आलेली दिसते. सर्वच सुखविलासांची व कलावस्तूंची आज ही दशा झालेली आहे. अर्थात् ललितवाङ्मय कांहीं या नियमास अपवाद नाहीं.

ललितवाङ्मयाविषयींची आवड समाजांतल्या सर्व वर्गांत पसरली त्याबरोबर त्या वाङ्मयाचें अभिजातत्व कमी होण्याचा संभवही उत्पन्न झाला. गलिच्छ आणि अश्लील वाङ्मयावर लुब्ध होणाऱ्या व्यक्तींचा समावेश वाचक वर्गांत झाला, येवढेंच नव्हे तर संख्येनें त्याच व्यक्ती सुज्ञ व अभिज्ञ व्यक्तींहून

अधिक ठरूं लागल्या. अर्थात् त्यांची प्रीति संपादण्यासाठीं झटणारे लेखकही निर्माण झाले. लेखकवर्ग एकजिनसी राहिला नाहीं; आणि वाचक वर्गाचें स्वरूप तर अत्यंत मिश्र आणि बहुजिनशी झालें.

वाचकांचें चित्तरंजन करणें हें ललितलेखकांचें मूळ कार्य. वाचकांस कलाकृतीच्या द्वारें सौंदर्यप्रतीति घडविण्यासाठीं, व त्यांच्या अंतःकरणांत आनंद निर्माण करण्यासाठीं ललित-लेखकानें लिहावें, आणि त्याचें तें वाङ्मय रसग्राही वृत्तीनें वाचकांनीं वाचावें, हा लेखक वाचकांतला खरा मूळचा संबंध. परंतु वाङ्मयाच्या प्रांतांत लोकशाही झाली, आणि निवडक रसज्ञांपेक्षां हजारों सामान्यांच्या रुचीस महत्त्व प्राप्त झालें, कीं हा मूळचा संबंध नष्ट होऊन लेखक-वाचकांचे परस्परसंबंध विचित्र होऊन बसतात.

आज वाचकांच्या आश्रयावर लेखकांस जगावयाचें आहे. तेव्हां त्यांच्या रुचीकडे अजीबात दुर्लक्ष करून तर चालणार नाहीं. ललितलेखन हा केवळ हौशीचा व्यवसाय ज्या काळीं होता त्या काळची गोष्ट निराळी होती. "काळ निरवधि आहे, पृथ्वी विपुल आहे! माझ्या लेखनाचें मर्म समजणारा रसिक केव्हां तरी जन्माला येईलच!" अशी दर्पोक्ति प्रतिभासंपन्न लेखकास त्या काळीं काढतां येण्यासारखी होती. पण आतां परिस्थिति पार बदलली आहे. ललितलेखन हें लेखकांच्या जीवनाचें साधन झालें आहे. प्राचीन काळीं शिक्षण देणाऱ्या गुरूनें त्याची किंमत म्हणून द्रव्य घेतलें तर तें निंद्य समजलें जात असे; परंतु आज अध्यापनाची वृत्ति करण्यांत कसलाच कमीपणा मानला जात नाहीं. त्याचप्रमाणें ललितलेखनाचा आनंद घेणाऱ्या वाचकांकडून द्रव्याची अपेक्षा लेखकानें केली, तर त्यांत कांहीं गर्हणीय आहे असें वाटण्याचें कारण आज उरलेलें नाहीं. हें स्थित्यंतर बरें कीं वाईट, किंवा या स्थित्यंतरास कोणत्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या हे प्रश्न अलाहिदा आहेत. आपल्या विषयाच्या दृष्टीनें मुख्य मुद्दा येवढाच, कीं या स्थित्यंतरामुळें लेखक-वाचकांचे मूळचे संबंध बदलून ते चमत्कारिक झाले आहेत. वाचकांचा आश्रय तर घालवायचा नाहीं व त्यांना ललितलेखनाचा जो आल्हाद द्यावयाचा त्याचें आभिजातत्वही शक्य तों बिघडूं द्यावयाचें नाहीं, असें चतुर धोरण संभाळण्याची पाळी लेखकांवर आली आहे. सामान्य लोकांस रिझविणारा, शिकविणारा, आणि त्याचबरोबर त्यांच्या लहरीवर व आश्रयावर

अवलंबून असणारा, अशी विचित्र भूमिका, लेखकाच्याकडे आजच्या काळांत आली आहे. एखाद्या लक्ष्मीपुत्राच्या लाडावलेल्या मुलास शिकविणाऱ्या शिक्षकाला कसें जपून वागावें लागतें ! त्या मुलाची अभ्यासांत प्रगति झालेली दाखविणें तर त्याला भाग असतें, पण त्याबरोबरच त्या पोराची मर्जी संभाळल्यावांचूनही त्यास गत्यंतर नसतें, नव्हे काय ! आजच्या काळांत लेखकाची स्थिति बहुतांशीं त्या शिक्षकासारखीच झाली आहे.

वाचकांपैकीं ज्या वर्गास उच्च कलाविलासाची पारख आहे त्याच्याजवळ आज पैसा नाहीं. ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांची अभिरुचि अगदीं कनिष्ठ आहे. यांत त्यांचा कांहीं गुन्हा आहे असें नव्हे. उलट, याला त्यांचा कांहीं इलाज नाहीं असेंच समजणें उचित होईल. त्यांना फक्त लिहितां, वाचतां येतें येवढेंच. अभिरुचि सुसंस्कृत व्हावी इतकें शिक्षण त्यांस पोंचलेलें नसतें. आपण नेहमीं म्हणतों, कीं देशांतले सर्व स्त्री-पुरुष निदान साक्षर तरी झालेच पाहिजेत, मग त्यांस उच्च शिक्षण मिळालें नाहीं तरी चालेल. पण केवळ पांचट साप्ताहिकांतलें आचरट लिखाण वाचण्यापुरतीच अक्षरओळख झालेल्या वाचकांची संख्या वाढल्यामुळें वाङमयावर जे अनिष्ट परिणाम झाले आहेत, व होत आहेत ते पाहिले, म्हणजे पुष्कळदां माझ्या मनांत विचार येतो, कीं नुसती तुटपुंजी साक्षरता समाजांत न वाढेल तरच फार बरें. मुळींच कांहीं नसण्यापेक्षां थोडें असलेलें बरें असें म्हणण्याची वहिवाट आहे. पण, ही म्हण कोणत्या बाबतींत खरी असेल ती असो, निदान शिक्षणाच्या बाबतींत खचित नाहीं. कारण, अल्पशिक्षणानें वाचकवर्ग संख्येनें फुगत जातो आणि कलाजन्य आल्हादाची अभिजात कल्पना मात्र त्याच्या ठिकाणीं निर्माण होत नाहीं; आणि मग ललितवाङ्मयांत उच्च कलाकृतीपेक्षां हुच्च खलकृतींचीच भर अधिक पडत जाते.

मराठी ललितवाङ्मयावर हें संकट आलेलें दिसत आहे. या संकटावर कांहीं उपाय नाहीं असेंही कित्येकांना वाटतें. परंतु अशा निराशेचें कारण नाहीं. माझ्या मतें या परिस्थितीवर एक उपाय आहे. तो जितका लेखकांच्या तितकाच वाचकांपैकीं एका विशिष्ट वर्गाच्या हातीं आहे. तो कोणता तें सांगण्यासाठीं माझ्या दृष्टीनें वाचकांचे जे भिन्न भिन्न ठोकळ वर्ग मी कल्पितों त्याविषयीं चर्चा केली पाहिजे.

## नं. १८

लेखक व वाचक यांचे वाङ्मयाशीं जे संबंध येतात त्यांचे तीन प्रकार कल्पितां येतील. वाङ्मय ही एक स्त्री आहे असें क्षणभर मानलें तर अलंकारार्थानें आपल्याला असें म्हणतां येईल, कीं वाङ्मयवनितेशीं तीन भिन्न प्रकारच्या लोकांचा संबंध येतो.

कांहीं थोड्या लोकांचा वाङ्मयवनितेशीं **लग्नसंबंध** जडलेला असतो. त्यांची तिची जन्माची, कायमची गांठ पडलेली असते. ते ठेवतील तशी तिची शोभा रहावयाची असते; आणि ती थाटलि त्याप्रमाणें त्यांचा संसार थाटला जावयाचा असतो. हे लोक म्हणजे " लेखक. " वाङ्मयाशीं त्यांचा जो संबंध येतो तो खरोखरच लग्नबंधनाइतकाच पवित्र, अभेद्य, आणि जिव्हाळ्याचा मानला पाहिजे. लेखकानें वाङ्मयवनितेची प्रेमानें व एकनिष्ठपणानें सतत सेवा करावी हेंच उचित आहे; व सुभाषितांत उल्लेखिलेल्या सुगृहिणीप्रमाणें वाङ्मयवनितेनें त्यावर अधिकाधिक प्रसन्न होत जावें हेंही क्रमप्राप्तच होय.

वाचकांपैकीं कांहींचा वाङ्मयवनितेशीं जो संबंध येतो त्याला **आप्तसंबंध** असें नांव देतां येईल; व बाकीच्या सामान्य वाचकांचा वाङ्मयवनितेशीं जो संबंध येतो त्याला **किंचित्संबंध** हें नांव शोभेल. आप्तसंबंध या शब्दाचा उघडच अर्थ असा कीं या प्रकारच्या वाचकांस वाङ्मयवनितेविषयीं आप्तपणा वाटतो. वाङ्मयवनितेच्या हिताहिताची ते एखाद्या प्रेमळ आप्ताप्रमाणें काळजी वाहतात. ती सुखांत असावी, तिचें सौभाग्य अखंड असावें, तिचें वैभव सदा वाढावें, तिनें कुलीनपणा कधीं सोडूं नये, असें त्यांना वाटतें. तिच्या कुशलाविषयीं ते नेहमीं चवकशी करतात—निदान त्यांनीं करावी. सर्वांनीं तिचा मानमरातब राखावा, तिच्या वैभवांत उणेपणा येईल असें कांहीं घडूं नये, तिचीं अपत्यें सुदृढ, गोजिरवाणीं, मोहक निपजावींत, अशी त्यांस कळकळ असावी.

अशा वाचकांचा वर्ग संख्येनें फारसा मोठा नसतो. ज्या वाचकांची संख्या मोठी असते त्यांच्या ठिकाणीं वर वर्णन केलेली कळकळ नसते. त्यांना वाङ्मयांतील खोल मर्म कळत नाहीं व अभिजात कोणतें आणि हीन कोणतें हें तारतम्यही त्यांच्या ठिकाणीं नसतें. त्यांना अक्षरओळख असते येवढाच

त्यांचा अधिकार, व विशेष चिकित्सा न करतां ज्यायोगानें घडिभर करमणूक होईल अशा लिखाणावरून दृष्टि टाकणें येवढीच त्यांची वाचनांतली बुद्धि. म्हणूनच या वाचकांचा वाङ्मयवनितेशीं फक्त "किंचित् संबंध" असतो असें आपण म्हणूं. वाङ्मयवनिता रस्त्यांत कोठें भेटली तर तिच्याकडे हास्यमुद्रेनें पाहणें, नमस्कार चमत्कार करणें, फार तर "कसं काय? बरं आहे?" येवढें अस्पष्ट शब्दांत विचारणें, आणि तिनें नुसतें नजरेनेंच "हो" म्हटलें कीं त्यावर–किंवा ती कांहींच न बोलतां पुढें गेली तर त्यावरही–समाधान मानणें—अशा स्वरूपाचें या बहुसंख्याक वाचकांचें व वाङ्मयवनितेचें नातें असतें. अर्थात् क्षणभरच्या सान्निध्यसुखासाठीं स्त्रीसहवास करणाऱ्या माणसाप्रमाणें या वाचकांची वृत्ति असते. त्यांना वाङ्मयाच्या उच्च कार्यांची जाणीव नसते, वाङ्मयाच्या उन्नति अगर अवनतीविषयीं ते विचार करूं शकत नाहींत, अलबत्या गलबत्यांनीं उत्कृष्ट ग्रंथांची अगर नाटकांची केलेली पांचट निंदा त्यांना रुचते व खरी वाटते, आणि रोजच्या इतर व्यवहारांत ज्याप्रमाणें टवाळी व निंदा यांचाच खुराक खात ते वेळ काढतात त्याप्रमाणें वाङ्मयांतही तसला खुराक कोठें मिळेल येवढेंच ते पहात असतात.

अशा वाचकवर्गांकडून वाङ्मयाचें कांहीं टिकाऊ कल्याण साधेल हें शक्य नाहीं. उलट, अशा वाचकवर्गांमुळें लेखकास मिळणाऱ्या मोबदल्याची रक्कम वाढते हा जसा फायदा, तसाच अशा वाचकांच्या आहारीं जाऊन लेखणीची इभ्रत घालविण्याचा मोह लेखकांस होण्याचा संभव आहे हा मोठा तोटाहि आहे. वाङ्मयाची अभिरुचि सबंद समाजांत पसरूं लागली, कीं ज्या संकटाची छाया त्यावर येते तें हेंच संकट होय. त्या संकटाचें निरसन करणें शक्य नाहीं असें मात्र मला वाटत नाहीं.

कारण "आप्तसंबंधी" म्हणून ज्या वाचकांचा मीं वर निर्देश केला, त्यांनीं मनांत आणल्यास हें संकट दूर करण्याचें श्रेय त्यांस खचित घेतां येईल. या वाचकांचा वर्ग संख्येनें बलिष्ठ नसेल, व पैशानेंही गबर नसेल, परंतु म्हणून त्याची मातब्बरी नाहीं असें नव्हे. किंबहुना, आपली जबाबदारी व मातब्बरी विसरण्याचा प्रमाद या वाचकवर्गांकडून घडत आहे हीच तक्रार मला करावयाची आहे, व या वाचकवर्गानें आपलें कर्तव्य ओळखून आपलें सामर्थ्य लेखकवर्गास पटविलें, तर त्याचा वाङ्मयावर फार हितकारक परिणाम होईल हेंच मला दर्शवायचें आहे.

ज्यांचा वाङ्मयवनितेशीं आप्तसंबंध शोभतो असें मी म्हणतों, ते वाचक बहुधा शाळा–कॉलेजांत जाणारे असतात. ते केवळ साक्षरच नसतात. ते सुविद्य असतात. वाङ्मयाच्या खऱ्या अस्सल रसास्वादाची ओळख त्यांना झालेली असते. कला कोणती आणि पांचटपणा कोणता, अभिजात कोणतें आणि हीन कोणतें, उच्च कोणतें व तुच्छ कोणतें, याचा निश्चिय करण्याइतकी त्यांची बुद्धि प्रगल्भता पावलेली असते. शाळाकॉलेजांतल्या या वाचकांनीं जर आपली ही श्रेष्ठता निरंतर ध्यानांत ठेवली, व आपल्या या श्रेष्ठ अभिरुचीचें समाधान करणारें जें नवें वाङ्मय निर्माण होईल त्याचें उच्च घोषणानें स्वागत करण्याचें, आणि अश्लील, शिवराळ, टवाळ, अधम वाङ्मयाचा उघड निषेध करण्याचें धोरण स्वीकारलें, व अव्याहत चालूं ठेवलें, तर मराठी वाङ्मयाची उन्नति फार झपाट्यानें होईल अशी माझी खात्री आहे. सामान्यांच्या हीन रुचीभोंवतीं पिंगा घालावयास लागल्यानें वाङ्मयास दुर्दशा येण्याची जी भीति आज वाटत आहे ती मग उरणार नाहीं.

आज खरी खेदाची गोष्ट अजाणत्या, सामान्य वाचकांचा वर्ग वाढला ही नव्हे, तर शाळा–कॉलेजांतले सुबुद्ध वाचकही अजाणत्यांत मिसळले व रमले आहेत ही होय. ज्यांनीं केवळ वाङ्मयाच्याच नव्हे तर देशाच्या सर्वच ललितकलांच्या अभिजातपणाविषयीं वास्तविक दक्ष असावयास हवें, तें आमचे शाळाकॉलेजांतील मराठी वाचक आपली परिपक्व व श्रेष्ठ अभिरुचि विसरले आहेत, आणि संस्कारहीन सामान्यांच्या घोळक्यांत सामील झाले आहेत। सामान्यांना पांचट नाटकें हवींत तशीं यांनाही तीं हवींत असा लोकांचा ग्रह झाला आहे. सामान्यांना जीं चित्रें आवडतात तींच यांनाही प्रिय होतात असें स्पष्ट दिसत आहे. आणि भजीं तळणारा आणि केंस कापणारा जीं गटारउपशीं रंगीबेरंगी साप्ताहिकें वाचतो. तींच यांच्याही हातीं आढळतात। याचे वाङ्मयावर आणि नृत्यगायनासारख्या ललितकलांवरही अतिशय खेदजनक दुष्परिणाम होत आहेत. ते टाळायचे असतील तर प्रत्येक सूज्ञ व्यक्तीनें शाळाकॉलेजांतील तरुणांस व तत्सम सुबुद्ध, प्रगल्भ, वाचकांस त्यांच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे.

अडाणी सामान्यांशीं समरस होणें हें या वाचकांस खचित शोभत नाहीं. उलट, सामान्यांस उच्च वाङ्मयांतलें मर्म समजून सांगणें, व त्यांची रुचि

शक्य तर सुधारणें हें त्यांचें कर्तव्य होय. निदान स्वतःच्या रुचींचें शुद्धत्व कायम ठेवणें, व तिचें समाधान करणाऱ्या वाङ्मयाची कदर व मागणी करणें येवढें कार्य तरी त्यांनीं अवश्य केलेंच पाहिजे.

प्रत्येक शाळेंत व कॉलेजांत मराठी वाङ्मयमंडळें आहेत. त्यांनीं या दिशेनें कार्य कां करूं नये ? वर्षाकांठीं चार दोन व्याख्यानें अगर काव्यगायनें करण्यापलीकडे या वाङ्मयमंडळाकडून सध्यां कांहीं कामगिरी होत नाहीं. हीं मंडळें म्हणजे नुसते कॉलेजचे ठरीव अलंकार झाले आहेत. केवळ फॅशन म्हणून मनगटावर बांधलेल्या, पण वस्तुतः काटे न चालणाऱ्या घड्याळासारखी या मंडळांची अवस्था असते. मंडळ स्थापन होतांना मोठमोठ्या कार्यक्रमाच्या गप्पा झोडण्यांत येतात. पण त्या हवेंत विरून जायला एका ऋतूचा सुद्धां अवधि लागत नाहीं. असें होऊं नये. मी म्हणतों, इतर मोठाल्या कामगिऱ्या राहोत, पण निदान सुबुद्ध, सुविद्य वाचकवर्गाची अभिजात वाङ्मयरुचि जिवंत ठेवण्याचें, व तिची ग्वाही लेखकवर्गास स्पष्टपणें देण्याची साधी कामगिरी तरी शाळाकॉलेजांतल्या तरुण वाचकांनीं करायलाच पाहिजे. रंगीबेरंगी गलिच्छ वाङ्मयावर त्यांजकडून अंतःस्फूर्तीनें एकजात बहिष्कार पडला पाहिजे; व तो तें वाङ्मय प्रसवणाऱ्यांस स्पष्ट कळला व जाणवला पाहिजे. आणि त्याचप्रमाणें अभिजात वाङ्मयाचा त्यांजकडून तत्परतेनें गौरव झाला पाहिजे. वाङ्मयमंडळाच्या जाहीर सभांतून हें कार्य होऊं लागल्यास तें परिणामकारक झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण, मग सुविद्य तरुण वाचकही अडाणी सामान्यांतलेच असा जो समज पसरत चालला आहे त्याला आळा बसेल. इतकेंच नव्हे, तर सुविद्य तरुणांची भिन्न रुचि स्पष्ट दिसून येऊं लागली, म्हणजे अडाणी सामान्यांचेंही लक्ष तिकडे जाईल व त्यांच्या आवडीनिवडीही—केवळ अनुकरणप्रियतेमुळेंच कां होईना—निवळतील. विषारी कलमकसायांचें गिऱ्हाईक कमी होईल, व त्यांची पायरी उघड होईल; अभिजात लेखकांस पाठबळ मिळेल, व हुरूप येईल; आणि मराठी वाङ्मयावर लोकशाहीमुळें आलेलें, किंवा येऊं पाहणारें संकट टळून त्या वाङ्मयाचा भविष्यकाळ उज्वल होईल !

## नं. १९

वाङ्मयाच्या क्षेत्रांत लेखक व वाचक यांचेच संबंध मूलभूत आणि सर्वांत महत्त्वाचें हें तर खरेंच; परंतु दोघांचा अन्योन्य संबंध जुळवून आणणारा तिसरा एक वर्ग अवश्य असतो. हा वर्ग म्हणजे ' प्रकाशक. ' ज्या काळीं वाङ्मय बोललें व ऐकलें जात असे, त्या काळीं लेखक व वाचक एकमेकांसन्निध बसत, व वाङ्मयाचा व्यापार घडे. परंतु हा काळ बदलून लेखकांच्या विचारांचा फायदा स्थलकालांनीं अत्यंत दूर असलेल्या लोकांसही मिळावा ही मागणी मान्य होत गेली, तसतशी एकमेकांपासून दूरदूर असणाऱ्या या लेखक वाचकांचा संबंध जडविणाऱ्या मध्यस्थाची गरज उत्पन्न झाली. हा मध्यस्थ म्हणजेच ' प्रकाशक '.

याचा उघडच अर्थ असा, कीं वाङ्मयाच्या इतिहासांत ' प्रकाशक ' हा घटक प्रारंभीं अस्तित्वांत नसतो, तर तो कांहीं काळानें अस्तित्वांत येतो. लेखकाच्या विचारांचें ज्ञान करून घेण्याची तळमळ ज्या ज्या वाचकांस लागली असेल त्याची ती तळमळ भागविणारा एक सहायक येवढ्याच नात्यानें ' प्रकाशक ' ही व्यक्ति वाङ्मयक्षेत्रांत प्रथम पाऊल टाकते. **प्रकाशक हा वाङ्मयाचा निर्माताही नाहीं, किंवा भोक्ताही नाहीं; त्या दोघांस एकत्र आणणारा मध्यस्थ आहे.** अर्थात् प्रकाशकाची ही मूळ भूमिका लक्षांत घेतली म्हणजे वाङ्मयाच्या हिताहिताची कळकळ, सद्‌भिरुचीविषयीं आस्था, अभिजात वाङ्मयाविषयीं अभिमान, इत्यादि गुणांची त्याच्या ठायीं अपेक्षा करणें चुकीचेंच ठरेल.

वाङ्मयाची वाढ होऊन वाचकांच्या स्थलकाल मर्यादा विस्तृत झाल्या नाहींत, तर प्रकाशकाचें प्रयोजनच उद्भवणार नाहीं. वाचकांची संख्या वाढत गेली म्हणजेच प्रकाशकास संधि मिळते. लेखकाच्या लेखनकृती उपभोगण्याची इच्छा त्याच्या संन्निधच्या मूठभर लोकांसच नव्हे, तर दूरदूर पसरलेल्या हजारों स्त्री-पुरुषांस झाली म्हणजे थोडा मोबदला घेऊन ती इच्छा पुरवणारा प्रकाशक निर्माण झाला तर लोकांना हवा असतो. या दृष्टीनें पहातां प्रकाशकाचा जन्म होतो तोच मुळीं व्यापारी-पेशांत. ललितकलेची स्फूर्तिही त्याच्या ठिकाणीं असण्याचें कारण नाहीं, किंवा

त्या कलेच्या आस्वादाची इच्छाही त्याच्या ठिकाणीं आवश्यक नाहीं. लेख-काच्या विचारांचा माल हजारों गरजू वाचकांच्या घरीं पोंचता करणारा तो एक दलाल आहे. स्वतःच्या उदरनिर्वाहाचा धंदा म्हणूनच प्रकाशकानें आपला व्यवसाय केल्यास त्याबद्दल त्याला दोष देतां येणार नाहीं. आमराईत पिक-णारे गोड रसदार आंबे बाजारांत पोंचविणारा आणि खपविणारा दलाल जसा असतो तसाच साहित्यक्षेत्रांत प्रकाशक असतो; आणि त्याचें असें वर्णन केल्यानें त्याचा कांहीं अपमान घडला असें त्यानेंही मानूं नये, किंवा वर्णन कर-णाऱ्याच्या मनांत त्याच्याविषयीं कांहीं वावगी अनादरबुद्धि आहे असेंही कोणी समजूं नये.

मात्र केवळ व्यापारी पेशानें आपला व्यवसाय चालविण्याचा प्रकाशकाला नैसर्गिक हक्क आहे हें कितीही खरें असलें, तरी त्यानें आपली दृष्टि सदैव त्या हक्कापुरतीच संकुचित ठेवावी हें उचित नव्हे. लेखक वाचकांस एका मध्यस्थाची जरूर वाटूं लागते, अशा मध्यस्थास पैसेही द्यावयास ते तयार होतात, व हे पैसे घेऊन त्यांची गरज भागविण्याच्या उघड करारानेंच प्रकाशक आपलें कार्य सुरू करतो, याबद्दल वाद नाहीं. परंतु ज्या व्यापारी वेषांत प्रकाशक वाङ्मयाच्या रंगभूमीवर प्रथम प्रवेश करतो त्याच वेषाची रंगरफेती त्यानें आपल्या तोंडावर सदैव ठेवलीच पाहिजे असें थोडेंच आहे? एखादा डॉक्टर प्रथम एखाद्या कुटुंबाच्या घरीं जातो तो देखील पैसे घेऊन त्यांची गरज भाग-विणारा धंदेवाला या नात्यानेंच जातो. पण कालांतरानें, त्या कुटुंबाचा व त्याचा संबंध अधिकाधिक दृढ झाला म्हणजे त्या डॉक्टरच्याही मनांत त्या कुटुंबाच्या हिताविषयींची खरी कळकळ व आस्था निर्माण होतेच कीं नाहीं? या दृष्टीनें पहातां प्रथम जरी वाङ्मयाच्या प्रेमापेक्षां धंद्याच्याच दृष्टीनें प्रकाश-काचा वाङ्मयसंसाराशीं संबंध जडतो, तरी कालांतरानें कां होईना त्याच्या ठिकाणीं या संसाराविषयीं खरी स्नेहबुद्धि उत्पन्न झाली पाहिजे असें कोणी ह्मटलें तर त्यांत वावगें तें काय आहे?

प्रकाशकांनीं आपल्या पोटाला चिमटा घेऊन अभिजात वाङ्मयाचा परिपोष करावा असें कोणीच म्हणणार नाहीं. किंबहुना आजच्या गुंतागुंतीच्या जीवनकलहांत लेखक, वाचक, प्रकाशक, व टीकाकार या वाङ्मयाच्या चार घटकांपैकीं कोणालाच स्वार्थ सर्वस्वी सोडतां येणार नाहीं. वाङ्मयसेवा, किंवा

वाङ्मयाचा उपभोग, किंवा वाङ्मयाची देवघेव, यांपैकीं कोणताच व्यवहार प्राचीन कालाप्रमाणें सर्वस्वी स्वार्थनिरपेक्ष ठेवणें आजच्या परिस्थितींत शक्य नाहीं. तेव्हां प्रकाशकांनींच तेवढा स्वार्थ विसरून, वाङ्मयाची अभिवृद्धि साधावी असें कोण म्हणेल ? मात्र प्रकाशकांनीं स्वार्थ साधल्यास त्यांत वावगें नाहीं हें जितकें खरें, तितकेंच आपलें वाङ्मयांतील स्थान उच्च समजावयाचें व करावयाचें म्हटल्यास तें त्यांस सुसाध्य आहे हेंही खरें. स्वतःची इभ्रत स्वतः वाढवावी तितकी वाढते. प्रकाशकांनीं अगदींच किराणा मालाच्या दुकानदारासारखें वागावयाचें म्हटलें तरी त्यांस कोणी प्रतिबंध करूं शकणार नाहीं; पण त्याबरोबरच हेंही निःसंशय, कीं, वाङ्मयक्षेत्रांतील आपली भूमिका अधिक जिव्हाळ्याची व सन्मानाची करावयाची म्हटल्यास प्रकाशकास तें दुःसाध्य नाहीं.

पण मराठी वाङ्मयाच्या प्रकाशकांस अजून हा विचार पटलेला दिसत नाहीं. ज्याच्याजवळ थोडें भांडवल आहे, व त्या भांडवलाच्या जोरावर जो लेखकांचें लिखाण सोईस्कर भावानें विकत घेऊन छापूं शकतो व बाजारांत मांडूं शकतो तो ' प्रकाशक ' हीच व्याख्या आजच्या स्थितीस लागूं पडेल. जें वाङ्मय लेखकापासून घेऊन वाचकांस पुरवावयाचें त्याचे गुणावगुण कळण्याची पात्रता आजच्या प्रकाशकाच्या अंगीं नाहीं, व ती असावी असें अजून कोणाला फारसें वाटत नाहीं. कोरे कागद किंवा नुसती शाई विकणारा जसा दुकानदार, तसाच कागदावर शाई उठवून ते कागद विकणारा जो दुसरा दुकानदार त्याचें नांव ' प्रकाशक ' अशी प्रकाशकांची स्वतःचीच स्वतःविषयीं समजूत असलेली आज दिसते. मराठी वाङ्मयांतील बरीचशीं वैगुण्यें या समजुतीच्या पोटींच निपजलीं आहेत, आणि अर्थात्‌च मराठी वाङ्मयास चांगले दिवस येतील किंवा नाहीं हें, ही समजूत किती प्रमाणांत नष्ट होते त्यावरच अवलंबून राहील.

वाङ्मयाचें खरें स्वारस्य कळण्याची पात्रता प्रकाशकांच्या ठिकाणीं नसल्या मुळें अभिजात लिखाणापेक्षां गुणानें हिणकस पण बाजारभावानें सरस अशा लिखाणाचेंच बाळंतपण ते अधिक हौसेनें करीत आहेत. मासिकें कधीं बाळसें धरीत नाहींत, लेखकांस मोबदला देण्याच्या उघड कर्तव्याबद्दलही दुमत होण्याचा लाजिरवाणा प्रसंग उद्भवतो, आणि सर्वांत अत्यंत खेदाची गोष्ट ही, की बावनकशी, अभिजात, तेजस्वी वाङ्मयाची कुचंबणा होत आहे. एखाद्या बगीचांत जलप्रवाह निरनिराळ्या वाफ्यांत सोडण्याचा अगर न

सोडण्याचा अधिकार माळ्याला असावा, तसा अधिकार वाङ्मयक्षेत्रांत प्रकाशकांस साहजिकपणेंच प्राप्त झाला आहे. कोणत्या लिखाणाला वाट द्यायची व कोणतें लिखाण खुशाल तुंबूं द्यायचें हें ठरविण्याची हुकमत प्रकाशकांस चालवितां येत आहे. पण त्यांच्या ठिकाणीं उच्च मर्मज्ञता तर राहोच पण साधें तारतम्यही नसल्यामुळें लिखाणाच्या वास्तविक गुणांपेक्षां लेखकाच्या दिखाऊ मोठेपणावरच ते आपले ग्रंथ अगर लेख प्रकाशित करण्याचें धोरण अवलंबून ठेवतात. केवळ योगायोगानें मान्यतेस चढलेल्या, अगर केवळ पदव्यांच्या पिसाऱ्यानें सुशोभित दिसणाऱ्या लेखकांपेक्षां कांहीं तरुण लेखकांचें लिखाण पाहिलें तर किती तरी पटींनीं अधिक श्रेष्ठ असतें. असलें लिखाण माझ्या पाहण्यांत आहे. कांहीं तरुण मुलें खरोखरीच मोठ्या शैलीनें लिहितात. त्यांच्या लघुकथांस व कादंबऱ्यांस प्रसिद्धी मिळत नाहीं याचें एकच कारण हें, कीं ते स्वतः प्रसिद्धि पावलेले नसतात; आणि अज्ञात कलमबहादुरांस शोधून काढून त्यांस प्रकाशांत आणण्याची बौद्धिक योग्यता व इच्छा प्रकाशकांच्या ठिकाणीं नसते. या प्रकारामुळें मराठी वाङ्मयाचें केवढें अपरिमित नुकसान होत आहे याचा कोणीच विचार करीत नाहीं हें आश्चर्य होय.

हा प्रकार कधीं थांबेल, कीं, नेहमीं असाच चालूं राहणार ? कांहीं लोकांना वाटतें, कीं या प्रकारावर उपाय नाहीं. पण इतकें निराश होण्याचें कारण नाहीं. धंदेवाल्या प्रकाशकांस आज नसलेली वाङ्मयविषयक मर्मबुद्धि उद्यां येईल अशी आशा मी करतों असें नव्हे. पण अभिजात मर्मबुद्धीचे वाङ्मयोपासकच प्रकाशनाचा धंदा हळू हळू हातीं घेतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. हा प्रयोग यशस्वी होत गेला, तर साहित्यक्षेत्रांतील चार मुख्य घटकांपैकीं प्रकाशकांच्या घटकांकडून अभिजात वाङ्मयाच्या वाढीस जें सहाय्य आज मिळत नाहीं तें मिळूं लागेल, व मराठी साहित्याचें तेज झपाट्यानें वाढल्याखेरिज राहणार नाहीं.

## नं. २०

वाङ्मयक्षेत्रांतील चवथा महत्त्वाचा घटक 'टीकाकार' होय. या घटकाचा वाङ्मयाशीं येणारा संबंध जरासा चमत्कारिक आहे. लेखकावांचून वाङ्मयनिर्मिति अशक्यच आहे हें उघड होय. वाचकांवांचूनही वाङ्मयनिर्मितीची खरी फलश्रुति होणार नाहीं याबद्दलही वाद नाहीं. आणि प्रकाशकावांचूनही वाङ्मय-प्रसार कुंठित होईल हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. 'टीकाकार' मात्र वाङ्मयाच्या निर्मितीस अगर प्रसारास इतका आवश्यक आहेसें म्हणतां येणार नाहीं. त्याच्यावांचून वाङ्मयाचें कांहीं अडेल असें नाहीं. म्हणूनच 'टीकाकार' हें पात्र वाङ्मयाच्या रंगभूमीवर फार उशीरा प्रवेश करतें. साहित्याच्या इतिहासांत दीर्घकालानंतर प्रकाशकाची आवश्यकता भासूं लागते, हें मीं पूर्वीं दर्शविलेंच आहे. 'टीकाकार' तर प्रकाशकाच्याही नंतर लोकांना हवासा वाटूं लागतो. वाङ्मयाची पुष्कळशी वाढ झाली, लेखकांची संख्या मोठी झाली, आणि वाचकांचाही पसारा खूपच वाढला, म्हणजे मग 'टीकाकार' आवश्यक वाटूं लागतो.

खरें पहातां **प्रत्येक वाचक स्वभावतः स्वतःच टीकाकारही असतो.** प्रत्येक वाङ्मयप्रेमी स्त्री-पुरुषास जसें वाचावेंसें वाटतें, तसेंच जें वाचलें तें बरें अगर वाईट ठरविण्याची थोडीफार बुद्धीही प्रत्येकाच्या ठिकाणीं निसर्गतः असतेच. वाचण्याची हौस, आणि जें वाचलें त्याबद्दल बरेंवाईट मत प्रदर्शित करण्याची शक्ति व प्रेरणा प्रत्येकाच्या ठिकाणीं साहजिकच असते. अर्थात् तत्त्वतः पहातां 'वाचक' आणि 'टीकाकार' या भूमिका भिन्न नाहींतच. वाङ्मयाचा पसारा जोंपर्यंत आटपशीर असतो, आणि लेखक व वाचक यांची संख्या मर्यादित असते, तोंपर्यंत वाचक आणि टीकाकार या दोन्ही भूमिका अभिन्न असतात. परंतु हें अभिन्नत्व कालांतरानें गैरसोईचें आणि कधीं कधीं अशक्यही होत जातें. समाजांतल्या सर्वच स्त्री-पुरुषांस वाचावेंसें वाटूं लागलें म्हणजे काय वाचलें असतां त्यांना हवा तो आनंद प्राप्त होईल, आणि काय वाचलें असतां त्यांच्या वेळाचा अपव्यय होईल, हें सांगणारा कोणीतरी एक मार्गदर्शक असेल तर बरा, असें सर्वांना वाटूं लागतें. **हा मार्गदर्शक म्हणजेच 'टीकाकार' होय.**

समजा, कांहीं मुशाफर अबूच्या पहाडाची सफर करावयास निघाले आहेत. त्यांची लहर असेल तर अबूरोड स्टेशनवर उतरल्यापासून ते आपल्या बुद्धीनेंच अबूच्या पर्वताची वाट शोधून काढूं शकतील, आणि पर्वतारोहण केल्यावरही स्वच्छंदानें विहार करून तेथील सृष्टिशोभा, मंदिरें आणि गिरिशिखरें पाहूं शकतील. किंबहुना, अशा स्वच्छंद विहारांत एक अनुपमेय आनंदही आहे. परंतु तो उपभोगण्याची इच्छा, अगर आवश्यक ती सवड सगळ्याच मुशाफरांना असेल असें थोडेंच आहे ! कित्येक प्रवासी असेही असतील—नव्हे बहुतेक असेच असतात, कीं त्यांना थोडक्या वेळांत अबूपर्वताची सफर करावयाची असते, आणि घाईं-घाईनें तेथील शक्य तितकीं निवडक स्थळें पाहून घ्यावयाचीं त्यांची इच्छा असते. असे प्रवासी मग काय करतात ? ते एक माहितगार वाटाड्या मिळवितात, आणि त्याच्या मदतीनें आपला कार्यभाग साधतात.

साहित्यक्षेत्रांतील शेंकडा नव्याण्णव प्रवासी याच वर्गांतले असतात. आजच्या घाईच्या काळांत साहित्यक्षेत्रांत कोणतें रम्य स्थळ कोठें आहे तें शोधून ठरविण्याची फुरसत फारच थोड्या लोकांना आहे. बहुतेक सारे स्त्रीपुरुष जीवन-कलहाच्या विविध व्यापांत अष्टौप्रहर गुंतलेले आहेत. चांगलें अन्न कोणतें आणि वाईट कोणतें हें सुद्धां स्वतःच्या अनुभवानें ठरविण्यापेक्षां कोणी त्यांना आयतें सांगेल तर हवें आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक मतेंही स्वतःच्या मतीनें बनविण्याऐवजीं वर्तमानपत्रकार आयती ताटांत वाढतील तशी चघळण्याची त्यांची तयारी आहे. किंबहुना, सामान्य लोकांची आज अशी अवस्था झाली आहे, कीं त्यांनीं निरनिराळ्या गोष्टी-बद्दलची आपली तारतम्य बुद्धि निरनिराळ्या लोकांवर सोपवून टाकली आहे. अर्थातच वाङ्मयाची बाबही या प्रकारास अपवाद नाहीं. चांगली वाङ्मयकृति कोणती आणि वाईट कोणती तें सांगण्याचें कार्यही कोणी करील तर बरें, मग त्याच्या आयत्या मतावर अवलंबून राहून आपल्या वाचनाची हौस भागवायला हरकत नाहीं, असें सामान्य स्त्री-पुरुषांस वाटावें हें क्रमप्राप्तच होय.

या प्रकारांत तत्त्वतः आश्लाघ्य अगर भीतिप्रद असें वास्तविक कांहींच नाहीं. अबूच्या पहाडाची खरी सरळ सोपी वाट, आणि तेथील निवडक रम्य स्थळें दाखविणें हें आपलें नियोजित कार्य होय असें वाटाड्यानें नित्य ध्यानांत वागविलें तर त्यांत मुशाफरांचें अगर कोणाचेंच अहित होण्याचा संभव नाहीं.

तद्वतच साहित्यक्षेत्रांतल्या टीकाकारानें आपल्या खऱ्या कर्तव्याची जाणीव सदैव ठेवली तर त्यांत वाचकांचें, आणि वाङ्मयाचेंही हितच आहे. अहिताचा संभव उत्पन्न होतो तो टीकाकार स्वतःची खरी भूमिका टाकून वेगळीच भूमिका स्वीकारतो त्यावेळीं.

कोणत्याही वाङ्मयाला टीकाकारांचा उपसर्ग होऊं लागतो तो टीकाकार मार्गदर्शकाचें काम टाकून 'सासूबाई' बनतात त्यामुळें. सुनेनें कांहीं केलें तरी त्यांतलें वैगुण्य तेवढें शोधून काढण्याची सासूची वृत्ति टीकाकारांच्या अंगांत संचरते, व मग हे टीकाकार नसतील तर बरें असें म्हणण्याचा प्रसंग येतो. कोणत्याही लेखकानें कांहीं लिहिलें, कीं त्यांतील वैगुण्यें कशीं दाखवितां येतील याचीच तेवढी चिंता टीकाकार करूं लागला कीं, खरें पहातां त्याची टीकाकाराची भूमिका संपली असें म्हटलें पाहिजे. दुर्दैवानें असल्या जातीचेच टीकाकार आज मराठी साहित्यांत अधिक वावरत आहेत; आणि त्यामुळें 'टीका' या शब्दाच्या खऱ्या अर्थाहून अगदींच विपरीत अर्थ रूढ झाला आहे. टीका म्हणजे वावदूकता, अपशब्दप्राचुर्य, निंदा असा समज आज होऊन बसला आहे.

मोर्लेसाहेबांनीं आपल्या आत्मवृत्तांत एक मोठी गमतीची आठवण नमूद केली आहे. ते एका पत्राचे संपादक असतांना एक नुकतीच मिसरु फुटूं लागलेला तरुण गृहस्थ त्यांजकडे आला, व म्हणाला मला तुमच्या संपादक-मंडळांत घ्या. मोर्लेनीं विचारलें,

"तूं कोणत्या विषयाचा विशेष अभ्यास केला आहेस ? अर्थशास्त्र !"

"नाहीं." त्या तरुणानें उत्तर दिलें.

"मग धर्मशास्त्र ?"

"नाहीं."

"मग वाङ्मय ?"

"नाहीं."

"मग तुला येत आहे तरी काय ?"

"महाराज, अगदीं शेलक्या खरपूस शिव्या देण्यांत मी फार पटाईत आहे."

असल्या पटाईतपणाच्या भांडवलावरच मराठी साहित्यांतील टीकालेखनाचा व्यवसाय बहुतांशीं चालला आहे!

नं. २१

वाङ्मयाच्या योग्य अभिवृद्धीस ज्या अनेक गोष्टींची आवश्यकता आहे त्यांत टीकाकारांस स्वतःच्या नियोजित कार्याविषयीं शास्त्रशुद्ध कल्पना असणें या गोष्टीचा प्रामुख्यानें अंतर्भाव केला पाहिजे. 'टीकाकार' हा सामान्य वाचकांचा 'मार्गदर्शक' होय ही कल्पना दृढपणें लक्षांत ठेवून टीकालेखक लिहीत रहातील तर वाङ्मयाच्या प्रगतीस हातभार लावल्याचें श्रेय त्यांच्या पदरीं खाचित पडेल. पण उलट, ही कल्पना मनांत न बाळगतां टीकाकार लिहूं लागले म्हणजे वाङ्मयाचें थोडेंफार नुकसान तर ते करतातच, पण खुद्द टीकावाङ्मयाचीही अस्सल शोभा आणि महति ते नष्ट करून टाकतात. त्यांच्या टीकालेखावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं, आणि साहित्यांत टीका-वाङ्मय ही वास्तविक एक मोठी शक्ति असतांनाही त्या वाङ्मयास उपेक्षणीय स्वरूप प्राप्त होतें.

आज मराठींतील टीकावाङ्मयाची स्थिति बहुतांशीं अशी आहे. मोर्ले-साहेबांच्या भेटीला येणाऱ्या ज्या उमेद्वाराचा पूर्वीं उल्लेख केला त्या उमेद्वाराप्रमाणेंच आमच्या बहुतेक टीकाकारांची वृत्ति असते. थोडक्याशा ज्ञानाच्या हळकुंडानें पिवळ्या झालेल्या तत्त्ववेत्त्यांचें वर्णन करतांना प्लेटोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, कीं "ह्या लोकांना कुत्र्यांच्या पिलांचीच उपमा चांगली शोभते! जें पुढें येईल त्याचे लचके तोडून फाडून तुकडे करण्याखेरीज त्यांना कांहीं सुचेल तर शपथ!" प्लेटोचें हें वर्णन मराठी टीकाकारांस लागू पडेल कीं नाहीं तें मी सांगावयासच पाहिजे असें नाहीं. प्रत्येक मराठी मासिकांत व वृत्त-पत्रांत नवीन प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्यावरील टीकेचा एक विभाग हमखास असतोच. या विभागांत प्रसिद्ध होणाऱ्या टीकावाङ्मयाकडे पाहिलें म्हणजे प्लेटोचें उपरोक्त वर्णन आठवल्यांवाचून रहात नाहीं. ज्यांनीं उभ्या जन्मांत कधीं कादं-बरी लिहिली नाहीं, किंवा ज्यांनीं कादंबरीलेखनाच्या शास्त्राचाही कधीं अभ्यास केला नाहीं, अशीं माणसें आपापल्या खाजगी लोभावर अगर मत्सरावरच सर्वस्वीं भिस्त ठेवून कादंबऱ्यांचीं परीक्षणें करतांना दिसलीं म्हणजे मोठा आचंबा वाटतो.

कोणी म्हणेल कादंबरीवर टीका करण्यास कादंबरी लिहिणाऱ्यालाच तेवढा अधिकार आहे असें तुम्ही म्हणतां काय ? नाहीं, असें मी म्हणत नाहीं. पण मी असें मात्र खचित म्हणतों, कीं ललितलेखन, आणि ललितवाङ्मयावरील टीकालेखन हीं एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत असा जो समज आज रूढ झालेला दिसतो तो सर्वस्वी चुकीचा आहे. माझ्या मतें **टीकालेखन हा ललितलेखनाचाच एक प्रकार होय.** एका इंग्रज विद्वानानें म्हटलें आहे ना, कीं " काव्य म्हणजे या संसारावरची टीका होय " ? या उद्‌गारांत फार मोठें मर्म आहे असें मी मानतों, आणि या उद्‌गारांत ध्वनित झालेल्या अर्थानेंच 'टीका' या शब्दाकडे सर्वांनीं पहावें असें माझें आग्रहाचें सांगणें आहे.

ललितलेखक संसाराकडे कोणत्या दृष्टीनें आणि हेतूनें पहातो ? संसारांतील नानाविध सुखदुःखांचा प्रत्यक्ष अगर कल्पनेनें अनुभव घेऊन त्या त्या अनुभवाच्या वेळीं स्वतःच्या हृदयांत उसळलेल्या भावना लोकांच्या हृदयांत उत्पन्न कराव्या, हीच त्याची दृष्टी असते, नव्हे काय? हें कार्य साधावयासाठीं त्याला कलासक्त वृत्ति अखंड ठेवावी लागते. कलाकृति रचतांना सौंदर्यपोषक साहित्याचाच तेवढा तो उपयोग करतो, व बाकीचें साहित्य तो वगळतो. म्हणजे अत्यंत उच्च दर्जाची **सौंदर्यदृष्टि**, व आल्हाद निर्माण करण्याची शक्ति त्याच्या ठिकाणीं अवश्य असते. ही दृष्टि व शक्ति जितकी प्रभावशाली असेल, तितकें त्याच्या कृतीस अधिक लालित्य प्राप्त होतें. ही दृष्टि म्हणजेच 'टीका' होय. वर ज्या एका इंग्रज पंडिताचे उद्गार दिले आहेत त्यानें 'टीका' शब्द याच अर्थानें वापरला आहे; आणि आपल्याकडील जुन्या संस्कृत वाङ्मयांतही 'टीका' हा शब्द याच अर्थानें रूढ होता. काव्यप्रकाशाचें हृद्गत हृदयंगम रीतीनें सांगणें याला 'टीका' म्हणत, व अशी टीका लिहिल्यावांचून भट्ट पदवी लावतां येत नसे. पंचमहाकाव्यांवर कित्येक टीका आधींच उपलब्ध असूनही मल्लिनाथाची 'टीका' पुढें येतांच ती सर्वोत्कृष्ट कां मानली गेली ? तर मूळ काव्यांतील रस हलुवार हातांनीं वाचकांच्या हृत्संपुटांत ओतण्याचें काम त्यानें सर्वांहून उत्कृष्टपणें केलें म्हणून. राघवभट्टाची शाकुंतलावरील 'टीका' वाचीत असतां मूळ काव्य अधिक सुरस, की, ही टीका अधिक सुरस असा भ्रम पडतो कीं नाहीं ?

म्हणून मी म्हणतों, कीं लालित्याखेरीज खरी 'टीका' संभवत नाहीं. इतिहासाचा ग्रंथ नीरस असेल; पण त्यावरची सुद्धां टीका आल्हादकारक असलीच

पाहिजे. कादंबऱ्या, व काव्य यांची बाबत तर निःसंशयच आहे. **काव्य म्हणजेच जर एक प्रकारची टीका, तर या टीकेवरची टीका काव्यमयच असावयाला नको का?** संसारांतील विविध सौंदर्य इतरांना पटविण्यासाठीं ललितलेखक लिहितो. हें त्याचें लिहिणें म्हणजे जीविता वर त्यानें केलेली 'टीका' होय. या टीकेवर ज्याला टीका करावयाची असेल त्याचें वास्तविक कार्य कोणतें? तर अर्थातच ललितलेखना-पासून त्याला स्वतःला जो आनंद होईल तो इतरांस मिळवून देण्याचें! आणि हें कार्य त्याच्या हातून योग्य रीतीनें केव्हां होईल? तर अर्थातच कवीच्या अंगीं जसें लालित्य व सौंदर्यप्रेम असावें लागतें तसेंच त्या टीकाकारांच्याही अंगीं असेल तेव्हांच! सारांश, **टीकाकार हा एक प्रकारें ललितलेखकच असला पाहिजे.** कवि संसारांतील मर्म सौंदर्यकृतीच्या द्वारें लोकांस पटवितो, आणि कवीच्या सौंदर्यकृतीचें मर्म लोकांस मनोहर रीतीनें पटविणें हेंच टीकाकाराचें खरें कार्य समजलें पाहिजे.

हें विवेचन विस्तारानें करण्याचें हें स्थळ नव्हे. पण, ललितलेखनावर ज्याला टीका लिहावयाची तो ललितवृत्तीचा, सौंदर्यशोधक, आणि ललितलेखनांत सरावलेला–निदान त्या जातीच्या लेखनाचें मर्मज्ञपणें सतत वाचन करणारा तरी–असला पाहिजे, हें माझें विधान प्रथमदर्शनीं चमत्कारिक वाटलें तरी तें खरें पाहतां ग्राह्यच कसें आहे, हें दर्शविण्यासाठीं इतकें लिहिणें भाग पडलें. टीकालेखनाचा मूळ हेतू, टीकाकाराच्या अंगीं अवश्य लागणारी ललितवृत्ति, आणि टीकालेखन, व सदभिरुचि आणि सौंदर्यप्रीति यांचे निकट संबंध— इत्यादि सर्व गोष्टींची यथार्थ जाणीव आमच्या मराठी टीकाकारांत, व वाच-कांतही, निर्माण व्हावी अशीच कोणाही वाङ्मयभक्ताची कळकळीची इच्छा असणार! त्या इच्छेनें प्रेरित होऊनच जें सुचलें तें स्पष्टपणें सांगितलें.

## नं. १२

वाचक, प्रकाशक व टीकाकार यांचे तत्त्वतः वाङ्मयाशीं कोणत्या प्रकारचे संबंध असतात, व त्यांत विकृति उत्पन्न झाल्यानें वाङ्मयाच्या अभिवृद्धीवर कसे अनिष्ट परिणाम होतात, याविषयींचे माझे विचार येथवर मीं आवश्यक त्या निर्भीडपणानें सांगितलें. मराठी ललितसाहित्याची सर्वांगीण वाढ व्हावी तितक्या त्वरेनें होत नसेल तर त्याचें पाप पुष्कळ अंशीं वाचक, प्रकाशक व टीकाकार यांच्या माथींच आहे. ते आपापलीं कर्तव्यें सुबुद्धपणें व तत्परतेनें करित नाहींत म्हणूनच ललितसाहित्य वाढावें तसें वाढत नाहीं.

पण मराठी ललितसाहित्याची वाढ खुंटविणारें आणखी एक चवथें कारण आहे. त्याचा मी आतांपर्यंत उल्लेख केला नाहीं. मुद्दामच केला नाहीं. कारण ललितसाहित्याचा केवळ तत्त्वतः विचार केला तर त्याच्या उन्नतीस अगर अवनतीस कोणकोणत्या गोष्टी कारण होतात तें मला सांगायचें होतें. वाङ्मय म्हटलें, कीं लेखक व वाचक हे दोन घटक कसे मानावे लागतात, आणि तसेंच वाङ्मयाचा प्रसार म्हटला कीं, प्रकाशक व टीकाकार हे आणखी दोन घटक कसे उद्भवतात, आणि या चार घटकांच्या निकोप अगर विकृत परस्परसंबंधावरच वाङ्मयाचा उत्कर्ष अगर अपकर्ष कसा अवलंबून आहे–इत्यादि गोष्टींचें विवेचन मला करावयाचें होतें. हें विवेचन सर्वसामान्य शब्दांत करण्याचा माझा हेतू होता. तें मराठी वाङ्मयासच नव्हे तर, कोठल्याही वाङ्मयास लागू करून, पडताळून पाहतां यावें अशा धोरणानेंच मीं तें केलें. आतां मात्र सर्वसामान्यपणें वाङ्मयास लागू पडणारा सिद्धान्त मला सांगावयाचा नसून, मराठी ललितसाहित्यापुरतेंच एक विधान मी करणार आहें. तें असें, कीं वाचक, प्रकाशक, व टीकाकार यांच्या स्वकर्तव्यच्युतीमुळें होणाऱ्या मराठी वाङ्मयाच्या नुकसानींत भर टाकणारी आणखी एक गोष्ट आहे.

ती गोष्ट म्हणजे आमच्या दुर्दैवी देशाचें पारतंत्र्य !

लेखकांस राजाश्रय नाहीं ही ठरीव ओरड करण्याच्या अभिप्रायानें मी हें म्हणत नाहीं. एक तर इतर वाङ्मयाप्रमाणेंच मराठी वाङ्मयही राजाश्रयाऐवजीं लोकाश्रयावरच आतां या नव्या काळांत जगणार हें स्पष्ट आहे. आणि शिवाय,

राजाश्रयाची आशा बाळगण्याची शक्यता असेल तेथें सुद्धां स्वतःच्या इभ्रतीचें मोल देऊन लेखकांनीं ती उराशीं धरावी असें मला वाटत नाहीं. जातिवंत कवि अगर कलावंत मानधन असतो. दरिद्री रसिकाची वाहवा मिळविण्यांत त्याला जें भूषण वाटावें, तें राजचिन्हांकित अरसिकानें खोटा रसिकपणा मिरविण्यासाठीं पुढें केलेल्या मोहोरांच्या आहेरांतही वाटूं नये अशी त्याची मनोवृत्ति तेजस्वी असते. सरस्वतीच्या दरबारांत नम्रपणें येऊन तेथें उच्चासनावर अधिष्ठित झालेल्या सारस्वतांस वंदन करण्यापूर्वीं उपहार म्हणून राजानें कांहीं दिलें तर सारस्वतांनीं त्याचा आशीर्वादपूर्वक स्वीकार करावा. परंतु राजाश्रय मिळविण्यासाठीं सरस्वतीच्या दरबारांतील सिंहासनावरही आरूढ होण्याची राजाला सारस्वतांनीं विनंति करावी हें निःसंशय लाजिरवाणें होय ! राजे विद्वानांस व पंडितांस आपल्या दरबारीं बोलावतात ते त्यांजकडून स्वतःची स्तुति वदवायसाठींच कीं नाहीं ? आणि जे विद्वान् व पंडित जातात ते खुशाल आपलें तेजोवलय, व स्वाभिमान गहाण टाकून मोकळ्या जिभेनें राजघराण्यांतल्या तान्ह्या मुलाच्या अंगींदेखील काव्यगुण चिकटावायलाच जातात कीं नाहीं ! या राजांनीं कधीं साहित्य-संमेलनाच्या एखाद्या लोकमान्य अध्यक्षाला योग्य इतमामानें नेऊन आपल्या स्वतःच्या सिंहासनावर बसविलें आहे काय ? मग सारस्वतांनीं या राजांना आपल्या दरबारांतील सिंहासनावर कशासाठीं आणून बसवायचें, व त्यांत धन्यता मानायची समजत नाहीं ! आणि इतकें करूनही अग्रपूजेचा मान तेवढा पदरांत पाडून घेऊन सारस्वतांस उलट कांहीं न देतां राजे मुकाट्यानें जातात तेव्हां तर वेड्या आशेच्या नादीं लागलेल्या आपल्या या कुपुत्रांची सरस्वतीस खचित खंत येत असेल !

सारांश, आपल्या देशाच्या पारतंत्र्यामुळें मराठी ललित साहित्याच्या वाढीस प्रतिबंध होत आहे, असें मी म्हणतों, तें त्या साहित्यास राजाश्रय नसल्यानें होणारें नुकसान सुचविण्याच्या दृष्टीनें नव्हे. माझा मुद्दा निराळाच आहे. तो असा, कीं **आमच्या परदास्यामुळें आमच्या ललित वाङ्मयास आवश्यक तो अवसर मिळत नाहीं, व त्यामुळें कधीं कधीं त्याच्या लालित्यांतच कमतरता असल्याचा संशय अविचारी टीकाकारांस घेतां येतो.**

कलाविलासास तत्त्वतःच मुळीं स्वतंत्र वातावरणाची आवश्यकता आहे. कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्याच्या काळांत ललितकलांची झपाट्यानें वाढ होते, व उलट परतंत्रतेंत देश पडला कीं, ललितकला क्षीण होतात असा नेहमींचा सिद्धान्त आहे. स्वतंत्र युरोपिअन राष्ट्रांकडे पाहिल्यास, जपाननें अवघ्या पांचपन्नास वर्षांच्या अवधींत ललितकलांचा केवढा परिपाक केला तें पाहिल्यास, किंवा गेल्या दहाबारा वर्षांत नवजागृत रशियन राष्ट्रानें ललितकलांच्या प्रांतांत किती परिश्रम, प्रयोग व प्रगति केली आहे तें पाहिल्यास याच सिद्धान्ताचा प्रत्यय येतो. आणि या राष्ट्रांचें उदाहरण मी देतों तें तेथें ललितकलांस राजाश्रय आहे व आपल्याकडे नाहीं हें सांगण्यासाठीं नव्हे, तर अगदीं वेगळाच मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं.

तो मुद्दा हा, कीं त्या स्वतंत्र राष्ट्रांत कलावंतांना आपल्या भावनांचा कोंडमारा करावा लागत नाहीं, आणि आपल्या देशांत मात्र कलावंतांना व विशेषतः ललित लेखकांना—तो करावा लागतो, व त्याचा वाङ्मयाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं !

नं. २३

जगांतील सुखदुःखांच्या अनुभवांनीं सामान्य माणसांहून सहस्रपटींनीं अधिक प्रक्षुब्ध होणें हेंच मुळीं कवीच्या अगर ललितलेखनाच्या अंतरंगाचें वैशिष्ट्य; आणि आपल्या अंतरंगांत उठलेला भावनाप्रक्षोभ सामान्य स्त्रीपुरुषांच्याही अंतःकरणांत उठविणें हेंच मुळीं ललितलेखकाचें मुख्य कार्य! संसारांत साम्य व सौख्य दिसलें, कीं ललितलेखकाची सौंदर्यशोधक दृष्टि संतुष्ट होते, व तो संतोष त्याच्या वाणीवाटें प्रासादिक, नादमधुर शब्दांत बाहेर पडून सामान्य माणसांसहि सौंदर्यप्रत्यय घडतो आणि आल्हाद होतो. चतुरस्रता, किंवा साम्य ( Symmetry ) हा सौंदर्याचा आत्मा मानला जावा यांत फार खोल अर्थ आहे. हें साम्य केवळ दृष्टिगोचर सौंदर्यांतच असतें असें नव्हे, तर सर्व प्रकारच्या–इंद्रियगोचर आणि अतींद्रिय सौंदर्यांतहि असावें लागतें. ज्या स्वरांत साम्य असतें त्यांतच सौंदर्य असतें, व त्यांच्याच ठिकाणीं रंजकत्व असतें, हें जसें खरें तसेंच ज्या विचारांत, तत्त्वज्ञानांत, सामाजिक चालीरीतींत, धर्माचारांत, समाजव्यवस्थेंत, व राज्यकारभारांत साम्य ( Symmetry ) असतें त्यांतच ललितलेखकास सौंदर्य दिसतें हेंही खरें! आपण नेहमींच्या व्यवहारांत ज्याला ' न्याय ' म्हणतों तो न्याय म्हणजे खरें पाहतां हें ' साम्य ' ( Symmetry ) आणि तदंगभूत सौंदर्यच होय. या सौंदर्याचा ललितलेखक भुकेलेला असतो. तें ज्या ज्या स्थळीं त्याला दिसेल तेथें तेथें तो रमतो, व इतरांस रमवितो; आणि अशा स्वरूपाच्या नव्या नव्या सौंदर्यस्थलांचा शोध करण्यांत त्याची ललितबुद्धि सदैव मग्न असते.

साम्य हें जर साऱ्या सुखाचें व सौंदर्याचें अधिष्ठान, तर साऱ्या दुःखांचें आणि सौंदर्यहीनत्वाचें मूळ कारण वैषम्य होय हें उघडच आहे. हें वैषम्य अगर प्रमाणशून्यत्व केवळ दृग्गोचर किंवा श्रुतिगोचर वस्तूंतच असतें असें नव्हे, तर मानवी कल्पनांत, आचारांत, व सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितींतही असतें. ज्याला आपण सामान्यपणें ' अन्याय ' म्हणतों तो अन्याय म्हणजे हें वैषम्यच होय! हें जेव्हां जेव्हां दिसेल तेव्हां तेव्हां ललित-

लेखकाचें हृदय व्याकुळ होतें, आणि या व्याकुलतेंत तो जें लिहितो तें वाचतांच वाचकांच्या अंतःकरणांतहि त्या वैषम्याविषयीं क्षोभ उत्पन्न होतो.

एका दृष्टीनें पाहतां, ललितकलांचा उगमच मुळीं निसर्गांतील व संसारांतील सर्व तऱ्हेच्या वैषम्याविरुद्ध माणसाच्या साम्यशोधक वृत्तीनें पुकारलेल्या युद्धांत आहे! ललितलेखनास अर्थातच हा न्याय लागू आहे. वैषम्यांच्या अनुभवानें कष्टी झालेल्या अंतःकरणास आशेचा संदेश सांगणें हा ललितलेखनाचा प्रधान हेतू होय. प्रत्यक्ष संसारांत विषमता, आणि कुरूपता दिसली, कीं ती केवळ तात्पुरती आहे असें दुःखितांना सांगणें, आणि अखेर साम्याचें व सौंदर्याचेंच साम्राज्य स्थापन होईल असें साऱ्या निराशाग्रस्तांस आश्वासन देणें हेंच ललितलेखक आपलें जीवितकार्य समजत असतो.

या संसारांत सगळ्यांत हिडिस, अमंगळ आणि विषम अशी कांहीं गोष्ट असेल तर ती राजकीय परतंत्रता. इतर सर्व अमंगळपणाची आणि सौंदर्यहीनत्वाची ती खाण आहे. खऱ्या ललित हृदयाच्या लेखकास तिचें अस्तित्व क्षणभरही सहन होणार नाहीं, आणि आपल्या देशबांधवांस जागृत करण्यासाठीं व राजकीय स्वातंत्र्यांत जें अवर्णनीय सौंदर्य आहे त्याचाच अखेर विजय झाला पाहिजे ही ग्वाही देण्यासाठीं त्याचा जीव अधीर होईल! पण मराठी ललितलेखकांचें दुर्भाग्य असें, कीं आजपर्यंत कोणत्याच देशाला भोगावें लागलें नसेल असें जाचक परदास्य त्यांच्या मायभूमीच्या वांट्याला आलेलें आहे. धारेचीं पोलादी शस्त्रेंच नव्हे तर धारेच्या लेखण्यादेखील हातांतून काढून घेण्याइतकी अमर्याद सत्ता परकी सरकारानें हातीं राखली आहे, आणि आपल्या उफाळणाऱ्या भावनांचा एक कप्पा अजीबात बंद करण्यापलीकडे लेखकांस उपाय उरलेला नाहीं! आणि भावनांच्या या कोंडमाऱ्यांत भर घालण्यासारखी टीका जेव्हां टीकाकार करतात तेव्हां तें दुःख अधिक कीं या टीकेचें दुःख अधिक मानावें हेंच कळत नाहीं!

आधुनिक मराठी कादंबरीकारांवर विद्वान् टीकाकारांचे तीन आक्षेप ठरलेले आहेत. ते असे कीं, (१) या कादंबरीकारांना तरुणांच्या प्रेमाखेरीज दुसऱ्या कसल्या प्रेमप्रकाराविषयीं लिहितांच येत नाहीं, (२) यांना समाजांतील खालच्या वर्गाशीं समरस होतां येत नाहीं, आणि (३) यांना राजकीय स्वातं-

त्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची दादही नसल्याप्रमाणें हे प्रणयकथा गुंफण्यांत मग्न असतात !

या व असल्या सगळ्याच आक्षेपांना एकदां अगदीं भरपूर उत्तर देण्याची माझी इच्छा आहे. ज्यांच्या अंगीं ललितवृत्ति रतिभरही नाहीं अशा व्यक्तींनीं ललितलेखनावर टीका केली कीं, त्यांजकडून अविचारी व विपर्यस्त टीका होणें स्वाभाविक असतें असें जें मीं पूर्वी ध्वनित केलें त्याचें उत्तम उदाहरण म्हणजे हे ठराविक आक्षेप होत. या आक्षेपांचा विस्तारपूर्वक विचार मी योग्य काळीं व स्थळीं करीन. येथें उपरिनिर्दिष्ट तीन आक्षेप विचारांत घेऊन पहिल्या संबंधानें इतकेंच म्हणतों, कीं कादंबरीकारें तरुणांच्या प्रणयाखेरीज इतर प्रीतिभावांबद्दल लिहीतच नाहींत, ही तक्रार साफ चुकीची आहे. ज्या तरुणांचा प्रणय कादंबरीचा मुख्य विषय झालेला असतो त्यांना आईबाप, वडीलधारीं माणसें कादंबरीकारानें ठेवलेलींच असनात ना ? कां मारून टाकलेलीं असतात ? आणि त्यांच्या परस्पर प्रीतीचीं व वात्सल्याचीं वर्णनें कादंबरीकारानें कांहीं कमी बहारीनें केलेलीं नसतात ! वाचक तीं विसरतात व नायक–नायिकांचे प्रेमालाप तेवढे वेंचून ध्यानांत ठेवतात म्हणून त्यांना वाटतें कादंबरींत त्याखेरिज दुसरें कांहीं नाहीं ! एका जाड्या विद्वानानें माझ्या ‘ निरंजन ’ कादंबरीवर अभिप्राय देतांना म्हटलें होतें, कीं सुगंधा अल्पकालच कथानकांत आली असून देखील तीच नायिकेपेक्षांही नजरेंत अधिक भरते ! हा त्या बिचाऱ्या तत्त्वज्ञानानें गांजलेल्या जीवाच्या ‘नजरे’चा दोष ! त्याला कादंबरीकार काय करील ?

उपरिनिर्दिष्ट तीन आरोपांपैकीं बाकीचे दोन आरोपही असेच भ्रममूलक आहेत. कसें तें पहा.

## नं. २४

आधुनिक मराठी कादंबरीकार समाजाच्या निकृष्ट वर्गाशीं समरस होत नाहींत, व राजकीय हक्कांविषयीं त्यांना तळमळ नाहीं असें टीकाकारांनीं म्हणावें याला पुरावा काय, तर सामाजिक व राजकीय विचारक्रान्तीच्या विषयावर कादंबऱ्या लिहिल्या जात नाहींत.

हा पुरावा खोटा नाहीं, पण त्यावरून टीकाकार जो निर्णय काढूं पाहतात तो खोटा आहे. टीकाकारांना वाटतें, पाश्चात्य कादंबरीकार पहा, नानाविध सामाजिक प्रश्नांविषयीं किती जिव्हाळ्यानें लिहितात ! राजकीय घडामोडींचीं चित्रें किती जबरदस्त शैलीनें रंगवितात ! टॉलस्टायनें आपल्या कादंबऱ्या वाचकांपुढें टाकल्याबरोबर त्यांतून प्रज्वलित विचार विकारांचा येवढा स्फोट झाला, कीं रशियांतल्याच नव्हे तर सबंध युरोपियन मानववंशांतल्या नीति-अनीतीच्या कल्पना, व कायदेकानू जळून भस्मसात होतात कीं काय असें जगाला वाटलें ! Uncle Tom's Cabin ही एकच कादंबरी प्रसिद्ध होतांच पोकळ सत्तेच्या व खोट्या मिरासदारीच्या साऱ्या रूढ कल्पना हादरल्या, आणि स्वातंत्र्याची शुद्ध कल्पना कोट्यावधि लोकांच्या अंतःकरणांत उदित झाली. आज Upton Sinclair ची एक एक कादंबरी वाचावी तों वाटतें, जणूं तिच्या योगानें तो अमेरिकन लोकांच्या राज्ययंत्रांतलें एकेक चक्र वज्राघातानें ठेंचून खिळखिळें करून टाकीत आहे ! अशा सामर्थ्याचा मराठी कादंबरीकार कोठें आहे ?

हें ऐकून बिचारे सामान्य वाचकही म्हणतात, खरेंच, कोठे आहेत असे मराठी कादंबरीकार ?

आणि लोकभ्रम माजत जातो, कीं खरोखरच मराठी ललितसाहित्यांत पाश्चात्य साहित्याचें बल आणि तेज नाहीं !

आजच्या मराठी कादंबरीकारांस अगर नाटकारांस सर्वांत असह्य होण्यासारखें कांहीं दुःख असेल तर तें या लोकापवादाचें. कारण, जें सामर्थ्य आपल्या अंगीं वास्तविक आहे, पण जें अज्ञातवासी पांडवांच्या शस्त्रास्त्रां-

प्रमाणें झांकून ठेवावें लागत आहे, तें आपल्या अंगीं नाहीं असें मानून जगानें आपली किंमत कमी लेखावी हा विचार फार क्लेशकारक होय! समाजांतल्या निकृष्ट वर्गाशीं मराठी कादंबरीकाराला समरस होतांच येऊं नये, आणि राजकीय विचारक्रान्तीच्या रंगांनीं त्याला आपलीं कथानकें वेधक करतांच येऊं नयेत, असा विधात्याचा तर कांहीं पक्षपात नाहीं ना? किंवा पाश्चात्य कादंबरीकार निळ्या आभाळांतून अवतरले आणि मराठी कादंबरीकार तेवढे काळ्या मातींतून बाहेर पडले, अशांतली तर कांहीं गोष्ट नाहीं ना? साम्यशोधन आणि वैषम्यविद्वेष हे मुळीं ललितलेखकांच्या सौंदर्यासक्त अंतरंगाचे सिद्ध धर्मच आहेत! आणि आम्हांला पाश्चात्त्यांसारखे दोन डोळे असल्यामुळें त्यांना जें जें दिसतें तें तें पाहण्याची शक्ति आमच्यांत आहे हें जसें खरें, तसेंच ज्या पराक्रमांनीं पाश्चात्त्य कादंबरीकारांनीं लोकांना थक्क केलें असेल ते करून दाखविण्याची शक्ति व इच्छा मराठी कादंबरीकारांत असलीच पाहिजे!

पण असें आहे ना, कीं जो गुलाम असतो त्याला सारें दिसत असलें तरी कांहीं दिसलेसें दाखविण्याची त्याला सोय नसते!

मराठी कादंबरीकारांची व नाटककारांची हीच अवस्था झाली आहे!

समाजाच्या भिन्न भिन्न वर्गाशीं समरस होण्याची ताकद व इच्छा कितीही असली तरी तसें होऊन लिहिण्याची सोय नाहीं! एका जातीनें दुसऱ्या जातीवर, एका धर्मानें दुसऱ्या धर्मावर, एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर, किंवा शास्त्यांनीं शासितांवर चालविलेल्या वैषम्यानें अंतःकरण उचंबळून आलें तरी तें ललितकृतींत प्रगट करावयास सवड नाहीं! अशा वैषम्याविरुद्ध लोकक्षोभ उठविणारी कादंबरी जन्मतांच कायद्याच्या अग्नींत भस्मसात् होईल हें उघड आहे! आणि तेजस्वी ललितकृती जन्मतांच त्यांच्या गळ्याला नख लावण्यास कायदे अपुरे ठरतील म्हणूनच कीं काय लोकमताचें नवें भूत आतांशा उठलें आहे! सनातन्यांनीं एक नाटक बंद पाडावें, अस्पृश्यांनीं दुसरें, गिरणीवाल्यांनीं तिसरें, मजुरांनीं चवथें, मुसलमानांनीं पांचवें! आणि सरकारानें खुशाल नामानिराळें राहून ललितकृतींची कापाकाप करूं द्यावी! ही परिस्थिति दिसत असतां, केवळ मृत्यूच्या खाईत लोटण्यासाठीं कोणता कादंबरीकर अगर नाटककार सामाजिक, धार्मिक अगर राजकीय विचारक्रांतीविषयीच्या आपल्या भावनांस मूर्त स्वरूप देऊन ललितकृति निर्माण करील? रूपकाच्या भाषेनें बोलणें हाच काय तो मार्ग अशा परिस्थितींत ललितलेखकास उरतो, व "कीचकवधा"-

सारखीं नाटकें, आणि "उषःकाला" सारख्या कादंबऱ्या लिहिल्या जातात; आणि ज्या ललितलेखकांस आजच्याच समाजाबद्दल लिहिण्याचा कटाक्ष ठेवायचा असतो त्यांस केवळ सूचकपणेंच आपल्या तीव्र भावना बोलून दाखविण्याखेरिज गत्यंतर उरत नाहीं.

कोणत्याही प्रकारचा अन्याय, अगर वैषम्य म्हणजे ललितलेखकाच्या दृष्टीनें त्याच्या प्रीतींतल्या सौंदर्यतत्त्वाचा तो अवमानच होय. असल्या अवमानाचा अंत करण्यासाठीं त्याचें अंतःकरण सदैव तळमळत असतें. तो अवमान अगर सौंदर्यहानि जितकी भयंकर असेल तितकी ती तळमळही तीव्र असते. या न्यायास मराठी कादंबरीकार अगर नाटककार अपवाद असण्याचें कांहींच कारण नाहीं. समाजाच्या सर्व वर्गांशीं समरस होण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं खचित आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय व्यवस्थितींत साम्य किंवा सौंदर्य प्रस्थापित करण्यासाठीं त्यांचीं हृदयें उतावीळ झालीं आहेत, आणि ही उताविळीची ज्योत सहस्रावधि हृदयांत पेटविण्याचा पराक्रमही त्यांच्या प्रतिभेंत आहे !

परंतु उताविळीचे हे कढ आंतल्याआंत आटविण्याखेरीज आजच्या ललितलेखकांस दुसरी गति नाहीं ! प्रतिकूल राजकीय परिस्थितीमुळें मराठी ललित वाङ्मयाची भरारी खुंटली आहे असें मीं म्हटलें तें याच अभिप्रायानें. आपल्या प्रिय मातृभाषेचे ललितें विलास अशा प्रकारें कांहींसे कुंठित झालेले दिसत असूनही तें नुसतें उघड्या डोळ्यांनीं पाहणें या पिढींतल्या सारस्वतांस भाग आहे. सामाजिक व तत्सम इतर वैषम्यांनीं ऐहिक संसाराचें सुंदर चित्र विकृत केलेलें दिसतांच अंतःकरणांत उठणाऱ्या भावनानलाच्या सहस्रशिखा गुप्त ठेवणेंच त्यांस प्राप्त आहे, आणि ललितसंस्कारशून्य, स्वयंमन्य टीकाकारांनीं, कधीं मूर्खपणानें तर कधीं मतलबानें, मराठी ललितलेखकांच्या प्रतिभेविषयींच शंका घेतली तर तिच्याबद्दल त्यांची कींव करून स्वस्थ बसण्यावांचून त्यांस इलाज नाहीं !

कारण, या पिढींतल्या सारस्वतांत एक मोठी आशा आहे ! ती ही, कीं, लवकरच ही प्रतिकूल परिस्थिति बदलणार अशीं चिन्हें दिसत आहेत ! आणि तसें झालें म्हणजे मराठी ललितवाङ्मय किती सर्वंकष आणि ओजस्वी असूं शकतें त्याचा पुरावा जगाला भरपूर मिळणार आहे ! हा उन्मत्त पराक्रम आमच्या भाग्यांत नाहीं, पण उदयोन्मुख पिढींतल्या

ललित लेखकांसाठीं तो राखून ठेवलेला आहे! आज आम्ही आमच्या हृदयांत कोंडून धरलेल्या भावनांना वाचा नसली, तरी मरण नाहीं! पुढच्या पिढींतल्या सारस्वतींच्या अंतःकरणांत त्यांचा पुनरुद्भव खचित होणार आहे! त्या बलिष्ठ व दिव्य भावनांचे स्रोत पुढच्या पिढींतल्या ललित वाङ्मयांत अप्रतिबद्धपणें वहावयाचे आहेत! आपल्या लेखणींतून हे स्रोत वाहतांना पाहून होणारा आनंद सौंदर्यदर्शनाच्या उल्हासाच्या सर्व प्रकारांत अग्रगण्य होय! तो स्वर्गीय आनंद आमच्या वांट्याला आला नसला तरी आज उद्याचलावर पाऊल टाकणाऱ्या तरुण लेखकांना तो खाचित मिळणार आहे! मात्र, त्यासाठीं त्यांनीं अवश्य तें प्रतिभासाधन निरलसपणें व निश्चयानें केलें पाहिजे! कारण, गंगेचा पवित्र प्रवाह आळशी माणसावर चुकून पडत असेल, पण सरस्वतीचा प्रसाद मात्र दीर्घोद्योगी अभ्यासकांसच मिळतो!

समाप्त

४२९३

REFBK-0004813

महाराष्ट्रवाग्देवीच्या कंठांतील नव्या नवलाईचा
अलंकार म्हणजेच

प्रो. ना. सी. फडके
यांच्या

# गुजगोष्टी

( जुन्या व मुद्दाम नव्यानें लिहिलेल्या गुजगोष्टींचा संग्रह ).
श्री. बाबूराव पेंटर
यांच्या मोहक चित्राचें तीन रंगी कव्हर. उत्तम छपाई.
किंमत रु. १॥
इंटरनॅशनल बुकसर्व्हिस, पुणें.

---

प्रो. ना. सी. फडके
यांची पुढील कादंबरी

# उद्धार

लवकरच प्रसिद्ध होईल.